पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६२

सभावृत्तांत

दिनांक – २०/९/२०२१ वेळ –दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **सप्टेंबर-२०२१** ची मासिक मा.महापालिका सभा **सोमवार** दिनांक **२०/०९/२०२१** रोजी दुपारी २.०० वाजता मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दिनांक ३ जुलै २०२० व दिनांक २८ जून २०२१ च्या पत्रान्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केले होते. सभेस खालील सन्मा.सदस्य संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे सभागृहातून ऑनलाईन पध्दतीने अथवा मोबाईल ऍपद्वारे उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.सारीका शिवाजी सस्ते

४) मा.राहुल गुलाब जाधव

५) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे

६) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)

७) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

८) मा.गायकवाड निर्मला मनोज

९) मा.गोफणे अनुराधा देविदास

१०) मा.अजित दामोदर गव्हाणे

११) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१२) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

१४) मा.लांडे विक्रांत विलास

१५) मा.गीता सुशिल मचंरकर

१६) मा.राहुल हनुमंतराव भोसले

१७) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

१८) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

१९) मा.अनुराधा गणपत गोरखे

२०) मा.केशव हनुमंत घोळवे

२१) मा.मंगला अशोक कदम

२२) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२३) मा.अश्विनी भिमा बोबडे

२४) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२५) मा.संजय बबन नेवाळे

२६) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

२७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

२८) मा.घोलप कमल अनिल

२९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३०) मा.पवळे सुमनताई मधुकर

३१) मा.चिखले सचिन तुकाराम

३२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३३) मा.राजू मिसाळ

३४) मा.शैलजा अविनाश मोरे

३५) मा.बाबर शर्मिला राजू

३६) मा.अमित राजेंद्र गावडे

३७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

३८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४०) मा.ढाके नामदेव जनार्दन

४१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४२) मा.करुणा शेखर चिंचवडे

४३) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

४४) मा.भोईर सुरेश शिवाजी

४५) मा.अपर्णा निलेश डोके

४६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे (पाटील)

४७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४८) मा.जयश्री वसंत गावडे

४९) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५०) मा.शाम गणपतराव लांडे

५१) मा.सुजाता सुनिल पालांडे

५२) मा.योगेश मंगलसेन बहल

५३) मा.कदम निकीता अर्जुन

५४) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५५) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५६) मा.डब्बू आसवाणी (हिरानंद)

५७) मा.नढे विनोद जयवंत

५८) मा.पाडाळे निता विलास

५९) मा.काळे उषा दिलीप

६०) मा.अभिषेक गोविंद बारणे

६१) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६२) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

६३) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६४) मा.कलाटे राहुल तानाजी

६५) मा.कलाटे मयूर पांडुरंग

६६) मा.ममता विनायक गायकवाड

६७) मा.कामठे तुषार गजानन

६८) मा.चोंधे आरती सुरेश

६९) मा.कस्पटे संदिप अरुण

७०) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७१) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७२) मा.सुनिता हेमंत तापकीर

७३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७५) मा.कुटे निर्मला संजय

७६) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

७७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

७८) मा.आंगोळकर सागर सुनिल

७९) मा.मुंढे उषा अंकुश

८०) मा.कदम शशिकांत गणपत

८१) मा.लोखंडे चंदा राजू

८२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

८३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

८७) मा.नवनाथ दत्तू जगताप

८८) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

८९) मा. संजय मल्हारराव वाबळे

९०) मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर

९१) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९२) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

९३) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.प्रमोद भोसले-मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील-शहर अभियंता, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक नगररचना, मा.चारठाणकर, मा.दुरगुडे-उपआयुक्त, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.भालकर, मा.तांबे-सह शहर अभियंता, मा.बोदडे मा.जोशी, मा.देशमुख-सहाय्यक आयुक्त, मा.सेठीया, मा.लडकत, मा.खाबडे -कार्यकारी अभियंता, मा.वाबळे-अधिष्ठता (वायसीएमएच) व मा.जरांडे-मुख्य सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर** – उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) विशेष मा.महापालिका सभा क्रमांक -५६ दि.२६/३/२०२१ व दि.३१/३/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक -५९ दि.१८/६/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

क) मा.महापालिका सभा क्रमांक -६० दि.२०/७/२०२१ व दि.२९/७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ड) मा.महापालिका सभा क्रमांक -६१ दि.२०/८/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.नगरसचिव – विषय क्रमांक १ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.स्थायी समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे. मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागेवर राजीनामा दिलेले मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/ नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे आहेत. १) मा.लांडगे रवि लक्ष्मण पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टीचे गटनेते तथा सभागृहनेता मा.नामदेव ढाके यांनी त्यांच्या पक्षाचे १ सदस्यांचे नांव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावेत. (बंद लखोटा देणेत आला.)

मा.महापौर यांनी बंद लखोटा सर्वांसमक्ष उघडला आणि त्यामध्ये असणारे नांव श्री.अण्णा बोदडे, यांनी सभागृहात वाचून दाखविले ते पुढीलप्रमाणे- १) मा.सुजाता सुनिल पालांडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी.

ठराव क्रमांक -६९२ विषय क्रमांक – १
दिनांक – २०/९/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

मा.लांडगे रवि लक्ष्मण यांनी मा.स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.स्थायी समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २३ व कलम ३१ अ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सदर रिकाम्या जागेवर सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सुजाता सुनिल पालांडे या पालिका

सदस्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात आली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

------

(मा.सुजाता सुनिल पालांडे, नियुक्त मा.स्थायी समिती सदस्य यांचा पुस्तक व फुल देवून सन्मान करणेत आला. )

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, आजच्या सभेमध्ये मा.सोमनाथ निवृत्ती रुपनवर यांचा विशेष सन्मान करण्याची विनंती करतो.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

(मा.सोमनाथ निवृत्ती रुपनवर यांचा विशेष उल्लेखनीय कार्याबद्दल पुस्तक व फुल देवून सन्मान करणेत आला.)

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, शहरातील ज्ञात व अज्ञात दिवंगत व्यक्तीस तसेच कल्याणसिंह – उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री यांचे निधन, चंदन मित्रा - जेष्ठ पत्रकार व राज्यसभेचे माजी खासदार यांचे निधन, वासू परांजपे – जेष्ठ क्रिकेटपटू व प्रशिक्षक यांचे निधन, आर.एम.वाणी - शिवसेनेचे माजी आमदार यांचे निधन झाले असल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

मा.अॅड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – २

दिनांक – २०/९/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. भिमाबाई फुगे व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१०१२८ दि.११/८/२०२१

मे. क्वॉलिटी केटररर्स अँण्ड कॅन्टीन कॉन्ट्रक्टर यांना वाय.सी.एम.हॉस्पिटल येथील कॅन्टीन दि. ०७/०४/२०१६ ते ०८/०३/२०२१ या कालावधीसाठी कराराने चालविणेस दिलेले आहे. तथापि मार्च- २०२० पासून कोरोना प्रादुर्भावामुळे कॅन्टीन बंद होते. त्यामुळे मे. क्वॉलिटी

केटररर्स अँण्ड कॅन्टीन कॉन्ट्रक्टर यांची आर्थिक अडचण/ कोंडी निर्माण झाली आहे. त्यांची दि. ३१/०३/२०२१ अखेरची भाडे थकबाकी र.रू.२०,०५,९९०/- माफ करणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नवीन जिजामाता रुग्णालय, पिंपरी येथे नव्याने तयार करणेत आलेल्या हॉस्पिटलचे इमारतीमध्ये 3 Tesla MRI, CT Scan, Cath Lab, X-ray, Pathology विभाग हा खासगी शासकीय भागीदारी अंतर्गत सुरु करणेची ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशनची तयारी आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना / महात्मा फुले आरोग्य योजना यांचा रुग्णांना लाभ मिळून MRI, cath LAB इत्यादी सारख्या महागड्या तपासण्या मोफत होऊ शकेल, तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल रुग्णांना याचा लाभ घेता येईल. यामुळे शहरातील नागरिकांना चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून त्याचा फायदा होणार आहे. मे. ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशन या संस्थेने शासन अथवा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरात काम करण्याची तयारी दर्शवलेली आहे ही बाब विचारात घेता तसेच संस्थेचा सदर हेतू पाहता मे. ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशन यांना नवीन जिजामाता रुग्णालय, पिंपरी येथील इमारतीमध्ये प्रयोगशाळा तसेच 3 Tesla MRI, CT Scan, Cath Lab, X-ray इत्यादी करिता प्राथमिक चाचणी सेंटरसाठी विनामुल्य जागा उपलब्ध करुन देण्यास तसेच वीज व पाणी मनपामार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ०८ रुग्णालया मधील स्त्रीरोग विभागासाठी आवश्यक Cervicoscope (Trans – Vaginal Digital Examiniation Device) १० (नग) उपकरणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाकडून खरेदी करण्यात आलेली असून त्याचा पुरवठा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती साहित्य भांडार, वाय.सी.एम.रुग्णालय पदव्युत्तर संस्था, पिंपरी येथे करण्यात आलेला आहे. सदर Cervicoscope (Trans–Vaginal Digital Examiniation Device) या उपरकरणाचा उपयोग स्त्रीयांच्या गर्भाशयाच्या मुखाची तपासणी साठी करण्यात येतो. सदरील उपकरणे ही महापालिकेच्या ०८ रुग्णालयामधील स्त्रीरोग विभाग आणि क्षेत्रिय भेटी व्दारे बाहय संपर्क सत्रांतर्गत शिबीरांमध्ये वापरून स्त्री लाभार्थ्यांची उपरोक्त तपासणी करता येईल. जेणेकरुन स्त्री लाभार्थ्यांना असलेला गर्भाशयाच्या मुखाचा जंतुसंसर्ग/कॅन्सर यांचे निदान होऊन त्यांना पुढील उपचाराकरिता म.न.पा. च्या वाय.सी.एम.रुग्णालयामध्ये संदर्भीत करण्याची कार्यवाही करता येईल. सदरचे Cervicoscope (Trans–Vaginal Digital Examiniation Device) उपकरण हताळण्यासाठी आणि त्याव्दारे केलेल्या तपासणीचा अहवाल देणेकरिता प्रशिक्षित कर्मचारी (स्त्रीरोगतज्ञ, स्टाफनर्स) आणि संपूर्ण Online Reporting प्रणालीची (system) यांची आवश्यकता आहे. पिं.चि.म.न.पा. कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त बाहयसंपर्क शिबिरे नियमीत पणे आयोजित केल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील जास्तीत जास्त स्त्री लाभार्थ्यांना

याचा लाभ घेता येईल. याकरिता नियमित पणे शिबिरे आयोजित करणे, तपासणी करणे, अहवाल तयार करणे, रुग्णांना संदर्भीत करणे याकामी खाजगी बाहय संस्था (एजन्सी) नियुक्त करणे आवश्यक आहे, जेणेकरुन सध्याच्या पिं.चिं.मनपाच्या कार्यरत कर्मचारी यांचेवर ताण येणार नाही. त्यामुळे याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाकडून ई-निविदा प्रसिध्द करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिके च्या ०८ रुग्णालयांकरिता Cervicoscope (Trans – Vaginal Digital Examiniation Device) उपकरण हताळण्यासाठी आणि त्याव्दारे केलेल्या तपासणीचा अहवाल देणेकरिता प्रशिक्षित कर्मचारी (स्त्रीरोगतज्ञ, स्टाफनर्स) आणि संपूर्ण Online Reporting प्रणाली (system) साठी खाजगी बाहय संस्था (एजन्सी) नियुक्त करणेस मान्यता देणेत यावी. तसेच किडनी केअर डायलिसिस सेंटर यांच्या वतीने पुणे व पिंपरी चिंचवड येथे गरीब रुग्णांसाठी गेल्या दोन वर्षापासून डायलिसिस सेंटर सुरू करण्यात आले आहे. महापालिके मार्फत थेरगाव येथे नव्याने उभारण्यात आलेल्या हॉस्पिटलच्या इमारतीमध्ये आठ (८) मशीन सह डायलिसिस सेंटर सुरू करण्याची मे. किडनी केअर डायलिसिस सेंटर यांची तयारी आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना /आयुष्मान भारत योजना/ महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा गोरगरीब रुग्णांना लाभ मिळून देऊन, त्यांना किडनीच्या संदर्भात कुठल्याही समस्या असतील त्याच्या वरील उपचार पूर्णतः मोफत करण्यात येतील व मोफत डायलिसिस होऊ शकेल. तसेच ज्या रुग्णांचा कोणत्याही शासकीय योजने मध्ये समावेश नाही. तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोफत डायलिसिस करून देण्यात संस्था तयार आहे. यामुळे शहरातील नागरिकांना चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून त्याचा फायदा होणार आहे. ही बाब विचारात घेता व संस्थेचा सदर हेतू पाहता मे. किडनी केअर डायलिसिस सेंटर यांना नवीन रुग्णालयाच्या इमारतीमध्ये डायलिसिस सेंटर साठी विनामूल्य जागा उपलब्ध करून देण्यास तसेच डायलिसिस सेंटर साठी वीज व पाणी मनपा मार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्व.इंदिरा गांधी प्रसुतीगृह, सांगवी येथील हॉस्पिटलचे इमारतीमध्ये Sonography, X-ray, Pathology विभाग हा खासगी शासकीय भागीदारी अंतर्गत सुरु करणेची लाईफ केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची तयारी आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून त्याचा फायदा होणार आहे. मे.लाईफ केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल या संस्थेने शासन अथवा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरात काम करण्याची तयारी दर्शवलेली आहे ही बाब विचारात घेता तसेच संस्थेचा सदर हेतू पाहता मे.लाईफ केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांना स्व. इंदिरा गांधी प्रसुतीगृह, सांगवी येथील इमारतीमध्ये प्रयोगशाळा, तसेच Sonography, X-ray इत्यादी करिता प्राथमिक चाचणी सेंटरसाठी विनामुल्य जागा उपलब्ध करुन देण्यास तसेच वीज व पाणी मनपामार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच मे. साई सेवा इंटरप्रायजेस यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील उपहारगृह जानेवारी २०१८ ते जानेवारी २०२३ या कालावधीसाठी कराराने चालाविणेस दिलेले आहे. मे. साई सेवा इंटरप्रायजेस यांनी उपहारगृहाचे भाडे एक रकमी भरले आहे. तथापि मार्च-२०२० पासून करोना प्रादुर्भावामुळे उपहारगृह बंद होते, त्यामुळे मे. साई सेवा इंटरप्रायजेस

यांची आर्थिक अडचण/ कोंडी निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांना जानेवारी २०२३ पासून २ वर्ष पुढे पुढील भाडे घेऊन त्यांना मुदत वाढ देणेस मान्यता देणेत यावी. तसेच डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी पुर्वीचे नाव (डॉ. डी. वाय. पाटील विद्या प्रतिष्ठान सोसायटी) ही संस्था पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये गेले अनेक वर्षांपासून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. सदर संस्थेला ज्ञानदानाच्या कार्यासाठी जागेची आवश्यकता होती म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने से.नं.२७ अ, निगडी येथील आय टी आय इमारत ३० वर्ष कालावधीसाठी भाडेकराराने सदर संस्थेच्या ताब्यात दिलेली आहे. तथापि सदरहू इमारत ही फार जुनी झालेने व मोडकळीस आलेने सदर आय टी आय इमारत भाडेकराराने न देता आहे त्या जागेवर डॉ. डी. वाय. पाटील विद्याप्रतिष्ठान सोसायटी ही संस्था नवीन इमारत उभी करणार असून नवीन इमारत बांधकामासह डॉ. डी. वाय. पाटील विद्या प्रतिष्ठान या संस्थेस सदर इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळालेनंतर ३० वर्ष नाममात्र लिजने देणेस मान्यता देणेत यावी.

मा.उत्तम केंदळे- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ६९३ विषय क्रमांक – २

दिनांक – २०/९/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. भिमाबाई फुगे व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१०१२८ दि.११/८/२०२१

मे.क्वॉलिटी केटररर्स अँण्ड कॅन्टीन कॉन्ट्रक्टर यांना वाय.सी.एम.हॉस्पिटल येथील कॅन्टीन दि. ०७/०४/२०१६ ते ०८/०३/२०२१ या कालावधीसाठी कराराने चालविणेस दिलेले आहे. तथापि मार्च- २०२० पासून कोरोना प्रादुर्भावामुळे कॅन्टीन बंद होते. त्यामुळे मे. क्वॉलिटी केटररर्स अँण्ड कॅन्टीन कॉन्ट्रक्टर यांची आर्थिक अडचण/ कोंडी निर्माण झाली आहे. त्यांची दि. ३१/०३/२०२१ अखेरची भाडे थकबाकी र.रू.२०,०५,९९०/- माफ करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नवीन जिजामाता रुग्णालय, पिंपरी येथे नव्याने तयार करणेत आलेल्या हॉस्पिटलचे इमारतीमध्ये 3 Tesla MRI, CT Scan, Cath Lab, X-ray, Pathology विभाग हा खासगी शासकीय भागीदारी अंतर्गत सुरु करणेची ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशनची तयारी आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना / महात्मा फुले आरोग्य योजना यांचा रुग्णांना लाभ मिळून MRI, cath LAB इत्यादी सारख्या महागड्या तपासण्या मोफत होऊ शकेल, तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल रुग्णांना याचा लाभ घेता येईल. यामुळे शहरातील नागरिकांना चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून त्याचा फायदा होणार आहे. मे. ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशन या संस्थेने शासन अथवा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरात काम करण्याची तयारी दर्शवलेली आहे ही बाब विचारात घेता तसेच संस्थेचा सदर हेतू पाहता मे. ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशन यांना नवीन

जिजामाता रुग्णालय, पिंपरी येथील इमारतीमध्ये प्रयोगशाळा तसेच 3 Tesla MRI, CT Scan, Cath Lab, X-ray इत्यादी करिता प्राथमिक चाचणी सेंटरसाठी विनामुल्य जागा उपलब्ध करुन देण्यास तसेच वीज व पाणी मनपामार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ०८ रुग्णालया मधील स्त्रीरोग विभागासाठी आवश्यक Cervicoscope (Trans–Vaginal Digital Examiniation Device) १० (नग) उपकरणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाकडून खरेदी करण्यात आलेली असून त्याचा पुरवठा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती साहित्य भांडार, वाय.सी.एम.रुग्णालय पदव्युत्तर संस्था, पिंपरी येथे करण्यात आलेला आहे. सदर Cervicoscope (Trans–Vaginal Digital Examiniation Device) या उपरकरणाचा उपयोग स्त्रीयांच्या गर्भाशयाच्या मुखाची तपासणी साठी करण्यात येतो. सदरील उपकरणे ही महापालिकेच्या ०८ रुग्णालयामधील स्त्रीरोग विभाग आणि क्षेत्रिय भेटी व्दारे बाहय संपर्क सत्रांतर्गत शिबीरांमध्ये वापरून स्त्री लाभार्थ्यांची उपरोक्त तपासणी करता येईल. जेणेकरुन स्त्री लाभार्थ्यांना असलेला गर्भाशयाच्या मुखाचा जंतुसंसर्ग/कॅन्सर यांचे निदान होऊन त्यांना पुढील उपचाराकरिता म.न.पा. च्या वाय.सी.एम.रुग्णालयामध्ये संदर्भीत करण्याची कार्यवाही करता येईल. सदरचे Cervicoscope (Trans–Vaginal Digital Examiniation Device) उपकरण हताळण्यासाठी आणि त्याव्दारे केलेल्या तपासणीचा अहवाल देणेकरिता प्रशिक्षित कर्मचारी (स्त्रीरोगतज्ञ, स्टाफनर्स) आणि संपूर्ण Online Reporting प्रणालीची (system) यांची आवश्यकता आहे. पिं.चि.म.न.पा. कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त बाहयसंपर्क शिबिरे नियमीत पणे आयोजित केल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील जास्तीत जास्त स्त्री लाभार्थ्यांना याचा लाभ घेता येईल. याकरिता नियमित पणे शिबिरे आयोजित करणे, तपासणी करणे, अहवाल तयार करणे, रुग्णांना संदर्भीत करणे याकामी खाजगी बाहय संस्था (एजन्सी) नियुक्त करणे आवश्यक आहे, जेणेकरुन सध्याच्या पिं.चिं.मनपाच्या कार्यरत कर्मचारी यांचेवर ताण येणार नाही. त्यामुळे याकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाकडून ई-निविदा प्रसिध्द करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ०८ रुग्णालयांकरिता Cervicoscope (Trans–Vaginal Digital Examiniation Device) उपकरण हताळण्यासाठी आणि त्याव्दारे केलेल्या तपासणीचा अहवाल देणेकरिता प्रशिक्षित कर्मचारी (स्त्रीरोगतज्ञ, स्टाफनर्स) आणि संपूर्ण Online Reporting प्रणाली (system) साठी खाजगी बाहय संस्था (एजन्सी) नियुक्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच किडनी केअर डायलिसिस सेंटर यांच्या वतीने पुणे व पिंपरी चिंचवड येथे गरीब रुग्णांसाठी गेल्या दोन वर्षापासून डायलिसिस सेंटर सुरू करण्यात आले आहे. महापालिके मार्फत थेरगाव येथे नव्याने उभारण्यात आलेल्या हॉस्पिटलच्या इमारतीमध्ये आठ (८) मशीन सह डायलिसिस सेंटर सुरू करण्याची मे. किडनी केअर डायलिसिस सेंटर यांची तयारी आहे. राजीव गांधी जीवनदायी योजना /आयुष्मान भारत योजना/ महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा गोरगरीब रुग्णांना लाभ मिळून देऊन, त्यांना किडनीच्या संदर्भात कुठल्याही समस्या असतील त्याच्या वरील उपचार

पूर्णतः मोफत करण्यात येतील व मोफत डायलिसिस होऊ शकेल. तसेच ज्या रुग्णांचा कोणत्याही शासकीय योजने मध्ये समावेश नाही. तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोफत डायलिसिस करून देण्यात संस्था तयार आहे. यामुळे शहरातील नागरिकांना चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून त्याचा फायदा होणार आहे. ही बाब विचारात घेता व संस्थेचा सदर हेतू पाहता मे. किडनी केअर डायलिसिस सेंटर यांना नवीन रुग्णालयाच्या इमारतीमध्ये डायलिसिस सेंटर साठी विनामूल्य जागा उपलब्ध करून देण्यास तसेच डायलिसिस सेंटर साठी वीज व पाणी मनपा मार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्व.इंदिरा गांधी प्रसुतीगृह, सांगवी येथील हॉस्पिटलचे इमारतीमध्ये Sonography, X-ray, Pathology विभाग हा खासगी शासकीय भागीदारी अंतर्गत सुरु करणेची लाईफ केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची तयारी आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून त्याचा फायदा होणार आहे. मे.लाईफ केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल या संस्थेने शासन अथवा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरात काम करण्याची तयारी दर्शवलेली आहे ही बाब विचारात घेता तसेच संस्थेचा सदर हेतू पाहता मे.लाईफ केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांना स्व. इंदिरा गांधी प्रसुतीगृह, सांगवी येथील इमारतीमध्ये प्रयोगशाळा, तसेच Sonography, X-ray इत्यादी करिता प्राथमिक चाचणी सेंटरसाठी विनामुल्य जागा उपलब्ध करुन देण्यास तसेच वीज व पाणी मनपामार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मे. साई सेवा इंटरप्रायजेस यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील उपहारगृह जानेवारी २०१८ ते जानेवारी २०२३ या कालावधीसाठी कराराने चालाविणेस दिलेले आहे. मे. साई सेवा इंटरप्रायजेस यांनी उपहारगृहाचे भाडे एक रकमी भरले आहे. तथापि मार्च-२०२० पासून करोना प्रादुर्भावामुळे उपहारगृह बंद होते, त्यामुळे मे. साई सेवा इंटरप्रायजेस यांची आर्थिक अडचण/ कोंडी निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांना जानेवारी २०२३ पासून २ वर्ष पुढे पुढील भाडे घेऊन त्यांना मुदत वाढ देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी पुर्वीचे नाव (डॉ. डी. वाय. पाटील विद्या प्रतिष्ठान सोसायटी) ही संस्था पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये गेले अनेक वर्षांपासून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. सदर संस्थेला ज्ञानदानाच्या कार्यासाठी जागेची आवश्यकता होती म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने से.नं.२७ अ, निगडी येथील आय टी आय इमारत ३० वर्ष कालावधीसाठी भाडेकराराने सदर संस्थेच्या ताब्यात दिलेली आहे. तथापि सदरहू इमारत ही फार जुनी झालेने व मोडकळीस आलेने सदर आय टी आय इमारत भाडेकराराने न देता आहे त्या जागेवर डॉ. डी. वाय. पाटील विद्याप्रतिष्ठान सोसायटी ही संस्था नवीन इमारत उभी करणार असून नवीन इमारत बांधकामासह डॉ. डी. वाय. पाटील विद्या प्रतिष्ठान या संस्थेस सदर इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळालेनंतर ३० वर्ष नाममात्र लिजने देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, उपसूचना काय वाचली ते काहीच समजत नाही, आवाज येत नाही.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ३

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. भिमाबाई फुगे व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१०१२९ दि.११/८/२०२१

ओम जय आनंद चॅरिटेबल ट्रस्टचे वतीने थेरगाव येथे डांगे चौकात गरीब रुग्णांसाठी गेल्या ४ वर्षापासून डायलिसीस सेंटर सुरू करणेत आले आहे. महापालिकेमार्फत थेरगाव येथे नव्याने तयार करणेत आलेल्या हॉस्पिटलचे इमारतीमध्ये ७ मशिनसह डायलिसीस सेंटर सुरू करणेची मे. ओम जय आनंद चॅरिटेबल ट्रस्टची तयारी आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना / महात्मा फुले जनआरोग्य योजना यांचा रूग्णांना लाभ मिळून डायलिसीस मोफत होऊ शकेल तसेच ज्या रूग्णाचा कोणत्याही शासकीय योजनेस समावेश नाही. तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल रूग्णांना मोफत डायलिसीस करून देण्यास संस्था तयार आहे. यामुळे शहरातील नागरीकांना चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असून त्याचा फायदा होणार आहे. ही बाब विचारात घेता व संस्थेचा सदर हेतू पाहता मे. ओम जय आनंद चॅरिटेबल ट्रस्ट यांना नवीन रूग्णालयाचे इमारतीमध्ये डायलिसीस सेंटरसाठी विनामुल्य जागा उपलब्ध करून देण्यास तसेच डायलिसीस सेंटरसाठी वीज व पाणी मनपामार्फत उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यास व सदर बाब धोरणात्मक असल्याने याकामी मान्यता देणेत यावी.

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.केशव घोळवे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ६९४ विषय क्रमांक - ३

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. भिमाबाई फुगे व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१०१२९ दि.११/८/२०२१

विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ६९५ विषय क्रमांक - ४
दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.पअक/३/कावि/७/२०२१,
दि.०६/०८/२०२१.
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१०१४९ दि.१८/८/२०२१
व ठ.क्र.१०२३८ दि.१/९/२०२१

पिंपरी चिंचवड शहरातून वाहणा-या पुनर्रुत्जीवन प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी विशेष उद्देश वहन (Special Purpose Vehicle [SPV]) स्थापन करणे बाबत. पिंपरी चिंचवड शहराच्या हद्दीतून पवना, मुळा व इंद्रायणी या तीन नद्या वाहतात. यामधील मुळा नदीकाठ विकसन प्रकल्प, पुणे मनपाच्या सहकार्याने एकत्रितपणे राबविणेत येत असून, शहरातून वाहणा-या पुणे मनपाने या कामासाठी स्थापन केलेल्या कंपनीस मुळा नदीच्या पिंपरी चिंचवड शहरातील लांबीच्या प्रमाणात आवश्यक तो खर्च दिला जाणार आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती भागातून पवना नदी वाहत असून, शहराच्या उत्तरेकडील हद्दीवरुन इंद्रायणी नदी वाहत आहे. इंद्रायणी नदीची एक बाजू पिंपरी चिंचवड हद्दीत असून दुसरी बाजू पुणे ग्रामीणमध्ये म्हणजेच PMRDA यांच्या अखत्यारित येत असल्याने नदीच्या प्रदूषणासाठी त्यानुसार पिंपरी चिंचवड हद्दीतून वाहणा-या पवना व इंद्रायणी नदी पुनर्रुत्जीवन प्रकल्प राबवणेसाठी अशा कामांचा अनुभव असणा-या Ms. HCP Desing & Planning & Management Pvt. Ltd. यांची प्रकल्प सल्लागार म्हणून जून २०१८ मध्ये नेमणुक करणेत आली असून सद्यस्थितीत या प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल [DPR] बनविण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. पवना व इंद्रायणी नदीसाठी पुनर्रुत्जीवन प्रकल्प राबविणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी मा.स्थायी समितीने ठराव क्रमांक २५९०, दिनांक २५/०४/२०१८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक १७७, दिनांक २०/०४/२०१८ अन्वये दोन्ही नद्यांसाठी नदी सुधार प्रकल्प राबविणेस एकत्रित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने प्रकल्प सल्लागारांमार्फत तयार होणा-या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार [DPR] प्रकल्पाची अंमलबजावणी प्राधान्याने करणेसाठी स्वतंत्र कंपनी Special Purpose Vehicle [SPV] स्थापित करणे आवश्यक आहे. पवना व इंद्रायणी नदी पुनर्रुत्जीवन प्रकल्पाची व्याप्ती पाहता सदर दोन्ही नदीशी सबंधित शासनाच्या विविध संस्था आहेत, यामध्ये नदीची जागा ही महसुल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेशी सबंधित असून तसेच पाणी विषय़क संशोधन करणारी केंद्र शासनाची CWPRS संस्था खडकवासला, पुणे येथे आहे, पाऊस व पुरस्थितीचे अनुषंगाने नदीच्या वहना बाबतचे तांत्रिक अधिकार महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग यांचे कार्यक्षेत्रात येतात. तसेच शहरातील इंद्रायणी नदीचा दुसरा काठ पुणे ग्रामीण म्हणजे PMRDA यांच्या कार्यक्षेत्रात येत असून पवना नदीचा काही भाग PCNTDA व Defense यांच्या कार्यक्षेत्रात येतो. त्या अनुषंगाने पवना व इंद्रायणी नदी पुनर्रुत्जीवन प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी स्थापन

करावयाच्या Special Purpose Vehicle [SPV] मध्ये खालील सदस्यांचा आंतर्भाव करणे आवश्यक आहे.

1. मा. महापौर, पिं.चिं.मनपा.
2. मा. अध्यक्ष, स्थायी समिती, पिं.चिं.मनपा.
3. मा. सभागृह नेते, पिं.चिं.मनपा.
4. मा. आयुक्त, पिं.चिं.मनपा. (मुख्य कार्यकारी अधिकारी)
5. मा. विरोधी पक्षनेते, पिं.चिं.मनपा.
6. मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा
7. मा. मुख्याधिकारी, PMRDA
8. मा. शहर अभियंता, पिं.चिं.मनपा.
9. मा.मुख्य अभियंता, पुणे जलसंपदा विभाग
10. मा. सहशहर अभियंता, पर्यावरण, पिं.चिं.मनपा
11. मा. उपसंचालक, नगररचना विभाग, पिं.चिं.मनपा.
12. मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पिं.चिं.मनपा.

सदरच्या प्रस्तावित विशेष उद्देश वहन (Special Purpose Vehicle [SPV]) ला महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक असून सदरच्या SPV मार्फत खालिल कामकाज मुख्यत्वेकरुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

1. यापूर्वी मा.महापालिका सभेने मंजूरी दिलेनुसार शहरातून वाहणा-या नदीपात्राची जागा महाराष्ट्र शासनाच्या महसुल विभागाकडून मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत देखभाल, दुरुस्तीकामी SPV कडे हस्तांतरीत करुन घेणे.

2. नदी पुनर्रुत्जीवन प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांचेकडील विविध योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य अनुदान, किंवा आवश्यकता भासल्यास Municipal Bond किंवा कर्ज उभे करणे.

3. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनूसार नदी परिसरात Town Planning Scheme [TP] राबविणे यासाठी आवश्यक सर्व निर्णय घेणे व यातून निधी व लॅन्ड बँक तयार करण्याचे अधिकार या कंपनीस असतील.

4. प्रकल्पाचे अंमलबजावणीसाठी CSR किंवा CER चे अनुदानामधून किंवा पूर्ण प्रकल्प किंवा प्रकल्पाचा काही भाग PPP तत्वावर राबविणेचा अधिकार कंपनीस असेल.

5. प्रकल्पाचे काम पूर्ण झालेनंतर त्याचे चालन, देखभाल, दूरुस्तीचे काम करणेचे अधिकार SPV कंपनीस देणे.

सबब उपरोक्तप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील पवना व इंद्रायणी नदी पुर्नरुत्जीवन प्रकल्पाचे अंमलबजावणीसाठी वर नमुद केलेल्या सदस्यांचा समावेश करुन विशेष उद्देश वहन (Special Purpose Vehicle [SPV]) गठीत करणेस तसेच सदरच्या SPV कंपनीस वर नमूद केलेप्रमाणे कामकाज सोपविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

(बोललेले काहीच ऐकू येत नाही असे सन्मा.सदस्यांनी मा.महापौर कक्षात येवून सांगीतले)

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर – सर्वांनी बसून घ्यावे.

मा.राजू मिसाळ – मा.महापौर साहेब, आम्ही तुम्हांला विनंती करत होतो की उपसूचना काय हे काहीच समजत नव्हते आवाज येत नव्हता परत वाचून दाखवा. तीथ स्क्रीन बंद आहे, आवाज येत नाही काहीच ऐकू येत नाही.

(सभागृहात गोंधळ)

मा.योगेश बहल – मा.महापौर साहेब, आमचा तुमच्यावर काहीच आरोप नाही पण आम्हांला ऐकूच येत नाही.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर - सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता ही सभा आज दि. २०/९/२०२१ दु.२.३५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६२

सभावृत्तांत

(दि.२०/९/२०२१ दु.२.०० ची तहकूब सभा)

दिनांक – २०/९/२०२१ वेळ –दुपारी २.३५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/९/२०२१ (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २०/०९/२०२१ रोजी दुपारी २.३५ वाजता मा.उपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दिनांक ३ जुलै २०२० व दिनांक २८ जून २०२१ च्या पत्रान्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजीत करणेत आलेली आहे. मा.महापौर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील मा.महापौर कक्ष या ठिकाणावरुन ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केले होते. सभेस खालील सन्मा.सदस्य संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे सभागृहातून ऑनलाईन पध्दतीने अथवा मोबाईल ऍपद्वारे उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर
३) मा.सारीका शिवाजी सस्ते
४) मा.राहुल गुलाब जाधव
५) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे
६) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)
७) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
८) मा.गायकवाड निर्मला मनोज
९) मा.गोफणे अनुराधा देविदास
१०) मा.अजित दामोदर गव्हाणे
११) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश
१२) मा.संतोष (आण्णा) नेश्वर लोंढे
१३) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१४) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

१५) मा.लांडे विक्रांत विलास

१६) मा.गीता सुशिल मंचरकर

१७) मा.राहुल हनुमंतराव भोसले

१८) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

१९) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२०) मा.अनुराधा गणपत गोरखे

२१) मा.केशव हनुमंत घोळवे

२२) मा.मंगला अशोक कदम

२३) मा.तुषार रघुनाथ हिंगे

२४) मा.अश्विनी भिमा बोबडे

२५) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२६) मा.संजय बबन नेवाळे

२७) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

२८) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

२९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३०) मा.पवळे सुमनताई मधुकर

३१) मा.चिखले सचिन तुकाराम

३२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३३) मा.राजू मिसाळ

३४) मा.शैलजा अविनाश मोरे

३५) मा.बाबर शर्मिला राजू

३६) मा.अमित राजेंद्र गावडे

३७) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

३८) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

३९) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४०) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४१) मा.ढाके नामदेव जनार्दन

४२) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

४३) मा.करुणा शेखर चिंचवडे

४४) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

४५) मा.भोईर सुरेश शिवाजी

४६) मा.अपर्णा निलेश डोके

४७) मा.आश्विनी गजानन चिंचवडे (पाटील)

४८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४९) मा.जयश्री वसंत गावडे

५०) मा.कोमल दिपक मेवाणी

५१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५२) मा.शाम गणपतराव लांडे

५३) मा.सुजाता सुनिल पालांडे

५४) मा.योगेश मंगलसेन बहल

५५) कदम निकीता अर्जुन

५६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५७) उषा संजोग वाघेरे (पाटील)

५८) मा.डब्बू आसवाणी (हिरानंद)

५९) मा.नढे विनोद जयवंत

६०) मा.पाडाळे निता विलास

६१) मा.काळे उषा दिलीप

६२) मा.पवार मनिषा प्रमोद

६३) मा.अभिषेक गोविंद बारणे

६४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६५) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

६६) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६७) मा.कलाटे राहुल तानाजी

६८) मा.कलाटे मयूर पांडुरंग

६९) मा.ममता विनायक गायकवाड

७०) मा.कामठे तुषार गजानन

७१) मा.चोंधे आरती सुरेश

७२) मा.कस्पटे संदिप अरुण

७३) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

७४) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७५) मा.सुनिता हेमंत तापकीर

७६) मा.चंद्रकांत बारकु नखाते

७७) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७८) मा.कुटे निर्मला संजय

७९) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८०) मा.आंगोळकर सागर सुनिल

८१) मा.मुंढे उषा अंकुश

८२) मा.कदम शशिकांत गणपत

८३) मा.लोखंडे चंदा राजू

८४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

८५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

८६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

८७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

८८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

८९) मा.नवनाथ दत्तू जगताप

९०) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

९१) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

९२) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

९३) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.प्रमोद भोसले-मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील-शहर अभियंता, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक नगररचना, मा.चारठाणकर, मा.दुरगुडे-उपआयुक्त, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.भालकर, मा.तांबे- सह शहर अभियंता, मा.बोदडे मा.जोशी, मा.देशमुख-सहाय्यक आयुक्त, मा.सेठीया, मा.लडकत, मा.खाबडे -कार्यकारी अभियंता, मा.वाबळे-अधिष्ठता (वायसीएमएच) व मा.जरांडे-मुख्य सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.महापौर- उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

पोमण साहेबांना सूचित करते की हा तांत्रीक बीघड होत असताना आपले कर्मचारी जीथे सन्मा.सदस्य बसलेले आहेत त्याठिकाणी ठेवावीत जेणेकरुन कामामध्ये अडचण निर्माण होणार नाही. विषय क्रमांक ४ वर कोणाला बोलायचे आहे का.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर साहेब, आम्ही तुम्हांला विनंती केलेली होती की विषय क्रमांक २ ला उपसूचना दिलेली आहे ती काहीच समजलेली नाही. विषय क्रमांक २ परत वाचा.

मा.महापौर - मा.पक्षनेते, बहल साहेबांच असं म्हणण आहे की विषय क्रमांक २ ची उपसूचना दाखवा तरी त्याची झेरॉक्स प्रत त्यांना देण्यात यावी.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, त्यांना मी झेरॉक्स देतो विषय क्रमांक २ होवून गेलेला आहे.

मा.महापौर – विषय क्रमांक ४ मांडला आहे त्यावर कोणाला बोलायच आहे का.

मा.नामदेव ढाके – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ ला ज्या उपसूचना दिलेल्या आहेत त्या मी मा.योगेश बहल यांच्याकडे पाठवतो परंतु आपण विषय क्रमांक ४ वाचलेला आहे त्यावर कोणाला बोलायच असेलतर त्यांना बोलू दया नसेल बोलायच तर विषय क्रमांक ५ चालू करा.

मा.अजीत गव्हाणे - मा.महापौर साहेब, वि.क्र.२ ची उपसूचना वाचावी.

मा.नामदेव ढाके – मा.महापौर साहेब, वि.क्र. ४ था आता चालू आहे तुम्हांला वि.क्र.२ च्या उपसूचनांची प्रत देतो.

मा.महापौर – विषय क्रमांक ४ मांडला आहे त्यावर कोणाला बोलायच आहे का.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, ही पध्दत चुकीची आहे, तांत्रीक बीघाडामुळ आम्ही तुमच्या कक्षात आलो होतो आम्ही तीथ तुमचा निषेध केला नाही तुम्हांला विनंती केली आणि ते तुम्ही मान्य केल की मी ही सभा तहकूब करुन पुन्हा घेते. परंतु उपसूचना काय वाचल्या त्या आम्हांला ऐकू आल्या नाहीत आम्ही ती विनंती करतो की त्या उपसूचना तुम्ही वाचून दाखवा.

मा.महापौर – विषय क्रमांक २ झालेला आहे त्याच्यानंतर वि.क्र.३ पण झालेला आहे आता ४ था विषय चालू आहे.

मा.संदीप वाघेरे - मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड शहराच्या दृष्टिने हा सर्वात महत्वाचा विषय आहे पर्यावरणाचा. सहा नंबरचा जो विषय आहे तो पर्यावरणाचा आहे नदी पुनर्रजीवीत करण्यासंदर्भात. मा.महापौर साहेब, गेली चार वर्षे झाले मी पर्यावरणाच्या संदर्भात वेगवेगळया स्तरावरती वेगवेगळे मुद्दे उपस्थित केले, प्रत्येक गोष्टीसाठी फॉलोअप केला या

कंपनीचा डीपीआर फायनल होत आला. मा.महापौर साहेब, मला खेदानी एक सांगायच आहे की २०१८ ला आयुक्त साहेबांना सांगीतल की एसपीव्ही करुन बॉण्ड काढा, दोन हजार कोटीचे बॉण्ड काढातर दोनशे कोटीचे काढले, ठिक आहे. सीएसआर, सीईआर मध्ये मी वेळोवेळी महापालिकेला, आयुक्तांना आणि पर्यावरण विभागाच्या संजय कुलकर्णींना पत्र दिलं की ही पिंपरी चिंचवड शहराची डेव्हलपमेंट आहे इथे प्रत्येक बिल्डर, बांधकाम व्यावसायीक सीईआर अकौंटमधून महापालिकेला जमा करतात. शंभर कोटी पर्यंत प्रोजेक्ट असेलतर दोन टक्के, पाचशे कोटी पर्यंत असेलतर दिड टक्का, हजार कोटी पर्यंत असेलतर एक टक्का अशा माध्यमातून आजपर्यंत महापालिकेला वेळोवेळी पत्र दिलं की सीईआरमध्ये आता आपले फंडस किती जमा झाले त्याच्यानंतर दोन वर्षापुर्वी महापालिकेनी आणि पर्यावरण विभागाने १४६ कोटीच टेंडर काढल त्याला मी विरोध केला आणि त्याच्या विरोधात मी कोर्टातही गेलो की पहीला आपला डीपीआर मंजूर झाला पाहीजे, एन्व्हायरमेंटची परमीशन आली पाहीजे या बाकीच्या गोष्टी सगळया झाल्यानंतर तुम्ही हे टेंडर काढा. याच्या अगोदर पण वेळोवेळी नदीपात्राच्या बाजूनी ड्रेनेज लाईन गेलेल्या आहेत त्या सगळया ड्रेनेजलाईन फुटल्या सगळ पाणी नदीत जातं, सगळया नदया प्रदूषीत झाल्या. पर्यावरण विभाग आपण २०११-१२ ला चालू केला त्याच्यानंतर संजय कुलकर्णी तीथ कार्यकारी अभियंता म्हणून होते आता ते सहशहर अभियंता म्हणून आलेत. आता आपण बॉण्ड काढतो त्यावेळेला मी म्हणलो होतो की स्पेशल परपज करा त्याच्यानंतर लॅण्डबँक तयार होईल, बेटरमेंट चार्जेस नदीसुधारमध्ये लोकांना लावा त्याच्यातन साधारणपणे महापालिकेला पंधरा ते वीस हजार कोटी रुपये किंवा लॅण्डबँक जमा होईल त्याच्यातन हे शहर आपल्याला सिंगापूरच्या धर्तीवर डेव्हलप करता येईल पण आजपर्यंत ती गोष्ट झालेली नाही. याच्यामध्ये बारा लोक आहेत मा. महापौर, पिं.चिं.मनपा. मा. अध्यक्ष, स्थायी समिती, पिं.चिं.मनपा, मा. सभागृह नेते, पिं.चिं.मनपा, मा. आयुक्त, पिं.चिं.मनपा. (मुख्य कार्यकारी अधिकारी), मा. विरोधी पक्षनेते, पिं.चिं.मनपा, मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा, मा. मुख्याधिकारी, PMRDA, मा. शहर अभियंता, पिं.चिं.मनपा, मा.मुख्य अभियंता, पुणे जलसंपदा विभाग, मा. सहशहर अभियंता, पर्यावरण, पिं.चिं.मनपा, मा. उपसंचालक, नगररचना विभाग, पिं.चिं.मनपा, मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पिं.चिं.मनपा. अशा बारा जणांची नियुक्ती केलेली आहे. या पर्यावरणाच्या दृष्टीने प्रत्येकाची जबाबदारी आहे प्रत्येकाच कर्तव्य आहे की पिंपरी चिंचवड शहरामध्ये पर्यावरण कसं राहील पाहीजे, कसं सुधारल पाहीजे म्हणजे नुसती नदी सुधार नाही इथ एन्व्हायरमेंट आहे, जलप्रदुषण आहे, हवा प्रदुषण आहे, ध्वनी प्रदुषण आहे याच्यावरती कंट्रोल आल पाहीजे या दृष्टिने सगळयानी काम करण योग्य आणि गरजेच होतं. पण आजपर्यंत ते पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये कधीही केल गेलेल नाही. त्याच्या व्यतीरीक्त यांनी मागच्यावेळेला म्हणजे जेव्हा विलास मडिगेरी स्थायीचे चेअरमन होते त्यावेळेस रात्री तीन वाजेपर्यंत बसून १४६ कोटीच पवना आणि इंद्रायणीच टेंडर काढल वास्तविक पाहता त्याला एनजीटीची मंजूरी नव्हती ते काम आता कुठ आणि कितपत पोहचलेल आहे. म्हणजे फक्त टेंडरमधुन पैशासाठी हे काढल होतं का. अमृत योजनामध्ये केंद्राचे एवढे पैसे आले की प्रत्येक ठिकाणी प्रत्येक प्रभागामध्ये ड्रेनेज लाईन आणि स्ट्रॅर्म लाईन वेगळया करायच्या होत्या नवीन लाईनी टाकायच्या होत्या अमृतच काम आजपर्यंत का झालेल नाही. मी माझ्या प्रभागात चार वर्षे झालय एकच लाईन टाकतो हजार एमएमची भाटनगरपासून कासारवाडी

एसटीपी पर्यंत. चार वर्षात चार एक्झिक्यूटीव्ह ईंजिनीअर झालेत अजूनपर्यंत ते काम पुर्ण झालेल नाही. माझ्या प्रभागात चार पंप हाऊस आहेत चारही पंप हाऊसच पाणी नदीत जातय आणि उलट आपण पंपींग करुन भाटनगर एसटीपीला घेतो आणि तीथन फिल्टर करतो म्हणजे भाटनगर एसटीपी पर्यंत पाणी पोहचतच नाही. म्हणजे नुसता भोंगळ कारभार चाललेला आहे टेंडर काढायचे नंतर त्याची अमौंट वाढवायची, काम करायच नाही. एनजीटीची परमीशन नसताना हे उदयोग करुन टेंडर काढल त्याच्या विरोधात मला स्वत:ला कोर्टात जाव लागल. मी कुठल्या पक्षाचा प्रतिनीधी म्हणून किंवा लोकप्रतिनिधी म्हणून बोलत नाहीतर पिंपरी चिंचवडचा नागरीक म्हणून बोलतोय आणि मला या शहराच्या पर्यावरणाची काळजी आहे म्हणून हे करतो. आजपर्यंत आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेत नदीसुधारसाठी किंवा पर्यावरणासाठी किती कोट रुपये खर्च केला, आतापर्यंत किती अहवाल आले. आपला पर्यावरण विभाग करतय काय फक्त कागदी घोडे नाचवतय का. आता इथ जे विरोधी पक्षात बसले राष्ट्रवादी पण असतील आणि बीजेपी पण असतील पर्यावरणासाठी या दोन्ही पक्षाने आजपर्यंत काय केलय. माझ म्हणण एक आहे की जर हे करायच आहेतर फुलप्लेस मध्ये करा. आयुक्त साहेब मी तुम्हांला पहील्याच जीबीला म्हणल होत की तुम्हांला चांगल काम करण्याची ही संधी आहे. मी पहील्या पासून तुमच्या कामाची हातोटी बघीतलेली आहे तुम्ही विनाकारण कुणाला वेळ देत नाहीत आणि कामाच्या व्यतिरीक्त बोलतही नाहीत. पण आज महापालिकेनी एवढ करुन एवढा खर्च करुन आजपर्यंत पवना नदी, मुळा नदी, इंद्रायणीनदी यांच्यासाठी केल काय. हे सगळ तुम्ही करा एसपीव्ही झालीच पाहीजे, बॉण्ड आलेच पाहीजे, बॉण्डच्या माध्यमातून ही नदी सुधार योग्य आणि चांगल्या पध्दतीची होईल पण याच्यामध्ये पारदर्शकपणा ठेवा. जशी स्मार्टसिटीसाठी आपण कंपनी आणली त्याच्यात पारदर्शकपणा अजीबात नाही, काय चाललय, काय होतय हे जे स्मार्टसिटीमध्ये सदस्य आहेतना तेवढयांनाच कळतय बाकीचे १२८ आणि ५ असे १३३ नगरसेवक आहेत यांना कुणालाही कळत नाही की स्मार्टसिटीमध्ये किती रक्कम आली, किती खर्च झाली, कितीचा जनसेट कितीला घेतला गेला चार ते साडेचार कोटीला पण जनसेट तीथ घेतले गेलेले आहेत. म्हणजे स्मार्टसिटीमध्ये किती कोटीचा भ्रष्टाचार झाला तसच या बॉण्ड पध्दतीने नदीसुधारमध्ये पण होणार आहे का. उद्देश चांगला आहे पण ते त्या पध्दतीने अंमलबजावणी झाली पाहीजे. मा.महापौर साहेब, तुम्ही आता संजय कुलकर्णीना क्लेअरकट आदेश दया की १४६ कोटीच जे टेंडर काढल होत पाईपलाईनच, नदीला प्यारलल लाईन करणार होते ते टेंडर काढल ते एनजीटीन का थांबवल का चालू आहे. मग जर एनजीटीची परमीशन नव्हतीतर टेंडर काढायची घाई का केली. याच्यासाठी रात्री तीन वाजेपर्यंत उदयोग केले का, सकाळी सहा वाजता जावून नारळ फोडले का. मा.महापौर साहेब, तुम्ही क्लेअरकट संजय कुलकर्णीकडून खुलासा मागवून घ्या नंतर हा विषय मंजूर करा.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वात प्रथम मी संदीप वाघेर पाटलांच मनापासून अभिनंदन करु इच्छितो. भारतीय जनता पार्टीला घरचा आहेर दिलेला आहे. स्मार्ट सिटीच्या नावाखाली कोटयावधी रुपयाचा भ्रष्टाचार आहे तो आपल्या समोर उघड होणारच आहे. दुसर म्हणजे आता एसपीव्ही ही प्रायव्हेट लिमीटेड आहे. मा.महापौर साहेब, मला असं म्हणायच आहे की जे आता संदीप वाघेरेनी मांडलेल आहे ती सत्य परिस्थिती आहे. एसपीव्ही प्रायव्हेट लि. ची कंपनी केलेली आहे आणि ते करत असताना खरच किती भयान परिस्थिती या नदयांची आहे यामध्ये पीएमआरडीए एका बाजूला, पीसीएनडीटीए दुस-या बाजूला, महापालिका एका बाजूला ही वस्तुस्थिती आहे. मा.महापौर साहेब, आपण

पण नदीच्या काठीच राहता तुम्हांला पण त्याच महत्व लक्षात आहे. मला असे म्हणायच आहे की या सगळया परिस्थिती लक्षात घेता आपल्याला खुप बारकाईने या विषयाकडे बघाव लागणार आहे. याच्यामध्ये पुर्वी पीसीएनडीटीए होती आता महापालिका आहे फक्त याच्यामध्ये आपला पर्यावरण विभाग खर्च करणार आहे का अस होणार अस नाही. हा विषय आपल्याला गांभीर्याने घ्यावा लागणार आहे. आपल्या सर्वांना सुजलाम, सुफलाम करावा लागणार त्यासाठी कोटयावधी रुपये आपण खर्च करतो. कुठलाही खर्च करत असताना सर्वात चांगली गोष्टी जी आहे ते पाणी आहे आणि ते पाणी जर आपण निर्मळ आणि स्वच्छ देवू शकणार नसू आणि त्याच नियोजन आपण व्यवस्थीत केल नाहीतर आपल्याला हे शहर माफ करणार नाही. दुस-या बाजूला आपली औदयोगीक एमआयडीसी आहे एमआयडीसीच पण घाणेरड पाणी यामध्ये येतय त्या लोकांचा पण सहभाग यामध्ये असला पाहीजे त्या लोकांना पण घेतल पाहीजे म्हणून या गोष्टीचा या विषयावर आपण सर्वांनी अभ्यास केला पाहीजे, अभ्यास करुनच आपण हा विषय ख-या अर्थाने सर्वांनी याच्यामध्ये चर्चा करुन घ्यायला पाहीजे. आजची आपण ही काही ऑनलाईन मिटींग घेतो या ऑनलाईन मिटींगमध्ये तुम्ही मला बोलायची संधी दिली त्याबद्दल पुन्हा मी आपले आभार मानतो परंतु अनेकांना आवाज ऐकायला येत नाही अनेकांना अनेक प्रॉब्लेम आहेत. हा विषय आणि याच्या पुढचा पण विषय महत्वाचे विषय आहेत या महत्वाच्या विषयाला माझी आपल्याला विनंती आहे की मा.पालकमंत्र्यांनी असं सूचित केल होत की साधारण २ ऑक्टोबर नंतर कदाचित आपल्याकड कोवीड बद्दलची जी काही शिथीलता आहे ती येण्याची शक्यता आहे, तुमच्या मनामध्ये पण काही नाही. माझी आपल्याला अशी विनंती असणार आहे जे महत्वाचे विषय आहेत त्यामध्ये सर्वाचा सहभाग घ्यावा सभागृहामध्ये याचेवर सादकबाधक चर्चा व्हावी, विचारांची देवाणघेवाण व्हावी आणि मग असे विषय तेव्हा आपण मंजूर करावे. सहा नंबरचा पण विषय असाच आहे तोपर्यंत हे दोन विषय आपण तहकूब करावेत आपल्याला याच्यावर सादकबाधक चर्चा करता येईल. आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा ख-या अर्थाने शहराला काय पाहीजेल आणि आपण काय केल पाहीजेल. तेव्हा माझी आपल्याला अशी विनंती आहे हे दोन विषय जर आपण तहकूब ठेवले आणि पुढच्या वेळेला ज्यावेळेला सभागृहामध्ये आपण बोलू त्यावेळेला सर्वांना बोलण्याची आपण संधी दयाल, त्यांचे विचार ऐकूण घ्या, धन्यवाद.

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर महापौर साहेब, अत्यंत महत्वाचा आणि शहराचा जिव्हाळयाचा विषयाची आपण चर्चा करत आहोत. पवना आणि इंद्रायणी नदीच्या सविस्तर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी आपण एसपीव्ही ही संस्था स्थापन करतो. मा.महापौर साहेब, तुम्हांला माहीती असेल की आपण सर्वजण तुम्ही होते, पक्षनेते होते त्याचप्रमाणे श्रावणजी हार्डीकर साहेब होते आणि सर्वपक्षीच गटनेते होते यांची एक मिटींग पुण्यामध्ये झाली, मिटींग झाल्यानंतर पवना आणि इंद्रायणीनदी सुधार प्रकल्पा संदर्भात सखोल चर्चा त्याठिकाणी करण्यात आली आणि त्याच्यानंतर ही कंपनी स्थापन करण्यात आली याच्यामध्ये महापौर असतील, अध्यक्ष असतील, आयुक्त असतील आणि याच्यामधुन सर्वपक्षीय गटनेत्यांना डावलण्यात आलेल आहे. याच्याविषयी मी तुमच्याशी पत्रव्यवहार केला, हार्डीकर साहेब असताना सुध्दा पत्रव्यवहार केला पण हार्डीकर साहेबांनी मला सांगीतल की या समावेशासाठी तुम्हांला पक्षनेत्यांची आणि मा.महापौरांची मान्यता घ्यावी लागेल त्याच्यानंतरच सर्वपक्षीय गटनेत्यांचा याच्यामध्ये समावेश करण्यात येतो. पुणे महानगरपालिकेमध्ये सर्वपक्षीय गटनेत्यांना याच्यामध्ये सामावून घेतलेल आहे. मग आपल्या

महानगरपलिकेनी याविषयी का दुजाभाव केला यासंदर्भात मी तुमच्याकडे पत्र सुध्दा दिल आहे परंतु त्याच एकही उत्तर मला मिळालेल नाही.

माझी आपणास अशी विनंती आहे की पिंपरी चिंचवड शहरातून वाहणा-या नदयांच्या पुनर्रजीवन प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी विशेष उद्देश वहन एसपीव्ही स्थापान करण्यात येणार आहे यामध्ये सर्वपक्षीय गटनेता यांची सुध्दा नियुक्ती करण्यात यावी जेणेकरुन सर्वपक्षीय गटनेता/लोकप्रतिनिधी यांना त्यांचे मत व विचार मांडता येतील व नदी सुधार प्रकल्पास हातभार लागेल, धन्यवाद.

मा.अजीत गव्हाणे- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. योगेश भाईनी सांगीतल्याप्रमाणे हा चार नंबर विषय चालू आहे का सहा नंबर चालू हे आम्हांला कुणालाही माहीत नाही आपण अंदाजे म्हणतो हा चार नंबर आहे. मा.महापौर साहेब, ऑनलाईन सभा आहे आमची आपल्याला मगाशी पण विनंती होती आम्हांला ऐकू येत नाही ही सिस्टीम जी आहे, आज ठिक आहेत आपल्याला आदेश आहेत ऑनलाईन सभा घ्यायची म्हणून आपण ऑनलाईन घेतो. परंतु ऑनलाईन सभा घेत असताना ही जी सिस्टीम आहे ती प्रॉपर असली पाहीजे, प्रत्येकाला त्याचा आवाज व्यवस्थीत ऐकू आला पाहीजे. मगाशी जे घडल ते आम्हांला तुम्ही कोणीही स्क्रीनवर पण दिसत नव्हते आणि याठिकाणी काही ऐकू येत नव्हतं आणि आम्ही तुम्हांला विनंती करत होतो की हा जो काही दोन नंबरचा विषय आहे त्याला जी तुम्ही उपसूचना वाचली ती आम्हांला कुणालाही ऐकू आलेल नाही. मगाशी नामदेव राव आम्हांला म्हणाले की त्याची झेरॉक्स प्रत देवू किंवा व्हॉटसअप करु मा.महापौर साहेब मुळात ही पध्दत चुकीची आहे. आम्हांला ती जी उपसूचना आहे ती नीट ऐकायला आली नाही ती तुम्ही वाचायला पाहीजे परंतु नामदेवराव तुम्ही अत्यंत चुकीच्या पध्दतीने सभागृह चालवताय, अशा पध्दतीने चालवलतर गोंधळच होणार आहे. मा.महापौर साहेब, आणि आयुक्त साहेब या दोन्ही विषयाच्या संदर्भात संदीप वाघेरेनी या विषयामध्ये ब-याच दिवसापासून खुप सहभाग घेतला, तुम्ही घाईघाईमध्ये त्या प्रकल्पाचा नारळही फोडला आणि काम सुरु करण्याच्या दृष्टिने विचार केला होता परंतु अजुनही भरपूर कामकाज त्याच्यातल पेन्डीग आहे असं असताना इतकी घाई करण्याच कारण काय आहे. कारण हा विषय चांगला आहे आज तुम्ही कुठल्याही कानाकोप-यात

गेलातर नदयाच्या बाजूनी शहर वसली आहेत आणि त्यांच्या बाजूनी जी काय डेव्हलपमेंट होती त्याठिकाणी प्रिमीएम ती लोक देतात म्हणजे अधिकचे पैसे शासनाला किंवा त्या संबंधित महापालिकेला किंवा त्या त्या ठिकाणची जे लोक कोणी काम करतील त्यांना अधिकचे पैसे मिळू शकतात अशा पध्दतीचा हा विषय आहे. यामुळे या इतक्या महत्वाच्या विषयाला अशा पध्दतीने घाई घाईने तुम्ही मागेही केल आणि पुन्हा आता असे, तरी आता योगेश बहल यांनी जी विनंती मांडलेली आहे तीच माझीही विनंती राहणार आहे की तुम्ही हा विषय जनरल बॉडीसमोर आणा, सगळया सभासदांना नेमका हा विषय कळला पाहीजे. आपल्या शहरामध्ये ज्या काही तीन नदया जातात त्याची जी काही डेव्हलपमेंट करणार आहेत त्याच जे काही प्रेझेन्टेशन असेल त्याच्यामध्ये आपण नेमक काय करणार आहोत हे सगळया सभासदांना कळाल पाहीजे. मुळातच आपण एसपीव्ही फॉर्म करतो, एसपीव्ही जेव्हा फॉर्म होईल तेव्हा आपल्याला काहीच कळणार नाही, जे कोणी कमिटीमध्ये असणार आहेत त्यांना हा विषय डिटेल्समध्ये कळणार आहे परंतु नगरसेवक म्हणून आम्हांला त्याची कुठलीही माहीती नसणार. स्मार्ट सिटीच्या बाबतीमध्ये आज आपण सगळे अज्ञानी आहोत ज्या त्या प्रभागामध्ये स्मार्ट सिटीच

काम होत त्याची माहीती कुणाला नसते. त्या रस्त्याची परत परत खोदाई केली जाते हे स्थापत्य विभागाला माहीती नसतं आणि त्याठिकाणी ज्या काही अडचणी निर्माण होतात त्याला हे अशा चुकीच्या पध्दतीने कामकाज चालू आहे त्याच्यामुळे या अडचणी निर्माण होतात. त्याच्यामुळ जे स्मार्ट सिटीत घडलय आता मी त्याच्या खोलात आता बोलणार नाही कारण स्मार्ट सिटीमध्ये तुम्ही वेगवगळया पध्दतीने मेन कॉन्ट्रॅक्टर्स वेगळे, सब कॉन्ट्रॅक्टर्स वेगळे, प्रत्येक्ष काम करताना अडचणी निर्माण होतात. परवा दिवशी सुध्दा आपल्या एका नगरसेविकेनी तीथ अंदोलन केल आणि त्या नंतर जे काही घडल ते शहरानी पाहील परंतु त्याच्यामध्ये मुळ विषय काय होता गणपती उत्सव होता आणि गणपती उत्सवामध्ये तीथ खोदाईच काम चालू होतं आणि ती खोदाई तीथल्या संबंधित नगरसेवकांना माहीत नव्हती अशा प्रकारची त्यांची भूमीका होती तशा पध्दतीने प्रशासनाला भेटले होते आणि हीच तक्रार आमची सगळयांची महापौर आहे आणि मग अशा पध्दतीने जर काम होणार असेलतर ते आपल्या शहराच्या हिताच्या दृष्टिकोनातून अत्यंत चुकीच आहे आणि तीच परिस्थिती आता तुम्ही एसपीव्ही फॉर्म करणार आहात आता सचिन चिखलेनी विषय मांडला की गटनेत्यांना सुध्दा तुम्ही त्याच्यामध्ये सामावून घेतल तर निश्चितपणे त्यांचाही त्याठिकाणी विचार होईल आणि त्यांच्या ज्या काही सुचना आहेत त्यांचा अंतरभाव त्यामध्ये करु शकतो. आता आपण बॉण्ड घ्यायच ठरवतो अनेक महानगरपालिकेची याठिकाणी आपण नाव दिलेली आहेत. मध्यंतरी बॉण्डच्या संदर्भात माहीती घेण्याचा प्रयत्न केला. बॉण्ड घेतल्याने आपल्या महापालिकेची नक्कीच जी काही पत आहे ती मार्केट मध्ये कळते आणि त्याचा फायदा आपल्याला भविष्यकाळात निश्चितपणे होणार आहे. त्याच्यातून आपल्याला जे काही पैसे उभे राहणार आहेत त्याच्यामध्ये जो काही इन्ट्रेस्ट आहे तो आपल्याला निश्चितपणे कमी असणार आहे परंतु हे करत असताना भविष्यकाळामध्ये आपण जे काही या बॉण्डच्या माध्यमातून पैसे उभे करु आणि त्याचे जे रिटर्नस दयायचे आहेत ते रिटर्नस सुध्दा वेळचेवेळेला गेले पाहीजेत. आज आपल्या महापालिकेची परिस्थिती अत्यंत चांगली आहे परंतु उदयाच्या काळामध्ये जर आपली आर्थीक परिस्थिती ढासळली, इथून मागच्या काळात आपण कर्ज का घेतले नाहीतर आपल्याला भविष्यामध्ये ज्या काही अडचणी निर्माण झाल्यातर त्या कर्जाची परतफेड करता येणार नाही आणि आता ही आपली महापालिका अतीशय सक्षम आहे आपण अनेक प्रकल्प केलेले आहेत आणि ते आपल्या स्वत:च्या पैशातून केलेत परंतु हे जर करायच असेलतर त्या बॉण्डमधून जो काही निधी उभा राहणार आहे त्याच्यातून जे काही रिटर्नस आपल्याला दयावे लागणार आहेत त्याचा अभ्यासपुर्वक विचार झाला पाहीजे. नाहीतर पुढ जावून असं नको व्हायला की आपण घाईघाईत चुकीचा निर्णय घेतला, पुढ जावून आर्थीक अडचण आपल्याला येवू शकते. आपण आता यामध्ये उल्लेख केलेला आहे जो काही नदीच्या बाजूने प्रोजेक्ट होणार आहेत, नदीच्या बाजूने ज्या काही जागा आहेत त्या जागामध्ये जेव्हा काही डेव्हलपमेंट होणार आहे त्याच्यामध्ये आपण ऍडीशनल त्या लोकांना प्रिमीएम चार्ज करु शकतो आणि प्लॅन्ट सिटी, तो प्लॅन्ट ऐरीया आपल्याला करता येवू शकतो. त्यामुळ हा अत्यंत महत्वाचा विषय आहे यामध्ये घाई न करता येणारी जी सभा होईल त्यामध्ये हा विषय मंजूर करावा अशाप्रकारची मी आपल्याला विनंती करतो, धन्यवाद.

मा.मंगला कदम - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताचा जो विषय आहे तो महत्वाचा विषय आहे, आपण कोणताही विषय करायचा असेलतर या विषया मधला पहीला कॉलम आहे शहरातून वाहणा-या नदीपात्राची जागा महाराष्ट्र शासनाच्या महसुल विभागाकडून मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत देखभाल, दुरुस्तीकामी SPV कडे हस्तांतरीत

करुन घेणेबाबत आणि मा.महापौर मी सांगते विषय क्रमांक ४ व ६ करण्याची गडबड का करु नये यासाठी मी तुम्हांला सांगते की मा.महापौर तुमच  नाव आता येईल परंतु ज्यावेळेस खरोखरच काम चालू होणार आहे त्यावेळेला तुम्ही तीथे पदसिध्द महापौर नसणार. त्यामुळ मा.महापौर साहेब, मला असं वाटत की शहरानी तुमच्याकडे बघताना कमीत कमी तुम्ही अभ्यास करुन हा विषय करावा कारण हा विषय फार मोठा आहे. महापालिकेला कमीतकमी या महापौरांच्या काळात कर्जबाजारी झाले असतरी आपल्यावर वेळ येवू नये आणि म्हणून हा विषय करताना काहीही गडबड करायची गरज आहे असं मलातरी वाटत नाही. हा विषय खुप पुर्वीपासून सुध्दा चाललेला आहे. ही एसपीव्ही होणार आहे याच्यानंतर परत हा विषय सभागृहात येणार नाही आणि जे पदसिध्द जे बारा लोक असतील तेच त्या मिटींगला जातील परस्पर ते निर्णय घेतील त्यामुळे हा विषय गडबड करुन करावा अशी कुठलीही याच्यात काही गरज आहे अस मला वाटत नाही. आणि म्हणून हा विषय अभ्यासासाठी तहकूब ठेवा. सगळयांना अभ्यास करु दयात, तुमच्याही नागरीकांना, तुमच्याही नगरसेवकांना कळूदेत. आता संदीप वाघेरे बोलले ते एक नागरीक म्हणून बोलले ते नगरसेवक आहेत भाजपचे नगरसेवक आहेत त्याच्यात चुकून त्यांच्या तोडून विरोधीपक्ष नेत्यांच पण नाव गेल. विरोधी पक्षनेते आम्ही सगळे लोक जागृक  आहोत त्यामुळ तो विषय लांबचा परंतु हे विषय करत असताना महाराष्ट्र शासन आणि केंद्रसरकार याच्यामध्ये काय कर्ज उभ करणार आहेत, कशा पध्दतीने फंडींग होणार आहे याच्यातुन कुठला कुठला निधी येणार आहे, लॅण्डबँक तयार होणार आहे, सीएसआर आहे, पीपीई तत्वावर करणार आहेत, सीईआर हे सगळे जे काही तुमच्या प्रमाणे एसपीव्ही आहे दोनशे कोटीच कर्ज घ्यायच आहे. मगाशी अजीतभाऊनी पण सांगीतल, योगेशभाईनी पण सांगीतल की जी लोक नदीच्या कडेला असतात  ते आपल्याला याच्यामधुन निधी देवू शकतात. मा.महापौर तुम्ही महीला महापौर आहात, तुम्ही इन्डस्ट्रीमध्ये बोला सीएसआर फंडाबाबत. आपल्याकडून किती कि.मी.ची आपली नदी जाते या नदीची डेव्हलपमेंट सीएसआर फंडामधुन करु शकतात का नाही.  एक दोन सभा तीकडे बोलवा. दोनशे कोटी घेवून  कार्पोरेशनवर पुढे जर करायची वेळ आली नाहीतर चार ते पाच वर्षे बीजेपीनी जे काम केल या बीजेपीच्या कामामुळे कार्पोरेशन कर्जबाजारी झाली असं करण्यापेक्षा आणि हे पदाधिकारी परत तुम्ही पुढे कुणीही नसणार. पदसिध्द अधिकारी हेच त्यामध्ये आहेत. तरी मा.महापौर साहेब, चार नंबर आणि सहा नंबरचा विषय परत परत रिपीट करायला लागू नये याच्यासाठी अभ्यास झाला पाहीजे नुसत आपल तीथ नाव लागण्यासाठी हे होणार नाही याच्यासाठी पुढची प्रोसीजर असणार आहे.  निवडणूकीची आचारसंहीता लागेल त्या कालावधीत काहीही होणार नाही. दोन ऑक्टोबरनंतर आपल्याला सगळयांना एकमेकां समोर बसून बोलता येईल त्यावेळेला याच्यावर विचार करु यात तोपर्यंत याचा अभ्यास करु यात तोपर्यंत चार नंबर आणि सहा नंबरचा विषय तहकूब करावा अशी आमची नंम्र विनंती आहे. याच्यावरती आम्हांला पक्षीय गालबोट लावायच नाही पण हा शहराच्या नावलौकीकात भर घालाणारा नदीसुधार प्रकल्प आहे त्यादृष्टिकोनातून विचार करावा आणि वि.क्र.४ व ६ आजच्या मिटींगमध्ये तहकूब करावा आपल्याला ज्यावेळेस समोरासमोर बसून बोलता येईल त्यावेळेस हा विषय घ्यावा एवढी मी विनंती करते.

मा.वैशाली घोडेकर -   मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला पहीला प्रश्न हा विचारायचा आहे की डीपीआर तयार व्हायला किती वर्ष लागायला पाहीजे,  आज साडेतीन वर्षे झाले अजूनही डीपीआर तयार नाही आणि तरीही तुम्ही आम्हांला सांगताय की अंदाजे

दोनशे कोटी रुपये खर्च येतील. आता तुम्ही एसपीव्ही करता, एसपीव्ही याच्या आदिच व्हायला पाहीजे होती. मग साडेतीन वर्षे अधिका-यांनी काय केलं, तुम्ही काय केल. मग तुम्ही उगाचच नदयांच पुजन करत सुटलात का. त्यावेळेस तुमच्या हातात काहीच नव्हत आणि तुम्ही उदघाटन करुन मोकळे झालात. मध्ये कोणीतरी काही म्हणल राष्ट्रवादीन पण काय केल. मी म्हणाले आम्ही काही नाही केल म्हणून तुम्हांला सत्ता मिळाली तर तुम्ही काय केल हे विचारु शकतो. हा आम्हांला अधिकार आहे तुम्हांला अधिकार नाही आम्ही काय केलं. आम्ही आजपर्यंत जी प्रकल्प हातात घेतली ती लवकरात लवकर पुर्ण केली. परंतु तुम्ही नुसता प्रकल्पाचा गाजावाजा केला पण आज काय एकातरी नदीचा डीपीआर पुर्ण पाहीजे होता, किती खर्च येतो तो पण पाहीजे तर मग या सगळया गोष्टीना अर्थ होता. मी संदीप वाघेरेंच अभिनंदन करेल की ते जे म्हणले कागदी घोडे नाचवण्याच काम चालल आहे अतीशय स्पष्ट त्यांनी भाजपला हा घरचा आहेर दिलेला आहे. ख-या अर्थाने याठिकाणी दिसतय की कागदी घोडे आपण या ठिकाणी नाचवताय. दोनशे कोटीमध्ये तुम्ही दोन्ही नदयांचा प्रकल्प पुर्ण करणार आहात का हा पण तुम्ही विचार केला का आणि तुमची कर्ज घ्यायची घाई चालली एसपीव्ही करायची होतीतर आदीच व्हायला पाहीजे होती. साडेतीन वर्षानंतर तुम्ही झोपेतून जागे झालात का की आता आम्हांला एसपीव्ही करायची. डीपीआर कुठपर्यंत आला हे तुम्ही आम्हांला सांगीतल नाही. डीपीआरमध्ये काय चालल आहे हे तुम्ही आम्हांला सांगीतल नाही. इथ तुम्ही लिहील आहे की अनुभवी कंपनी. एसपीव्ही ही जी कंपनी आहे ती अनुभवी कंपनी आहे. मग अनुभव कंपनीने एका नदीचा थोडा पण डीपीआर तयार केला नाही का याची उत्तर ही आयुक्तांनी दिली पाहीजेत, सभागृहात दिली पाहीजेत. त्यामुळे योगेशभाई म्हणाले, अजीत गव्हाणे म्हणाले की हा विषय तहकूब झाला पाहीजे जेणेकरुन आम्हांला सगळयांना याच्यात जे चालल आहे ते सभागृहात ऐकण्याचा आणि उत्तर मागण्याचा अधिकार आहे. त्यामुळे मा.महापौर मी आपल्याला विनंती करेल की चार नंबरचा आणि सहा नंबरचा विषय आमच्या सगळयांच्या विनंतीला मान देवून तहकूब करावा आणि तुमच्याही डोक्यावर याच ओझ घेवू नये एवढच मी याठिकाणी सांगेल, धन्यवाद.

मा.राहूल कलाटे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एसपीव्ही कंपनी करत असताना स्मार्टसिटीच काय झाल हा देखील आपल्या सर्वांच्या समोर विषय आहे. आपण हे टेंडर काढत असताना मुळा नदीच टेंडर पुणे महापालिकेनी काढल मला वाटत त्याठिकाणी सचिन चिखले आणि मी आम्ही दोघेही प्रेझेन्टेशनला गेलो होतो. परंतु पिंपरी चिंचवड महापालिकेत देखील आपण ही कंपनी करत असताना मला असं वाटत की सगळयांना विश्वासात घेताल आताच संदीपनी सांगीतल की मी कुठल्या पक्षाचा म्हणून बोलत नाही खरतर संपुर्ण सभागृहानी संदीपच अभिनंदन केल पाहीजे की एक पिंपरी चिंचवड महापालिकेचा नागरीक आणि एक फक्त नगरसेवक मग तो भारतीय जनता पार्टीचा आहे का राष्ट्रवादीचा का शिवसेनेचा अशी कुठलीही वाच्छता न करता त्यांनी एक विदारक गोष्ट झाली खरतर त्याच्या मनातल तो बोलला आणि ते माई घेण्यासारख आहे. ही कंपनी सुरु असताना सीएसआर काय होणार, सीईआरच काय होणार आणि जर या कंपनीचा स्मार्टसिटीसारखा भ्रष्टाचाराच कुरण म्हणून वापर झालातर त्याच पुढे काय होणार. तुम्ही एसपीव्ही कंपनी करण्यापेक्षा जर एक विभाग केलातर मला वाटत माई जाता जाता हे असे बॉण्ड काढण आणि कर्ज उभारणं कुठलही कर्ज घेताना ते कर्ज आपण रीटर्न कसं करु, कशा पध्दतीने ते कर्ज फेडाव लागेल या सगळया गोष्टीचा अंतर्भाव कुठतरी खरतर या करारात असायला पाहीजे होता. करारात नसेलतर डॉकेट

असेलतर तुम्ही सर्व सदस्यांना डॅकेट देखील दयायला पाहीजे होतं. खरतर या तीन्ही नदया डेव्हलप होणं हे गरजेच आहे. परंतु त्या डेव्हलप होत असताना नुसते नदीकाठ जरी तुम्ही सुधारलेतरी त्यातून जाणा-या पाण्याच काय. आज जर आपण पवना नाही पाहीली, मुळा नाही पाहीलीतर अक्षरश: त्याठिकाणी गटर झालय तर त्या पाण्याच शुध्दीकरणाच काय. प्रत्येक नाल्याचा तुम्ही अंतर्भाव केलेला आहे का कुठतरी कन्सलटंट नेमायचा आणि त्यांच डॉकेट तयार करायच आणि त्याच प्रेझेन्टेशन हे ठरावीक लोकांना दयायच आणि मग आता जे संदीपन सांगीतल टक्केवारीसाठी तर आपण टेंडर काढण्याची घाई करत नाहीतनां अशी शंका येते. जर आपण नदीचा काठ सुधारलातर, तुम्ही घेणार पवना जल वाहीनी. मग तुम्ही कुठलही काम न करता खरतर परत तुम्ही हेच करणार का १४६ कोटीच टेंडर, तुम्ही टेंडर करणार सकाळी सहा वाजता, ज्याच तुम्ही भूमिपुजन केलं त्या कामाची काय परिस्थिती हे देखील याच्या समोर यायला पाहीजे होतं. त्या कामाला जर एनजीटीने विरोध केलेला आहे स्टेटस्को दिलायतर त्या कामाचा अंतर्भाव या डॉकेटमध्ये का नाही. म्हणजे कुठतरी अशी कंपनी घाईघाईत स्थापन करु नका. आपल्या मनात काही नसेल परंतु हे सत्ताधारी माईच्या खांदयावर बंदुक ठेवतील आणि हे करतील त्यामुळे माई तुम्ही जाता जाता असं काही न करता जस आता सचिन चिखलेनी सांगीतल त्याठिकाणी प्रत्येक पक्षाचा एक प्रतिनीधी पाहीजे.

मी याठिकाणी उपसूचना देतो की आपण प्रत्येक पक्षाचा गटनेता त्याठिकाणी नेमावा आणि हा विषय मंजूर करणार असालतर उपसूचनेसह हा विषय मंजूर करावा. आदरवाईज पक्षनेते माझी आपल्याला विनंती आहे कर्जरोखे उभारतोय आपण त्याच्या व्याजाच मीटर सुरु होईल त्याच किती वर्षे काय वर्षे, किती काळ या सगळया गोष्टीचा व्यवस्थीत अभ्यास झाला पाहीजे. या विषयाला आमचा विरोध नाही परंतु आज ही कंपनी करण्याला आमचा विरोध आहे. त्यामुळ माई माझी आपणाला विनंती आहे की आपण या विषयाच व्यवस्थीतपणे प्रेझेन्टेशन दयाव, दौ-याला किती खर्च आला आजपर्यंत ज्याच्यावर आपण दिडशे कोटी खर्च केलेला आहे त्याच काय झाल. हा विषय शहराच्या अतीशय जिव्हाळयाचा आहे, शहरातल्या जलवाहीन्यांचा विषय आहे हे होत असताना तुम्ही घाई करु नका. कुठतरी कर्ज उभारुन कुठतरी तुमच्या डोक्यावर घेवू नका की माईन त्यावेळेस कर्ज काढायला लावल. याचा एक विभाग जरी करता आला तरी त्याचा देखील आपण विचार करावा आणि माई याची घाई न करता आपण हा विषय तहकूब करावा अशी मी विनंती करतो.

मा.सचिन चिखले - मा.महापौर साहेब, राहूलजीन जी उपसूचना मांडली त्याला मी अनुमोदन देतो.

मा.महापौर – खालीबसा, मिसाळ साहेब तुम्ही बोला.

मा.राजू मिसाळ - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमच्या सिनीअर मंडळीने हा विषय किती महत्वाचा आहे त्याबद्दल आता कल्पना दिली आहे. माई तुम्ही जाता जाता २०० कोटीच कर्ज आपण घेतो ते तुमच्या माथी लागू नये आणि हा विषय व सहा नंबरचा विषय यासाठी ज्यावेळी आपली सभा ऑफलाईन होईल, आपले सर्व नगरसेवक आहेत त्यांचे विचार त्याच्यामध्ये आपण घ्यावेत आणि हे दोन्ही विषय तहकूब ठेवावेत आता सर्वानी याबद्दल शहराच्या हिताचे हे प्रश्न आहे असे सांगीतलेले आहे. नाहीतर तुम्ही या दोन

विषयासाठी एक स्पेशल जीबी लावावी व सर्वांचे विचार आपण याच्यामध्ये घ्यावेत तोपर्यंत हे विषय तहकूब ठेवावेत अशी मी तुम्हांला विनंती करतो.

मा.नामदेव ढाके - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड शहरामधुन वाहणा-या ज्या जलवाहीन्या आहेत पवना आणि इंद्रायणी नदी या नदीच्या संदर्भामध्ये एसपीव्ही तयार करायच, एसपीव्हीला मान्यता देण्याचा विषय आज याठिकाणी आलेला आहे. योगेशभाईनी उल्लेख केला की संदिप वाघेरेनी घरचा आहेर दिलेला आहे परंतु संदिप वाघेरे नदी सुधार प्रकल्पाच्या बाबतीत वारंवार कुलकर्णीच्या बरोबर तो नदी सुधार प्रकल्प चांगला व्हावा हा मुळ उद्देश डोळया समोर ठेवून त्याठिकाणी ते बोलत असतात. याचा अर्थ असा नाही की भारतीय जनता पार्टीचा नगरसेवक आहे आणि मग तो घरचा आहेर देतो परंतु त्यांची जी काही मांडण्याची भूमिका आहे ती अतीशय स्वच्छ आणि प्रमाणिकपणे आहे. हा जो काही नदी सुधारचा प्रोजेक्ट आहे तो शहरामध्ये अतीशय जलदगतीने झाला पाहीजे अशाप्रकारची भूमीका याठिकाणी संदीप वाघेरेनी मांडलेली आहे. परंतु उगीचच त्याला घरचा आहेर आणि अस चुकीच देण्याचा प्रयत्न याठिकाणी सभागृहामध्ये केलेला आहे. खर म्हणजे मा.महापौर मी आपल्याला सुध्दा सांगीतल की विषय क्रमांक २ ला उपसूचना दिल्याच्या नंतर मी स्वत: सांगीतल कि प्रत्यक्ष शिपाया मार्फत ती प्रिन्ट पाठवतो. व्हॉटसप वरती पाठवतो असा उल्लेख मी याठिकाणी केला नाही. मा.महापौर साहेब आपणच म्हणलात विषय क्रमांक दोन आणि तीन मंजूर झालेला आहे आणि याठिकाणी विषय क्रमांक ४ चालू झालेला आहे त्यामुळे विषय क्रमांक ४ वरती बोला. त्यामुळे सभागृहामध्ये किंवा सन्मानीयांची दिशाभूल करण्याचा याच्यामागे उद्देश दिसतोय. मा.महापौर साहेब, मला सभागृहाला सांगायच आहे की गेल्या अनेक वर्षापासून पवना आणि इंद्रायणी नदी आपण बघतो. २०१७ ला भारतीय जनता पार्टीची सत्ता या महापालिकेमध्ये आली आणि आम्हांला कुठतरी वाटल की खर म्हणजे या नदया ज्या आहेत त्या आपल्या शहरातल्या रक्तवाहीन्या आहेत आणि शहरातल हे वैभव आहे आणि हे कुठतरी चांगल झाल पाहीजे ही भूमीका त्यावेळेला आम्ही घेतली. मला वाटत मागच्या काळामध्ये ज्या सन्मननीयांनी याठिकाणी उल्लेख केला आपण घाईघाईने आणू नये किंवा आता लगेच घेवू नये सहा नंबरचा विषय आहे त्यावरती मी सविस्तर बोलणार आहे. परंतु आजचा जो काही विषय याठिकाणी आलेला आहे खर म्हणजे २०१७ च्या अगोदरची नदयांची परिस्थिती काय होती हे आपण बघीतल नदयांना एमपीसीबीच्या मार्फत किती नोटीसा आल्या याच्यावरती कुणी अभ्यास केला का मागच्या काळामध्ये. आपली सर्व टिम अहमदाबादला जावून आल्याच्यानंतर चांगला प्रोजेक्ट जर महापालिकेमध्ये अंतर्भूत आपण करत असणारतर तो चांगला प्रोजेक्ट आहे त्यामुळे विरोधकाना त्यांच्या मतामध्ये आज हा प्रोजेक्ट झाल्याच्यानंतर भारतीय जनता पार्टीने एक चांगली भूमीका या शहरासाठी मांडली. असा प्रकल्प होत असताना त्यांना साहजीक कुठतरी थोडस वाटणारच आहे की हा चांगला प्रोजेक्ट याठिकाणी होतोय आणि म्हणून याठिकाणी अशाप्रकारच वक्तव्य विरोधीपक्षाच्या माध्यमातून केल जातय. मला एक उल्लेख करायचा आहे की ज्यावेळेला या विषयाकडे थोडस डोकावून जर बघीतलतर जून २०१८ च्या महासभेमध्ये त्यावेळेला आपण एस.टी.पी. डिझाइनिंग अँड प्लॅनिंग मॅनेजमेंट प्रा.लि. या प्रकल्पाला आपण त्यावेळेला मंजूरी दिलेली आहे. विरोधकाना असं वाटत की सन्मा.महापौरांना आपण बोललो की जाता जाता तुम्ही काही करु नका परंतु महापौर आपण आहेत मी पदाधिकारी आहे भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून हा विषय अतीशय चांगला आणलेला असताना, इथ महापौर, पक्षनेता किंवा विरोधी पक्षनेता हे महत्वाच नसुन

शहर महत्वाच आहे आणि शहरासाठी हा अतीशय चांगला प्रोजेक्ट आहे. शासनाकडे आपण ईसीएला पाठवलेल आहे आणि खर म्हणजे सभागृहामध्ये हा विषय आणत असताना एसपीव्ही आपणच करतोय का, पुणे महापालिकेनी केल आहे, आपण अहमदाबादला सुध्दा बघीतल चांगल याठिकाणी आलय आणि याठिकाणी सांगीतल की घाईघाईने आणलेल आहे. सन्मा.महापौर मी आपल्याला पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवीपुर्वक सांगतो की २५/४/२०१८ ला ठराव क्रमांक २५९० च्या माध्यमातून विषयपत्रीकेमधुनच ते दिलेल आहे की त्याला आपण मान्यता दिलेली आहे या नदी प्रकल्पासाठी. याला स्थायी समितीने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे त्याचा डीपीआर तयार झालेला आहे हा अंतीम टप्प्यामध्ये आहे आणि अंतीम टप्पयामध्ये असताना त्याला अशाप्रकारच एसपीव्ही स्थापन करण हे मँडेटरी बंधनकारक असत आणि म्हणून त्याला या महासभेमध्ये मान्यता दयायची आहे. एसपीव्ही स्थापन करायची त्याच्यामध्ये असणारे सदस्य ते याठिकाणी दिलेले आहेत त्याच्यामध्ये आपण म्हणत नाही उषा उर्फ माई ढोरेंच नाव पदसिध्द करा म्हणून किंवा नामदेव ढाके यांच पदसिध्द नाव करा. त्याठिकाणी पदसिध्द असणारे महापौर, सभागृहनेते, विरोधी पक्षनेते आणि जे काही अधिकारी आहेत त्यांच नाव लावतो. मागच्या काळामध्ये काय झाल ते आपल्या सगळयांना माहीती आहे त्या संदर्भात मी बोलणार नाही परंतु ज्यांनी ज्यांनी याठिकाणी उल्लेख केला. खर म्हणजे हा एक एसपीव्ही करण्याचा उद्देश आहे व्यक्तीगत नाव लावण्याचा हा उद्देश नाही. या विषयी सन्मा. जिल्हयाच्या पालकमंत्र्यांनी सुध्दा सांगीतल की जलदगतीने हा विषय आपल्याला घेतला पाहीजे. ईसीए ला स्वत: पालकमंत्र्यांनी सुध्दा त्याठिकाणी भूमीका मांडली आहे. त्या ईसीए च्या संदर्भामध्ये पाठपुरावा ते सुध्दा करत आहेत मग असा चांगला प्रोजेक्ट असताना फक्त त्याला मोडा घालायचा, थांबावयाचा अशा प्रकारची विरोधकांची भुमिका या ठिकाणी दिसते. सन्मा. महापौर व या संदर्भामध्ये आज या ठिकाणी चांगल्या पध्दतीने प्रोजेक्ट असताना खरं म्हणजे या ठिकाणी शिवसेनेचे गटनेत्यांनी उल्लेख केला की गटार झालेली आहे ५ वर्षाच्यामध्ये कमीतकमी या महापालिकेच्या दोन्ही नदयामध्ये जी आवस्था बघा आज काय परिस्थिती आहे. आपण स्वत: पवना घाटावरुन येतो इंद्रायणी नदीची आवस्था बघीतली अनेक ड्रेनेज लाइन टाकून त्याठिकाणी असणा-या कंपनींना वारंवार नोटीसा देऊन ते थांबवण्याच काम इन्डस्ट्रीच्या अनेक माध्यमातुन मा.महापौर या सभागृहाचे आपण सर्व पदाधिकारी यांचे वतीने केले आहे. आणि म्हणुन सन्मा. महापौर खरं म्हणजे हा विषय अतिशय चांगला आहे आणि २०० कोटी कर्ज रोखे संदर्भात पुढच्या विषयावर मी बोलणार आहे. तो विस्तृत स्वरुपामध्ये त्याची आपण कशा प्रकारे काय करणार आहे मला असं वाटतय की सन्मा. सभासदांनी आपल्या सन्मा. नगरसेवकांनी या संदर्भामध्ये वाचला, या ठिकाणी उल्लेख केला की आपण घाई घाईने आणता कामा नये. ज्या वेळी २०१८ ला सभागृहाची मान्यता घेतली त्यावेळेला त्याच प्रेझेंटेशन या सभागृहामध्ये आपल्या पर्यावरण विभागाचे मार्फत आपल्या सन्मा. सर्वांना या ठिकाणी कशा पध्दतीचा हा डी पी आर असेल. नदी सुधार कशा पध्दतीने असेल. काय काय उपाययोजना त्याच्यामध्ये केल्या जातील त्याची प्रोसेस काय असणार या संदर्भात त्या वेळेला प्रेझेंटेशन दिले. हा एक चांगला विषय शहराच्या वैभवात भर पाडणारा विषय आहे आणि त्या वेळेला नगरसेवक, पदाधिकारी एका शहरामधुन एखादा विषय चांगला घेऊन आले आणि एस.पी.व्ही. जी काय कंपनी आहे एक चांगला अनुभव या कंपनीचा आहे. चांगला उपक्रम शहराच्या दोन्ही नद्यांच्या माध्यमातुन या ठिकाणी होतोय. पर्यावरणाचा -हास जो काही नद्यांच्या माध्यमातुन होतोय त्याला कुठे तरी आळा बसुन हे शहर चांगल्या

पध्दतीने या ठिकाणी आपल्या पुढचा उपक्रम असा आहे की या शहराचे नदयांमधुन जी काय पवना नदी आहे त्या ठिकाणी पवना नदीमधुन फयुचरमध्ये बघितले तर बोटीच्यामधुन प्रवासी त्याठिकाणी नेता येतील का या विषयी एका बाजूने आपण विचार करतोय जनतेचा ट्रॅफिकमध्ये वेळ वाया जाता कामा नये या साठी आपण वेगवेगळया सार्वजनिक सुविधा करत असताना नदी सुधारच्या इंद्रायणीच्या व पवनेच्या माध्यमातून सुध्दा आपण विचाराधीन आहोत.मा. महापौर त्यामुळे हा एक विषय चांगला शहरासाठी शहराच्या वैभवात वाढ करणारा आहे त्यामुळे ज्या वेळेला भारतीय जनता पार्टीला आता सन्मा.सदस्यांनी या ठिकाणी उल्लेख केला योगेशभाईंनी केला, अजितभाऊनी उल्लेख केला की महापौर हा विषय तुम्ही करु नका परंतु हा विषय आपल्या शहरासाठी अतिशय उल्लेखनीय आहे व शहराच्या वैभवात भर टाकणारा आहे म्हणुन सन्मा. महापौर हा विषय याठिकाणी मंजूर करावा व फक्त एस.पी.व्ही. आणि ती सदस्य गठीत करण्याचा हा विषय क्र. ४ आहे, विषय क्र. ६ वरती आपण ते कशा पध्दतीने अंमलात आणणार आणि कशा पध्दतीने पैसे उभे करणार आहोत याबाबत मी पुढच्या विषयाला बोलणार आहे परंतु सन्मा. महापौर हा विषय आपण मंजूर करावा अशी मी आपणांस विनंती करतो.

मा. महापौर – विषय क्र. ४ बाबत ज्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध नोंदवून हा विषय मंजूर करण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल - ७२ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा. योगेश बहल – आवाज येत नाही.

मा. महापौर – विरोध नोंदवला बहल साहेब तुमचा. तुम्ही बोला.

मा. योगेश बहल – मा. महापौर साहेब विशेषत: मी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की आम्ही कोणी पण विषयाला विरोध केलेला नाही. नीट समजून घ्या. आम्ही आधीच म्हटलेलय की या शहराच्या दृष्टीकोनातुन अतिशय महत्वाचा विषय आहे. आमच्या कोणाचाही तर या विषयाला विरोध नाही. आम्ही आधी सांगितले की याच्या मध्ये महत्वाचे वेगवेगळे घटक येतात त्याला एस.पी.व्ही. केली, मंजुरी दिली सगळं आम्हाला माहिती आहे परंतु या मध्ये जसं मी बोललो, मंगलताई बोलल्या, अजित गव्हाणे बोलले, राहुल कलाटे बोललेत , सचिन बोललेत, आमचा कोणाचाही विरोध नाही. आमच्यापैकी कोणी विरोध केलेला नाही. मला वाटतय फक्त पक्षनेत्यांना काय वाटतय ते पक्षनेते फक्त कामगार नेते नसुन मला वाटतय मोठे कलाकार आहेत. त्यांची कलाकारी सांगावयचीय झाली तर मा. महापौर साहेब नगरसचिवांना माझी एक विनंती की नगरसचिव मी जे बोलतोय ते मिनिटस् घ्या. महापौर साहेब ते मिनिटस घ्या कृपा करुन माझे मिनिटस घ्या. विषय क्र. २ ला ते इतके बोलले इतके बोलले की तुम्ही आम्हाला बोलू दिले नाही. एक हयाला उपसूचना दिली गेली त्या ठिकाणी महापौर साहेब मला माहित नाही तुम्हांला माहित नाही. नगरसचिवांना माहित आहे का नाही मला माहित नाही.

विषय क्र. २ ला तब्बल ६ उपसूचना दिल्या गेल्या. आणि ते म्हणाले झेरॉक्स पाठवतो आणि झेरॉक्स पाठवून मेहेरबानी केली आपण. दुसरी उपसूचना दिली ८ हॉस्पिटलची आठ हॉस्पिटलमध्ये सेंटरमध्ये डायलिसीस सेंटर सुरु करण्याची सगळयांना जागा मोफत देण्याची विरोधी पक्षनेत्यांचा वॉर्ड आहे त्या वॉर्डातील इमारत पाडणार आहेत. त्यांना मोफत जागा द्यायची त्याला भाडे आकारायचे नाही तो पण विषय आपण केला. त्याच बरोबर स्व.इंदिरा गांधी प्रसुतीगृह सांगवी येथील हॉस्पिटलचे इमारतीमध्ये Sonography, X-ray, Pathology विभाग तिथे वेगवेगळया सोयी आहेत तो पण विषय आपण मंजूर केला मा. महापौर साहेब एका विषयाला सहा उपसूचना त्या सुध्दा संपूर्ण न वाचता ही कोणती गुंडगिरी आहे हा कोणता सभाशास्त्राचा नियम आहे हे नगरसचिवांनी सांगावे. या सहाच्या सहा उपसूचना वाचल्या गेल्या का नाही तर आमची मिनिटसमध्ये ही नोंद करुन घ्या. मा. महापौर साहेब आम्ही जीव तोडून बोलत होतो एवढं ओरडत होतो आम्हांला ऐकायला येत नव्हते. तुमचे सन्मा. सदस्य तेथे आले आणि त्यांनी सांगितले की सन्मा. महापौरांना विनंती करतो की महापौर पुन्हा सभा घेतील. पक्ष नेते म्हणतात मागे जाता येत नाही. त्यांना का मागं जाता येत नाही तर त्यांचे जे काळ काम आहे ना काळं काम जे काळं काम करतात ना ते उपसूचनेच्या माध्यमातुन उपसूचनेच्या माध्यमातुन त्यांनी केलेले एक वाचली आणि सहा ढकलुन दिल्या. एक वाचली आणि सहा ढकलुन दिल्या तुमच्या मनामध्ये जर काळं नाही तुम्हांला स्वच्छ कारभार करायचाय तुम्हांला भ्रष्ट काम करायचे नाहीए तुमचे मन निर्मळ आहे तुम्ही नेते आहात तुम्ही युनियनचे लीडर आहात मग तुम्ही असं गोंधळायचं काम का करताय. का नीट वाचल्या नाहीत आता पाठवुन काय फायदा आहे आम्हांला महापौर साहेब हेच म्हणायचय की त्या वेळेला या सहाच्या सहा उपसूचना वाचल्या गेल्या असत्या सभागृहाला कळल असतं, पत्रकारांना कळल असत एक तर ऑनलाईन सभा म्हणजे काही ऐकू येत नाही तुम्ही दिसत नाही आता तुम्ही दिसताय आम्हाला ऐकू येतेय धन्यवाद त्याबद्दल. परंतु ज्या पध्दतीने हे काम गोंधळाचं काम चालू आहे. खोटं काम चालू आहे, सभा शास्त्राचे नियम धाब्यावर बसवून चालू आहे मा. महापौर साहेब सभागृह असं चालत नाही सभागृह अजिबात चालत नाही. दुसरी गोष्ट मी सांगितले की ठीक आहे. संदीपचे मी समर्थन केलं. इथपर्यंत बोललो ठीक आहे. मी विषयाला विरोध केलेला नाही. आमच्यापैकी कोणीही विषयाला विरोध केला नाही. आमची तुम्हांला फक्त विनंती आहे की ऑनलाईनमध्ये जे काय बोलले गेल जे काय बोलले जातं ते काही कळत नाही. अनेकांना बोलायची इच्छा आहे अनेकजणांना विषय समजुन घ्यायचा आहे अनेकांना यामध्ये अनेक महत्वाच्या सूचना करायच्या आहेत विरोध नाही. सूचना करायच्या आहेत.म्हणुन आम्ही तुम्हांला हात जोडून विनंती केली की तुम्ही विषय ज्या वेळेला ऑनलाईनला घेता सभागृहामध्ये चर्चा करु त्या वेळेला विषय मंजूर करा म्हणतो आम्ही. फक्त हयामध्ये बाकीच्यांचे म्हणणे काय आहे ते ऐकून घ्या, त्यांच्या सूचना काय आहेत त्या ऐकून घ्या. तुमचे सत्तारुढ पक्षनेते खूप अभ्यासू आहेत ते आम्हांला मान्य आहे. त्यांच्या अभ्यासूपणाबाबत आमच्या मनात शंका नाही. ते गुणवान आहेत. अहो ते विद्वान आहेत पण आमची अक्कल तेवढी नाही आम्हांला तेवढी अक्कल नाही आम्ही नाही त्यांच्याएवढे हुशार आम्ही ग्रास्प नाही करु शकत आम्हांला नाही एवढे बौध्दिक बौध्दिकता दिलेली आम्हांला संधी मिळते. ते किती हुशार आहेत ते मारताना प्रत्येक बॉलला छक्का मारतात म्हणुन त्यांनी २ नंबरच्या विषयाला सिक्सर मारला. एक उपसूचना वाचली सहा ढकलून दिल्या. असं किती पाप

करणार आहेत. असे किती खोटं बोलणार आहेत. मा. महापौर साहेब म्हणुन आमचं म्हणणं असे आहे म्हणुन मंगलताई पण तेच म्हणल्या की तुम्ही कदाचित अजुन चार – सहा महिने आहात चार महिने पाच महिने आहात तर तुमच्या काळामध्ये असे काय होऊ नये अशी त्यांची अपेक्षा होती आणि दुसरी गोष्ट उपसूचनासहीत मंजूर करा असं आम्ही म्हणत होतो आम्ही तुम्हांला. या ठिकाणी राहुल कलाटेंनी पण उपसूचना दिली आहे. ते म्हणाले तो विषय तुम्हांला मंजूरच करायचा तर तो उपसूचनेसह मंजूर करा. त्यामध्ये गैर काय आहे. चुकलं काय आणि या चांगल्या विषयाला कोणाचा विरोध नाही. आमचं म्हणणे तेच आहे पर्यावरण विभागाने नेमके काय केलेल आहे पर्यावरण विभाग काय करु इच्छित आहे, राज्याचे काय म्हणणे आहे, आपण काय करणार आहोत अजुन काय करता येणार आहे का एवढी घाई आपल्याला कशाला. जर विषय चांगला आहे करायचाय ना आम्ही पण म्हणतो विषय करायचा आहे, चांगला विषय आहे परंतु सर्वांचं काय मत आहे त्यांच्या काय सूचना आहेत त्या जाणुन घ्या आणि मग करा घाई कशाला करता. अजीबात यामध्ये घाई करु नये. संदीपच मी समर्थन केलतर त्यांना वाईट का वाटल. त्या वायसीएममधल कॅण्टीन त्याच माफ करा, मनपा मधल कॅण्टीन त्याचही करा. हा जनतेचा पैसा आहे महानगरपालिकेच्या अधिनियमाप्रमाणे मोफत देता येत नाही देता येत असेलतर कोणत्या कायदया खाली देता येते त्याचा पण उल्लेख करा. का आपण देतो आपण काही धर्मादाय आयुक्त म्हणून काढल नाही. लोकांच्या भल्यासाठी करतोय हे मान्य आहे तीथ आपण करावे त्याबद्दल काही म्हणण नाही. परंतु लपुनछपून काम. का नाही उपसूचना सगळया वाचल्या का नाही आम्हांला कळू दिल्या हे चुकीच आहे. तुम्ही आम्हांला बोलू दिल त्याबद्दल धन्यवाद, पुन्हा बोलू दिल त्याबद्दलही आभारी आहे.

मा.नामदेव ढाके – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सन्मा. योगेश बहलनी वि.क्र. २ चा उल्लेख केला परंतु मा.महापौर साहेब आपण सांगीतल की वि.क्र. ४ चालू आहे मी त्याच्यावरती म्हणलेलो नव्हतो कारण की एकदा तुमच्याकडून विषय मंजूर झाला तर सभाशास्त्राप्रमाणे मी सांगण योग्य नाही परंतु त्याठिकाणी आपण वि.क्र. २ मंजूर केला होता त्यानंतर आपणही सांगीतल की वि.क्र. २ व ३ मंजूर केलेला आहे त्यामुळ वि.क्र.४ वरती आपण बोला. या सभागृहामध्ये योगेशभाईनी जी काही भूमीका मांडली आहे ती बरोबर आहे त्यांना वाटतय की हे ऑफलाईन सभेमध्ये घ्या परंतु या विषयाच्या माध्यमात ज्या ज्यावेळेला प्रेझेन्टेशन झाल आहे त्याचा मी उल्लेख केला आहे मी साक्षीदार होतो त्याचा सभागृहामध्ये. मी पालकमंत्र्यांचा त्याच्यामध्ये उल्लेख केला आणि असा चांगला विषय आहे त्यामुळे हा वि.क्र.४ मंजूर करा.

मा.महापौर – वि.क्र. ४ मंजूर केलेला आहे वि.क्र. ५ वाचावा.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा. बुर्डे सुवर्णा व मा. कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१०१७७ दि.१८/८/२०२१

प्राधिकरण से.क्र.२४ येथे लाल बहादूर शास्त्री चौकाजवळ सार्वजनिक सुविधा केंद्राकरीता भूखंड आरक्षित आहे. सदर भूखंडाच्या काही भागावर जुने अग्निशामक केंद्र अस्तित्वात आहे. जुन्या अग्निशामक केंद्रामध्ये सद्य स्थितीत एकच अग्निशामक वाहन (बंब) ठेवण्याची व्यवस्था आहे. सदर व्यवस्था अपुरी असून सदर आरक्षित जागेवर नविन अग्निशामक केंद्र इमारत वैद्यकीय सुविधा केंद्रासह बांधणे आवश्यक असून सदर कामाचा मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदापत्रकामध्ये खालील नमुद प्रमाणे समावेश करुन त्याकरीता तरतूद करणे व प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय र.रु. | सन २०२१-२२ची तरतूद र.रु. | वाढ | घट | एकूण तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१५ मधील लाल बहादुर शास्त्री चौकाजवळील आरक्षित जागेवर नविन अग्निशामक केंद्र इमारत, वैद्यकीय सुविधा केंद्रासह (Medical Aid) बांधणे. | विशेष योजना | ७,००,००,००० | ० | १५,००,००० | ० | १५,००,००० |
| २ | प्रभाग क्र.१५ काचघर चौकाजवळील आरक्षित जागेवर नविन OPD इमारत बांधणे व अग्निशामक केंद्र इमारतीचे नुतणीकरण करणे. | विशेष योजना | ४,००,००,००० | १५,००,००० | ० | १५,००,००० | ० |

तरी वरील प्रमाणे कामाचा मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन तरतूद करणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-- ई क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्रमांक ७ च-होली येथील ताजणेमळा काळजेवाडी ते च-होली गाव रस्ता विकसीत करणे. तथापि सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात सदर कामाचा समावेश नसून कामाकरिता तरतूद उपलब्ध नाही. तरी सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात सदर कामाचा समावेश करुन खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरण सुचविण्यात येत आहे त्याप्रमाणे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे इतर कामातुन वाढ / घट करून सदर वर्गीकरणास व खालील प्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ क्र | लेखाशिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पान क्र. | अनु क्र. | अंदाजपत्रकीय र.रु. | सन २०२१-२२ चा मुळ अंदाज | वाढ करावयाची तरतूद | घट करावयची तरतूद | सन २०२१-२२ चा सुधारित अंदाज | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | प्रभाग क्रमांक ७ चर्होली येथील ताजणेमळा काळजेवाडी ते चर्होली गाव रस्ता विकसित करणे. | - | - | ०.०० | ०.०० | ७५०००००० | ०.०० | ७५०००००० | क्र. २ वरून १ मध्ये वर्ग |
| २ | | महापौर विकास निधी | ४३ | १८ | २१५५५५००० | २१५५५५००० | ०.०० | ७५०००००० | २०८०५५००० | |
| **एकूण** | | | | | **२१५५५५०००** | **२१५५५५०००** | **७५००००००** | **७५००००००** | **२०८०५५०००** | |

तसेच खालील प्रमाणे मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | लेखा शिर्ष | सन २०२१-२२ अंदाजपत्रकात असणारी रक्कम | सन २०२१-२२ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगवी-किवळे रस्त्याचे डांबरीकरण करणे चेंबर समपातळीस करणे व अनुषंगिक कामे करणे. | | | विशेष योजना | ५००००००० | ० | १५०००००० | ० | १५०००००० | **नविन काम** |
| २ | रावेत संत तुकाराम महाराज पुल ते मुकाई चौकापर्यंतचा रस्त्याच्या कडेला पदपथ व सायकल ट्रॅक तयार करणे. | | | विशेष योजना | ३००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० | **नविन काम** |
| ३ | रावेत गावठाण ते मामुर्डी पवना नदीकडेला पादचारी मार्ग व सायकल ट्रॅक विकसित करणे. | ४४ | १३२ | विशेष योजना | २००००००० | ३८१८००० | ० | २०००००० | १८१८००० | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सांगवी फाटा ते जगताप डेअरी पर्यंतचा रस्ता सायकल फॉर चेंज अतंर्गत फुटपाथ व पदपथ विकसित करणे. | ४५ | १४३ | विशेष योजना | १५००००००० | ११४५३००० | ० | ११०००००० | ४५३००० | |
| ५ | केंद्र शासनाच्या सायकल फॉर चेंज या उपक्रमांतर्गत शहरातील विविध रस्त्यांवर सायकल ट्रॅक उभारणे. | ४५ | १४८ | विशेष योजना | ५०००००००० | ७६३५००० | ० | ५०००००० | २६३५००० | |
| ६ | पिंपरी चिंचवड शहरातील पुलांची वग्रेड सेपरेटरची स्थापत्य विषयक कामे करणे. | ४५ | १४९ | विशेष योजना | २०००००००० | ३८१८००० | ० | ३५००००० | ३१८००० | |
| ७ | रावेत येथे विपष्यणा केंद्र उभारणे. | ४५ | १५० | विशेष योजना | १५००००००० | ३८१८००० | ० | ३५००००० | ३१८००० | |
| | **एकुण** | | | | | ३०५४२००० | २५०००००० | २५०००००० | ३०५४२००० | |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या प्रशासकीय मान्यता व तरतुदीमध्ये वाढ / घट करून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील विकास कामांसाठी अपुरी तरतुद ठेवणेत आली असल्याने स्मशानभुमीचे महत्वाचे कामाचे अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करणेसाठी अंदाजपत्रकीय रकमेमध्ये व तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे अंदाजपत्रकीय रकमेमध्ये (प्रशासकीय मान्यता रक्कम ) व तरतुदीमध्ये वाढ/घट करून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र | अ क्र | लेखाशिर्ष | सन २०२१-२२ अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२१-२२ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | एकूण आवश्यक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र १२ तळवडे येथे स्मशानभुमीची स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्ती करणे | ५३७ | ४ | स्मशान भुमी | ८०००००० | २०००००००० | ५०००००० | ५०००००० | ० | १०००००००० |
| २ | प्रभाग क्र १२ तळवडे येथील तळवडे चिखली हद्द परिसरातील जुने अस्तित्वातील रस्त्यांचे खडीमूरूमीकरण व डांबरीकरण करणे | २०५ | २६ | ख़डी मुरूमाचे रस्ते | २०००००००० | २०००००००० | १०००१००० | ० | ५०००००० | ५००१००० |
| | एकूण | | | | २८०००००० | ४००००००० | १५००१००० | ५०००००० | ५०००००० | १५००१००० |

तरी सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रू. २००००००००/- (अक्षरी र.रू. दोन कोटी फक्त) व तरतुद र.रू ५०००००००/- (अक्षरी र.रू. पन्नास लाख फक्त) इतके वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी

तसेच सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्ष अंतर्गत प्रभाग क्र.२६ मधील नविन विकास कामांचा समावेश करणेस मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख येथे खालील नमूद केलेले विकास काम नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरच्या नविन विकास कामांचा सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखाशिर्षका अंतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

| अनु क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | वाकड येथील भूवी सोसायटी ते शॉनेस्ट टॉवर येथील नाल्याची सुधारणा करणे व नाला बंदिस्त करणे. | विशेष योजना (नविन काम) | ५ कोटी |

तसेच प्र.क्र.२६ येथील काळेवाडी फाटा ते छत्रपती चौकापर्यंतचा सिमेंट कॉक्रीटचा रस्ता करणे या कामाअंतर्गत त्याच प्रभागातील इतर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणेस मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र.२६ येथील काळेवाडी फाटा ते छत्रपती चौकापर्यंतचा सिमेंट कॉक्रीटचा रस्ता करणे (निविदा क्र.७०/०९/२०१८-१९) चे कामाचे आदेश ठेकेदार मे.मंजुळाई कंन्स्ट्रक्शन कं. यांना क्र.स्था/नि/ड-मुख्य/१४५/२०१९ दि.२५/०२/२०१९ अन्वये देणेत आलेले होते सदरचे काम प्रगतीपथावर सुरू आहे.

तसेच या कामातून काही रक्कम शिल्लक राहत आहे त्यामुळे प्रभाग क्र.२६ येथील काळेवाडी फाटा ते छत्रपती चौकापर्यंतचा सिमेंट कॉक्रीटचा रस्ता करणे (निविदा क्र.७०/०९/२०१८-१९) या कामातून त्याच प्रभागातील इतर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे साईट बदलाबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

तसेच देहू कमान ते झेंडे मळा रस्त्याचे रूंदीकरण व मजबुतीकरण करणे या कामातुन प्रभाग क्र ११ मधील राघवेंद्र हॉटेल ते नक्षत्र फेज १ पर्यंत तसेच प्रभाग क्र ११ मधील कृष्णानगर मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामातील विद्युत विषयक कामे करणे व स्थळ बदलास मान्यता देणेत यावी. फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र ११ मध्ये स्थापत्य विभागामार्फत राघवेंद्र हॉटेल ते नक्षत्र फेज १ पर्यंत तसेच प्रभाग क्र ११ मधील कृष्णानगर मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामांच्या निविदा काढणेत आलेल्या आहेत. तथापी त्यात विद्युत विषयक कामांचा समावेश नाही. उपरोक्त दोन्ही कामांकरीता विद्युत व्यवस्था करणेकरीता कामाचा समावेश विद्युत विभागाचे अंदाजपत्रकात सन २०२१-२२ मध्ये करणेत आला आहे. कोरोना महामारीमुळे भांडवली खर्चावर मर्यादा असल्याने या कामांकरीता पुरेशी तरतुद उपलब्ध होऊ शकलेली नाही. सद्यस्थितीत स्थापत्य विभागामार्फत रस्ता विकसीत करणेचे काम प्रगती पथावर असून रस्ता खोदाईमध्ये विद्युत वाहिन्या, केबल, एच टी पोल, डी.पी. इ. यांचा अडथळा होत असून वारंवार केबल नादुरूस्त होत आहेत. अपुऱ्या तरतुदीमुळे विषयांकीत रस्त्यांकरीता विद्युत विषयक कामांच्या निविदा प्रसिद्ध करणे शक्य होत नाही. तसेच निविदा कार्यवाही करवायाची झाल्यास तरतुद वर्गीकरण झालेनंतरच निविदा काढता येईल व त्यात बराच कालावधी जाणार आहे.

तरी देहू कमान ते झेंडे मळा रस्त्याचे रूंदीकरण व मजबुतीकरण करणे व प्रभाग क्र ११ मधील राघवेंद्र हॉटेल ते नक्षत्र फेज १ पर्यंत तसेच प्रभाग क्र ११ मधील कृष्णानगर मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामातील विद्युत विषयक कामे करणे मधील आवश्यक साहित्य व बाबी समान आहेत. तरी देहू कमान ते झेंडे मळा रस्त्याचे रूंदीकरण व मजबुतीकरण करणे या कामातुन प्रभाग क्र ११ मधील राघवेंद्र हॉटेल ते नक्षत्र फेज १ पर्यंत तसेच प्रभाग क्र ११ मधील कृष्णानगर मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामातील विद्युत विषयक कामे करणेस व स्थळबदलास मान्यता देणेत यावी.

तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र.६५१ दि. १८/६/२०२१ नुसार पिंपरी चिंचवड मनपा परिसरात वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणेकामी ट्राफिक सिग्नल मध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने “पिंपरी चिंचवड मनपा परिसरात एलईडी डेकोरेटिव्ह ट्रॅफिक सिग्नल बसविणे.” या कामासाठी येणारा खर्च रक्कम रुपये एक कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता

देणेस व सदर रक्कम रूपये एक कोटी “महापौर विकास निधी ”या लेखाशीर्षातून खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि सदरचे काम स्मार्ट सिटीचे स्थापत्य विभागाचे काम प्रगतीपथावर असल्याने सदरचे ट्रॅफिक सिग्नल सुधारणा करणेचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त नमूद ट्रॅफिक सिग्नलचे कामासाठी होणारा खर्च र. रू. १ कोटी हे स्मार्ट सिटी मधील चालू काम नि. क्र.११-१८/१९ आदेश क्र.PCSCL/T/KAVI/17/2019दि.16/05/2019 या कामास महापौर विकास निधीमधुन पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. कडे या कामाकरीता तरतूद वर्ग करण्यास व ट्रॅफिक सिग्नलचे काम स्मार्ट सिटीच्या उक्त नमूद चालू कामातून अतिरिक्त बाब करून निविदा अटी शर्तीनुसार करून घेण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच मामुर्डी गाव स.नं.३५/३ जमीनीवरील आरक्षण क्र. ४/१७५ बस स्टॅण्डचे आरक्षण रद्द करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विकास योजना आराखड्यानुसार मामुर्डी गाव स.नं. ३५/३ या जमीनीवर आरक्षण क्र.४/१७५ ही जागा पीसीएमटी बस स्टॅडसाठी राखीव आहे.

सदरचे आरक्षण हे देहूरोड कॅन्टोमेंटचे २००० यार्डचे हद्दीजवळ आहे. मामुर्डी गावठाणाचा समावेश देहूरोड कॅन्टोमेंटमध्ये आहे. कॅन्टोमेंट मधून नियोजित बसस्टॉपकडे येणारे रस्ते लहान आहेत. त्यामुळे कॅन्टोमेंटच्या बाजूने बस मार्ग होणेची शक्यता खूप कमी आहे. त्यामुळे आरक्षण क्र. ४/१७५ पीसीएमटी बस स्टॅडसाठी विकास योजनेनुसार ठेवलेले आरक्षण रद्द करणेस मान्यता देण्यात यावी.

तसेच मा. महापालिका ठराव क्र. ६८५ दि. २०/०८/२०२१ च्या ठरावामध्ये बदल करणेस मान्यता देणेत यावी. मा. महापालिका ठराव क्र. ६८५ दि.२०/०८/२०२१ अन्वये पारित ठरावामधील सदर कामांकरीता तरतुद सन २०२०-२१ या सालाकरीता करण्यात आली आहे असे नमुद आहे. त्यामध्ये २०२०-२१ ऐवजी सन २०२१-२२ तरतुद करण्यात आली आहे, असे नमुद करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच “प्रभाग क्र.१४ मध्ये मोहननगर सांस्कृतिक भवन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे व अनुषंगिक कामे करणेस मान्यता देणेत यावी. " “ प्रभाग क्र. १४ मध्ये मोहननगर सांस्कृतिक भवन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे व अनुषंगिक कामे करणे ” या कामाचा समावेश मनपाचे सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात पान क्र . १७ वर अ.क्र. ५९ मध्ये समावेश करणेत आलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी मध्ये सिंहासनावर बसलेला पुर्णाकृती पुतळा मोहननगर सि.स.नं .४८८५ येथील राष्ट्रमाता जिजाऊ सांस्कृतिक भवनाच्या आवारातील मोकळया जागेत बसविणेबाबत नागरिकांची मागणी आहे. त्यासाठी सदर कामाचे अंदाजपत्रक, निविदा प्रक्रिया व आवश्यक परवानग्या मिळविणेकरीता मान्यता देणेत यावी. तरी छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी मध्ये सिंहासनावर बसलेला पुर्णाकृती पुतळा मोहननगर सि.स.नं. ४८८५ येथील राष्ट्रमाता जिजाऊ सांस्कृतिक भवनाच्या आवारातील मोकळया जागेत बसविणेस मान्यता देणेत यावी.

तसेच सन १९४७ साली भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले. या वर्षी सन २०२१ मध्ये आपला देश ७५ वे स्वातंत्र्य वर्ष म्हणून हिरक महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळेस साक्षीदार असलेले अनेक नागरिक वास्तव्यास आहेत. अशा नागरिकांचा गुणगौरव व कौतुक करणे हे आपल्या महापालिकेला

भुषणावह आहे. म्हणून आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये स्वातंत्र्यानंतर भारताच्या पहिल्या झेंडावंदनाच्या दिवशी जे नागरिक त्यांच्या वयाची १८ वर्ष पुर्ण करीत होते व जे या सुवर्णक्षणाचे साक्षीदार होते अशा नागरिकांचा महानगरपालिकेच्या या वर्षीच्या वर्धापनदिनाच्या दिवशी यथोचीत सन्मान करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र २७ रहाटणी मध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा बसविणेस मान्यता देणेत यावी. मा. महापालिका सभा ठराव क्र ३२९, दि. २०/१२/२०१८ अन्वये प्रभाग क्र २७ रहाटणी मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारणेसाठी मान्यता देणेत आली आहे. परंतु सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय ३११६/प्र.क्र.३०८/२९, दि. ०२/०५/२०१७ मधील मुद्दा क्र २० नुसार पुतळा उभारण्यासाठी पारित केलेले ठराव हे १ वर्षापेक्षा जुने असू नयेत अशी तरतूद समाविष्ट आहे. त्यामुळे मा.महापालिका सभा ठराव क्र ३२९, दि. २०/१२/२०१८ यास मा.महापालिका सभेची पुर्नमान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रभाग क्र २७ रहाटणी मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अस्तित्वात असलेला अर्धाकृती पुतळा बदलून त्याजागी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारणेस मान्यता देणेत यावी. सदर कामाकरीता महापालिका अंदाजपत्रकातील ' प्रभाग क्र २७ रहाटणी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारणे व अनुषंगिक कामे करणे ' (पान क्र ३८, अनु क्र. ४७३) या शिर्षकावरती ' प्र.क्र.२७ रहाटणी येथील नखाते नगर ते कोकणे चौक या १२ मी.रुंद रस्ता विकसीत करणे. ' (पान क्र ३०, अनु क्र २०७) या कामामधून र.रू. ५०,००,०००/- इतरी तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी. तरी सदरचा ठराव हा कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी करणेत यावी.

तसेच मौजे मोशी गट नं.६४६ पै. मधील आ.क्र.१/१८९ मनपा उपयोग या ठिकाणी शासनाकडून हस्तांतरीत झालेल्या ६.०० हे.क्षेत्रावर ८५० बेडचे हॉस्पिटल विकसीत करणेस मान्यता देणेत यावी. स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत प्रभाग क्र.१ चिखली येथील गट क्र.१६५३ व १६५४ (गायरान) मधील आरक्षण क्र.१/८८ (अ) येथे ८५० बेडचे हॉस्पीटल विकसीत करणे. या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.५९४ दि.२०/०१/२०२१ अन्वये र.रू.३५० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता व र.रू.५० लाख इतकी तरतुदीस मिळाली आहे. उपरोक्त ठरावाचे अंमलबजावणीस मा.आयुक्त यांची दि.१८/०२/२०२१ चे मंजुर टिपणीन्वये मान्यता मिळाली आहे. तथापी सदरचे क्षेत्र मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र.पमफ-१/कावि/९३५/०६, दि.०८/११/२००६ अन्वये Identified Forest वनक्षेत्र म्हणून मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) पुणे यांना कळविले आहे. त्यामुळे सदर जागा मनपास वरील कामासाठी मिळणे शक्य नाही. त्यामुळे मौजे मोशी गट नं.६४६ पै. यामध्ये मनपाचे मंजुर विकास योजनेतील आ.क्र.१/१८९ मनपा उपयोग या प्रयोजनाखालील शासकीय गायरान जमीन मनपास सन २०१९ मध्ये मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत ६.० हे. क्षेत्र मनपास हस्तांतरीत करण्यात आले आहे. मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार सदर हस्तांतरीत जागा ३ वर्षात विकसीत न केल्यास सदर जागा जिल्हाधिकारी यांचेमार्फत काढून घेण्यात येईल अश्या अटी शर्तीवर जागा हस्तांतरीत करण्यात आली आहे. सद्यस्थितीत जागा मोकळी आहे. त्यामुळे

वरील हॉस्पिटल मौजे मोशी गट नं.६४६ पै. मधील आ.क्र.१/१८९ मनपा उपयोग या ठिकाणी विकसीत केल्यास सदर भागाचा विकास होऊन पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय सुविधांचा लाभ होईल.

प्रभाग क्र.१ चिखली येथील गट क्र.१६५३ व १६५४ (गायरान) मधील आरक्षण क्र.१/८८ (अ) येथे ८५० बेडचे हॉस्पीटल विकसीत करणे. या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.५९४ दि.२०/०१/२०२१ अन्वये र.रू.३५० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता व र.रू.५० लाख इतकी तरतुदीस मिळाली आहे या ऐवजी स्थळबदल करून मौजे मोशी गट नं.६४६ पै. मधील आ.क्र.१/१८९ मनपा उपयोग या ठिकाणी शासनाकडून हस्तांतरीत झालेल्या ६.०० हे.क्षेत्रावर ८५० बेडचे हॉस्पिटल विकसीत करण्यास मान्यता देणेत यावी व त्यास र.रू.३५० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता व र.रू.५० लाख इतकी तरतुद असावी यास मान्यता देण्यात यावी.

तसेच नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत पिंपरी चिंचवड मनपा हददीतील महीला, बालके, मागासवर्गीय व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती, कुष्ठरुग्ण व्यक्ती, अनाथ –निराधार मुले, एच.आय.व्ही. बाधीत मुले या समाजातील गरजु घटकांसाठी त्यांच्या सर्वांगीण विकासांसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात परंतु तृतीयपंथीय व्यक्ती हा घटक सुध्दा गरजू आणि वंचित असुन या तृतीयपंथीयांसाठी व्यक्तींच्या विकासाच्या दृष्टीकोनातुन काही कल्याणकारी योजना राबविणे आवश्यक आहे. तरी सन २०२१-२०२२ आर्थिक वर्षात " तृतीयपंथीय विकासात्मक योजना" हे स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करणे तसेच या लेखाशीर्षावर नागरवस्ती योजना विभागाकडील इतर कल्याणकारी योजनेअंतर्गत असणा-या "इतर योजना / कार्यक्रम" या उपलेखाशीर्षाअंतर्गत र रु २,००,००,००० (अक्षरी र रु दोन कोटी फक्त) शिल्लक असुन सदर उपलेखाशीर्षातुन र रु १५,००,०००/- (अक्षरी र रु पंधरा लाख फक्त) इतकी तरतुद वर्ग करण्यास तसेच सन २०२२- २०२३ या आर्थिक वर्षासाठी "तृतीयपंथीय विकासात्मक योजना" या लेखाशार्षावर भरीव तरतुद करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पाणीपट्टी संबंधातील थकबाकीदारांचे मा.न्यायालयामार्फत निवाडा करण्यात येतो. दि.२५/०९/२०२१ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले असून, अशा प्रकारे वेळोवेळी आयोजीत करण्यात येणा-या राष्ट्रीय लोकअदालतीचा नागरीकांना लाभ व्हावा याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील अनुसुची ड प्रकरण ८ नियम ५० अन्वये शास्ती/दंड फी किंवा वसुलीचा खर्च मा.आयुक्तास आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम ४१ खाली शास्ती किंवा नियम ५० खालील फी वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल अशी तरतूद आहे. अशा प्रकारची दंड माफीचा ठरावास मा.महासभेने दि.०७/०९/२०१९, ठराव क्र.४५२ अन्वये मान्यता दिलेली होती. त्याच अनुषंगाने दि.२५/०९/२०२१ रोजी होणा-या राष्ट्रीय लोकअदालतीचे दिनानिमित्त बजावण्यात येणा-या नोटीशीच्या अनुषंगाने थकबाकीसह संपुर्ण पाणीपट्टी बील एकरक्कमी भरणा-या ग्राहक / मिळकतधारकांना खालीलप्रमाणे सवलत देण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | थकबाकीसह संपूर्ण पाणीबील एक रक्कमी भरणेकामी कालावधी | मनपा पाणीबीलामध्ये माफी / सवलत टक्केवारी |
|---|---|---|
| १ | दि.२५/०९/२०२१ रोजी तसेच | भरणा दिनांकापर्यंत आकारणेत |

| | | |
|---|---|---|
| | वेळोवेळी आयोजित करणेत येणा-या राष्ट्रीय लोकअदालतीचे दिवशी | आलेल्या मनपा पाणीबीलाचे विलंब दंड रक्कमेचे ९०% सवलत |

तसेच शहरातील रस्त्यांची यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे करण्याचे कामकाजाची निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता मान्यता देणेत यावी. मा.महापालिका सभा ठराव क्र.६८१ दि.२०/०८/२०२१ अन्वये यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई करण्याचा विषय दप्तरी दाखल करण्यात आलेला आहे. तथापि, स्वच्छ भारत अभियानामध्ये शहराचे गुणांकन सुधारण्यासाठी यांत्रिकीकरणाचा अवलंब करणे आवश्यक आहे. तसेच देशातील प्रमुख शहरांमध्ये त्यानुसार कामकाज करण्यात येत असून प्रचलित नियमानुसार यांत्रिकीकरणाद्वारे रस्ते साफसफाईचे कामकाज करणे मनपास बंधनकारक आहे. तसेच सदर कामकाजाची निकड लक्षात घेता आरोग्य विभागामार्फत यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाईच्या कामकाजाकरिता नव्याने आरएफपी तयार करुन सादर करणे योग्य राहील. त्याकरिता जुन्या आरएफपी मधील ४ पॅकेज ऐवजी २ पॅकेजमध्ये शहरातील रस्त्यांची विभागणी करुन सुधारित आरएफपी मसुदा तयार करावा, तसेच खर्चामध्ये कपात करुन व यंत्रे आणि मनुष्यबळाची फेररचना करण्यात यावी. त्यानुसार यांत्रिकीकरणाद्वारे साफसफाईचा विषय प्रशासकीय मान्यतेकामी माहे ऑक्टोबर महिन्याचे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाचा विस्तार मोठ्या क्षेत्रात आहे. पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक व कामगार नगरी म्हणून ओळखले जाते. त्यामुळे जगभरातील अनेक नामांकित कंपन्या तसेच आय टी कंपन्या देखील शहरात आहेत. शहरातील रोजगाराची सहज उपलब्धता व वाढत्या रोजगाराच्या संधी यामुळे शहराच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. तसेच शहरातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणात वारंवार वाहतूक कोंडी होते. त्यामुळे वाहतुकीचे नियमन व वाहतुक सुरळीत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ हे पुरवावे लागते. तसेच कोविड-१९ या साथरोगाच्या पार्श्वभूमीवर देखील शहरात मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त पुरवावा लागत आहे.

पिंपरी चिंचवड शहर पोलिस दलाच्या हद्दीमध्ये गणेशोत्सव मिरवणूक बंदोबस्त, छत्रपती शिवाजी महाराज जयंती बंदोबस्त, पालखी बंदोबस्त, रमजान, बकरी ईद बंदोबस्त, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती बंदोबस्त तसेच शहरातील अति महत्वाच्या व्यक्तींसाठी पुरवावा लागणारा इत्यादी विविध महत्वाचे बंदोबस्त तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे अत्यंत आवश्यक आहे.

तेंव्हा पिंपरी चिंचवड शहरातील सर्वसामान्य नागरिक व औद्योगिक परिसराच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक ड्रोन यंत्रणा खरेदी करुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मागणीनुसार हस्तांतरीत करणे अत्यंत गरजेचे आहे. सदर कामाचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नव्याने समावेश करुन महापौर विकास निधीमधुन सदर लेखाशीर्षावर रक्कम रु.३,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तीन लाख फक्त) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच अंदाजपत्रकीय रक्कमेस व प्रशासकीय मान्यता देऊन तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रिय कार्यालयातंर्गत सांगवी परिसरातील नागरिकांना अत्यावश्यक पाणीपुरवठा सुरळीत करणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या सांगवी परिसरामधील अस्तित्वात असणा-या पाण्याच्या टाकीसंबंधी स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ चे महापालिका अंदाजपत्रकात ह प्रभागातंर्गत सन २०२०-२१ करिता सांगवी परिसरातील टाकीवरील स्थापत्य विषयक व सुशोभिकरणाची कामे

करणे या कामाचा समावेश असून ह क्षेत्रिय कार्यालय पाणीपुरवठा विभागामार्फत सदर काम सध्या सुरु आहे. तसेच सदर कामाकरिता सन २०२१-२२ चे महापालिका अंदाजपत्रकीय रक्कम रु. २५,००,०००/- मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु सदर पाणीपुरवठा विषयक पाण्याच्या टाकीसंबंधीचे वाढीव कामकाज लक्षात घेता अंदाजपत्रकीय रक्कम रु. २५,००,०००/- तसेच सदर कामासाठी संभाव्य वाढीव खर्च विचारात घेता सदर लेखाशीर्षावर रक्कम रु.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. वीस लाख फक्त) वाढीव अंदाजपत्रकीय रक्कमेस व प्रशासकीय मान्यता देऊन महापौर विकास निधीमधुन तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच मौजे दापोडी येथील सर्वे नंबर ५ पैकी मध्ये मंजूर विकास योजनेत आरक्षण क्रमांक ३/२४ व ३/२५ दर्शविलेने सदर मुळ मालक भूमिहीन होण्याची शक्यता आहे तसेच याच सर्वे नंबर मध्ये रेल्वे मंत्रालयाचे, पुर्वी जागा संपादित केली आहे व पिंपरी चिंचवड मनपाने दापोडी-पिंपळे गुरव रस्त्याच्या आरक्षणासाठी जागा संपादित केलेली आहे. जर उर्वरित क्षेत्र आरक्षण क्रमांक ३/२४ व ३/२५ साठी संपादित केले तर मूळ मालक विस्थापित होण्याची शक्यता आहे. सदर नमुद आरक्षण इसवी सन १९९७ पूर्वीपासून म्हणजे दापोडी गाव पुणे मनपा मध्ये असल्यापासून कायम आहे. तरी सदर नमुद आरक्षणे रद्द करण्यास मान्यता देणेत यावी व सी.एम.इ./ भोसरी हद्दीतील सर्व्हे नंबर ३७४, ३७८, ३८०, ३८६ आणि ३८७ पै या सी.एम.इ. आवारातील जुन्या फुगेवाडी जकात नाक्याच्या ५ हे ६२ आर क्षेत्रावर स्थलांतरीत करण्यास मान्यता देणेत यावी. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यात व फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासन फेर बदलाचा प्रस्ताव सादर करणे मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपापलिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र ६४१, दि. २०/०५/२०२१ नुसार प्रभाग क्र २७ रहाटणी येथील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रिटीकरणाचे कामातून रहाटणी येथील सिंहगड कॉलनी, सोमद्वार कॉलनी, कृष्णाई कॉलनी, मधुसुदन कॉलनी, सज्जनगड कॉलनी १ व २ तसेच बळीराज कॉलनी १ ते ४ हे रस्ते कॉंक्रिटचे करणेचा ठराव मंजूर करणेत आला आहे. परंतु सदरचे रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण न करता डांबरीकरण करावयाचे असल्याने मा. महापालिका सभा ठराव क्र ६४१, दि. २०/०५/२०२१ मध्ये कॉंक्रिटीकरणासाठी मंजुर केलेल्या रस्त्यांचे सद्यस्थितीत कॉंक्रिटीकरण न करता डांबरीकरण करणेत यावे व त्या पध्दतीने मा. महापालिका सभा ठराव क्र ६४१, दि. २०/०५/२०२१ मध्ये दुरूस्ती करणेस मान्यता देणेत यावी जेणे करून सदर कामामुळे चालु कॉंक्रिटीकरणाच्या कामावर त्याचा परिणाम होणार नाही.

तसेच सभा क्र.५६ दि.३१/०३/२०२१ विषय क्र. १ ठराव क्र. ६३२ अन्वये क्रीडा विभागाच्या मुळ अदांजपत्रकामध्ये ठेकेदारी पध्दतीने काळजीवाहक नेमणे हे नव्याने लेखाशिर्ष तयार करुन र.रू.२,००,००,०००/- इतकी तरतुद वर्ग करण्यात आलेली आहे. सन २०२१-२२ मध्ये या लेखाशिर्षकावर तरतुद खर्ची पडण्यात येणार नसल्याने सदरची तरतुद ही शिल्लक राहणार आहे. तसेच क्रीडा विभागाकडे असणारे जलतरण तलावावर येणारे नागरीक, मुले तसेच खेळाडु यावर नियत्रंण विषयक कामकाज करणेसाठी जलतरण तलावावर ठेकेदारी पध्दतीने जीवरक्षक कम मदतीनस यांची नेमणुक करावयाची असल्याने क्रीडा विभागाकडील पान क्र. १७८ अ.क्र. १९ मधील “ठेकेदारी पध्दतीने काळजीवाहक नेमणे” या लेखाशिर्षाकावरुन र.रू.२,००,००,०००/- (दोन कोटी) तरतुद “ठेकेदारी पध्दतीने जीवरक्षक कम मदतनीस नेमणे” या नव्याने लेखाशिर्षाकावर वर्ग करणेस मान्यता देण्यात यावी.

| अ. क्र. | लेखाशिर्षक | महसुली अंदाजपत्रका मधील पान क्र. / अ.क्र. | सन २०-२१ चे मुळ अंदाजपत्रकात करणेत आलेली तरतुद र.रू. | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सुधारित तरतुद रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठेकेदारी पध्दतीने काळजीवाहक नेमणे | १७८/१९ | २,००,००,०००/- | ---------- | २,००,००,०००/- | ------ |
| ४ | ड प्रभागातील व्यायामशाळा,बॅडमिंटन हॉल इ.क्रीडा विषयक कामांची स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची तसेच सुधारणांची कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | ३०००००० | ० | २००००० | | | |
| ५ | इ प्रभागातील व्यायामशाळा,बॅडमिंटन हॉल इ.क्रीडा विषयक कामांची स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची तसेच | क्रीडा विषयक कामे | - | - | ३०००००० | ० | २००००० | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सुधारणांची कामे करणे | | | | | | | | | |
| ६ | फ प्रभागातील व्यायामशाळा,बॅडमिंटन हॉल इ.क्रीडा विषयक कामांची स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची तसेच सुधारणांची कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | ३००००००० | ० | २००००० | | | |
| ७ | ग प्रभागातील व्यायामशाळा,बॅडमिंटन हॉल इ.क्रीडा विषयक कामांची स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची तसेच सुधारणांची कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | ३००००००० | ० | २००००० | | | |
| ८ | ह प्रभागातील व्यायामशाळा,बॅडमिंटन हॉल इ.क्रीडा विषयक कामांची स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची तसेच सुधारणांची कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | ३००००००० | ० | २००००० | | | |
| | एकूण = | | | | | | | | | |

तसेच खालील कामांच्या नावाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन प्रशासकीय मान्यता तसेच सदर कामांसाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | बजेट पान क्र | बजेट अ.क्र | प्रशासकीय मान्यता रक्कम रु | सन २०२१-२२ मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ प्रभागातील पोहण्याच्या तलावांची स्थापत्य विषयक कामे कारणे व उंची कमी करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | ३७५००००० | ० | २५००० | | | |
| २ | ब प्रभागातील पोहण्याच्या तलावांची स्थापत्य विषयक कामे कारणे व उंची कमी करणे व इतर | क्रीडा विषयक कामे | - | - | ७५००००० | ० | २५००० | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनुषंगिक कामे करणे | | | | | | | | | |
| ३ | क प्रभागातील पोहण्याच्या तलावांची स्थापत्य विषयक कामे कारणे व उंची कमी करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | ७५०००० | ० | २५००० | | | |
| ४ | ड प्रभागातील पोहण्याच्या तलावांची स्थापत्य विषयक कामे कारणे व उंची कमी करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | | | २५००० | | | |
| ५ | इ प्रभागातील पोहण्याच्या तलावांची स्थापत्य विषयक कामे कारणे व उंची कमी करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | २२५००००० | ० | २५००० | | | |
| ६ | फ प्रभागातील पोहण्याच्या तलावांची स्थापत्य विषयक कामे कारणे व उंची कमी करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | ७५०००० | ० | २५००० | | | |
| ७ | ग प्रभागातील पोहण्याच्या तलावांची स्थापत्य विषयक कामे कारणे व उंची कमी करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | ७५०००० | ० | २५००० | | | |
| ८ | ह प्रभागातील पोहण्याच्या तलावांची स्थापत्य विषयक कामे कारणे व उंची कमी करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | क्रीडा विषयक कामे | - | - | ३००००००० | ० | २५००० | | | |
| | एकूण = | | | | १२०००००००० | ० | २००००० | | | |

तसेच खालील कामांच्या नावाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन प्रशासकीय मान्यता तसेच सदर कामांसाठी तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | बजेट पान क्र | बजेट अ.क्र | प्रशासकीय मान्यता रक्कम रु | सन २०२१-२२ मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.८ मधील क्रीडा विषयक व मनपाचे विविध कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे | क्रीडा विषयक कामे | ८३१ | २४ | ५०००००० | २५००००० | | २५००००० | | |
| २ | प्रभाग क्र.२ चिखली मधील जाधववाडी बो-हाडेवाडी बनकरवस्ती व आल्हाटवस्ती परिसरात मनपाचे क्रीडा विषयक व मनपाचे विविध कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे | क्रीडा विषयक कामे | ८३१ | २७ | ३७५०००० | २५००००० | | २५००००० | | |
| ३ | प्रभाग क्र.२ मधील जाधववाडी परिसरात मनपाचे विविध कार्यक्रम व क्रीडा विषयक कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे | क्रीडा विषयक कामे | ८३१ | ३२ | २४९०००० | २२४३००० | | २२००००० | | |
| ४ | प्रभाग क्र.२ चिखली मधील बो-हाडेवाडी परिसरात मनपाचे विविध कार्यक्रम क्रीडा विषयक कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे | क्रीडा विषयक कामे | ८३१ | ३३ | २४९०००० | १६००००० | | १६००००० | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रभाग क्र.९ मासुळकर मधील क्रीडा विषयक कामांसाठी तसेच मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे | क्रीडा विषयक कामे | ८३१ | ३४ | ६०००००० | ३०००००० | | ३०००००० | | |
| ६ | प्रभाग क्र.१२ रुपीनगर येथील ठाकरे शाळा व खेळाचे मैदानाची देखभाल दुरुस्ती करणे | क्रीडा विषयक कामे | ८३२ | ६० | २००००००० | २०००००० | | २०००००० | | |
| ७ | प्रभाग क्र.२० येथील आंबेडकर क्रीडा संकुल येथील मैदान विकसित करणे | क्रीडा विषयक कामे | ८३३ | ८० | १००००००००० | ३४०००००० | | ४०००००० | | |
| | एकूण = | | | | | | १,७८,००,००० | १,७८,००,००० | | |

तसेच प्रभाग क्र. २५ वाकड, ताथवडे,पुनावळे येथे खालील नमूद केलेले विकास काम नागरिकांच्या सोयीच्या दष्टीने करणे आवश्यक आहे त्यामुळे सदरच्या नविन विकास कामांचा सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखाशिर्षाअंतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २५ मधील मधुबन हॉटेल ते इंदीरा रोड २४.०० मी. रुंद रस्ता, सिल्वहर स्पून हॉटेल ते इंदीरा रोड १८.०० मी. रुंद रस्ता तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणा-या वाकड शिवेपर्यंतचा १८.०० मी. रुंदीच्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | विशेष योजना (नविन काम) | ३० कोटी |

तसेच

| अ.क्र | कामाचे नाव | पान क्र | अनु.क्र | निविदा रक्कम | सन २०२१-२२ ची उपलब्ध तरतूद | सन २०२१-२२ आवश्यक मधील वाढ तरतूद | घट | आवश्यक असणारी एकूण तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं ३१ क्रांती चौक ते शनि मंदिर पर्यंतचा रस्ता अद्यावत पद्धतीने विकसित करणे | ३० | २३१ | ४,०४,४९,७६०/- | १२०००००० | १५०००००० | ० | २७०००००० |
| २ | प्रभाग क्रं ३१ मधील रस्ते अत्याधुनिक पद्धतीने विकसित करणे | ३१ | २४३ | ४,१५,५८,३९६/- | १२५००००० | १०००००००० | ० | २२५००००० |
| ३ | प्रभाग क्रं ३१ कृष्णा चौक ते साई चौकचा रस्ता UTWT पद्धतीने विकसित करणे | ३१ | २४५ | ४,१३,३२,६७०/- | १०००००००० | १०००००००० | ० | २०००००००० |
| ४ | प्रभाग क्रं ३१ मधील फेमस चौक ते शनि मंदिर रस्ता UTWT पद्धतीने विकसित करणे | ३१ | २४२ | ४,०३,९२,२३६/- | १२५००००० | १०००००००० | ० | २२५००००० |
| ५ | प्रभाग क्रं ३१ मधील ढोरे फार्म ते फेमस चौक रस्ता UTWT पद्धतीने विकसित करणे | ३१ | २४४ | ४,१५,२०,८३०/- | १२०००००० | ७५००००० | ० | १९५००००० |
| ६ | प्रभाग क्रं ३१ मधील साई चौक ते सांगवी पोलिस चौकी रस्ता UTWT पद्धतीने विकसित करणे | ३० | २३० | ४,४२,००,०००/- | ३०००००० | १०००००००० | ० | १३०००००० |
| ७ | प्रभाग क्रं ३१ मध्ये सांगवी पोलिस चौकी ते सांगवी फाटा रस्ता UTWT पद्धतीने विकसित करणे | ३२ | २६८ | ८,२५,३४,६१०/- | ५२००००० | १२५००००० | ० | १७७००००० |
| ८ | प्रभाग क्रं ३१ मध्ये UTWT पद्धतीने विकसित करणे | ३२ | २६९ | ८,२३,९४,०७१/- | ६२००००० | १०००००००० | ० | १६२००००० |
| ९ | प्रभाग क्रं ३१ मध्ये नवी सांगवी पिंपळे गुरव मिलिटरी हद्दी लगतचा रस्ता UTWT पद्धतीने विकसित करणे टप्पा १ | ३१ | २४७ | ४,११,३१,६०९/- | ५०००००० | १५०००००० | ० | २०००००००० |
|  | मनपा मेट्रो प्रकल्प | ५५३ | २ | ० | ५०००००००० | ० | १०००००००० | ४०००००००० |
|  |  |  |  |  | ५७८४००००० | १०००००००० | १०००००००० | ५७८४००००० |

तसेच देशपातळीवर चालू असलेल्या कोरोणा महामारीमुळे व भांडवली खर्चावर मर्यादा असल्यामुळे मनपाच्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकात विविध विकास कामांना पुरेशी तरतुद उपलब्ध होऊ शकलेली नाही त्याचप्रमाणे ज्या कामांना पुरेशी तरतुद उपलब्ध आहे.

अशा कामांच्या देखील निविदा कार्यवाही होऊन कामाचे आदेश प्राप्त होणेस विलंब होणेची दाट शक्यता आहे.

प्रभाग क्र १ चिखली मध्ये धनगरबाबा मंदीर ते केशवनगर पर्यंत नाला बांधणेचे कामाचा समावेश मनपाच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकात असून कामाचा आदेश देखील प्राप्त झाला आहे. सदर कामाची निविदा रक्कम ४ कोटी इतकी आहे. सद्यस्थितीत पावसाळयामुळे नाला बांधणेचे कामास सुरूवात होऊ शकलेली नाही. प्रभागामध्ये सद्यस्थितीत विकास कामे चालू नसल्याने विविध कामे जसे स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्ती, पेव्हींग ब्लॉंक बसविणे इ कामे बंद असून नागरीकांची मोठ्या प्रमाणावर ओरड होत आहे.

तरी उपरोक्त नाला बांधणेच्या कामातून प्रभागामध्ये विविध ठिकाणी देखभाल दुरूस्ती करणे पेव्हींग ब्लॉंक बसविणे व इतर कामे करणे शक्य असून त्याकरीता मुळ कामाचे स्थळ बदलास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ६९७ विषय क्रमांक – ६

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.लेखा/२६/कावि/९९/२०२१, दि.०६/०९/२०२१.

२) मा.आयुक्तसो यांचे पत्र क्र.लेखा/२६/कावि/१०२/२०२१, दि.०८/०९/२०२१.

३) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१०२६८ दि. ८/९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधून पवना, इंद्रायणी व मुळा या नदया वाहतात. यामधील मुळा नदीचा बहूतं:श भाग पुणे मनपामध्ये येत असल्याने सदरचा प्रकल्प पुणे मनपामार्फत राबविणेत येणार आहे. तथापि शहरातून वाहणा-या पवना नदीची लांबी सुमारे 24.50 किमी व इंद्रायणी नदीची लांबी सुमारे 24.50 किमी आहे. या नदयांचे पुनरुज्जीवन करणेच्या प्रकल्पाला यापूर्वीच मा. महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार पवना व इंद्रायणी नदीच्या प्रकल्प अहवालास पर्यावरण ना हरकत (Environment Clearance) बाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विषयक समितीकडे पाठविलेला आहे. सदरची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सदरच्या प्रकल्पाला EC मिळालेनंतर मंजूर DPR नुसार प्रकल्पाची अंमलबजावणी करणेच्या आवश्यक खर्चासाठी प्रत्येक वर्षी होणा-या खर्चाच्या प्रमाणात म्यूनिसिपल बॉंडच्या माध्यमातून निधी उभारणेचे

प्रस्तावित आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सुरुवातीला अंदाजे र.रु.200/-कोटीपर्यंतचा निधी कर्ज/कर्जरोखे या स्वरुपात उभारण्याचा मानस असून याकामी"पीसीएमसी" किंवा "जारीकर्ता" किंवा खाजगी प्लेसमेंट आधारावर कर्ज देण्याच्या ("बाँड्स") च्या स्वरुपात कर्ज उभारण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने महापालिकेने कर्ज/कर्जरोख्यांसाठी सन 2021-22 च्या अर्थसंकल्पामध्ये मा. महापालिका सभा ठराव क्र. 632, दि.31/03/2021 अन्वये “महापालिका भांडवली प्रकल्पांसाठी कजरोखे उभारणे” या लेखाशिर्षाखाली 400 कोटी रुपयांची तरतूद कर्ज/ कर्ज सुरक्षा ठेव म्हणून मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार कर्ज/कर्जरोखे उभारण्यासाठी काही संस्थांची नेमणूक करणे आवश्यक असलेने मर्चंट बँकर, क्रेडीट रेटींग संस्था, डीबेंचर ट्रस्टी, रेजीस्ट्रार, लीगल कौंसिल, डीपॉझीटर, स्टॉक एक्स्चेंज, बँकर इ. संस्थांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये या संस्थापैकी मर्चंट बँकर, क्रेडीट रेटींगसाठी, डीबेंचर ट्रस्टी, रेजीस्ट्रार, लीगल कौंसिल यांची मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.9672, दि. 09/06/2021 व क्र.10054, दि.04/08/2021 अन्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे. वरील बाबींच्या आधारे महापालिका बाँड्स जारी करण्यासाठी खालील बाबींस मान्यता मिळणे आवश्यक आहे.

**अ)**केवळ महानगरपालिकेच्या विद्यमान मंजुरी (वर सूचीबद्ध केल्या गेलेल्या) खाजगी प्लेसमेंट आधारावर डिबेंचर्सच्या स्वरुपात बाँड्स वाढवू शकते जेणेकरुन कमाल मर्यादेपर्यंत र. रू. 200/-कोटी नदी सुधार प्रकल्पांच्या अंमलबजावणीत महानगरपालिकेच्या वाट्याला अर्थसहाय्य देण्यासाठी (यापुढे "बाँड्स" म्हणून संदर्भित), आणि जे अटी व शर्तीनुसार मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंज वर सूचीबद्ध केले जाऊ शकते,सेबी (म्युनिसिपल डेट सिक्युरिटीजची जारी व यादी) विनियम, 2015 नुसार,सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्ट्स (नियमन) अधिनियम, 1956,सेबी (डेट सिक्युरिटीजची जारी व यादी) विनियम, 2008, आणि यासंबंधातील इतर कायदे, नियम, दिशानिर्देश, अधिसूचना, परिपत्रके, किंवा इतर कोणत्याही नियामक प्राधिकरणाद्वारे जारी केलेले.

**ब)**महापालिका आयुक्त/ अतिरिक्त आयुक्त आणि त्याद्वारे अधिकृत/ संयुक्तपणे आणि सर्व व्यवहारांच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास अधिकृत असतील. यामध्ये ऑफर दस्तऐवज, उपक्रम, करार, बाँड्स इश्यू कमिटीची स्थापना यासह कोणत्याही बाबींचा निर्णय घेण्याबाबत आणि महापालिका/ महामंडळामार्फत बाँड्स जारी करण्यासंबंधी कोणतेही काम हाती घेईल.

**क)** वरीलप्रमाणे नमुद केलेनुसार महानगरपालिकेची बाँड्स इश्यू कमिटी ("बाँड कमिटी") ची स्थापना करुन त्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश असेल:

1) आयुक्त
2) अतिरिक्त आयुक्त
3) मुख्य लेखा व वित्त अधिकारी
4) प्रकल्प संबंधित विभागाचे विभाग प्रमुख
5) मुख्य लेखा परिक्षक

उपरोक्त नमुद बाँड कमिटीबाँडचे प्रमाण, वेळ आणि स्वरुप, जारी करण्याच्या पद्धतीचा निर्णय घेण्यास अधिकृत असेल तसेच या संदर्भातील पतधोरण एजन्सीज, विश्वस्त, कायदेशीर

सल्लागार, ठेवीदार, स्टॉक एक्सचेंजइ. किमान सदस्यता, ओव्हरस्क्रिप्शनची धारणा, मुदतवाढ यासह मर्यादित नसलेल्या सर्व मध्यस्थ व एजन्सींची नियुक्ती करेल तसेच बाँडइश्यू करणे अथवा बाँड इश्यू (निर्गत) लवकर प्रारंभ इ. बाबी करेल.

**ड)**तसेच बाँड समितीचे सदस्य संयुक्तपणे आणि सर्व पुढील कार्यवाही करण्यास अधिकृत असतील, त्यामध्ये सर्व आवश्यक कृत्ये, सर्व आवश्यक कागदपत्रे/ करार/ साधने/ अनुप्रयोग आणि त्यासंबंधीच्या लेखी घटनांवर स्वाक्षरी करतील, तसेच त्यांना आवश्यक आणि इच्छित वाटेल त्या बाबी त्यांच्या निर्णयावर अवलंबून असतील. बाँड कमिटीला इतर गोष्टींबरोबरच पुढील बाबींचा अधिकार दिला जाईल:

1) क्रेडिट रेटिंग एजन्सीज, विश्वस्त, Registrar, कायदेशीर सल्ला, डिपॉझिटरीज, स्टॉक एक्सचेंज, बँकर्स इत्यादींची नियुक्ती अंतिम आणि मंजूर करणे. बाँडच्या अशा प्रकारच्या ऑफरमध्ये सामील होणे आणि फी, कमिशन, दलाली इत्यादींचा समावेश असलेल्या अशा सर्व व्यक्ती/ संस्थांना मोबदला देणे. त्यांच्या वैयक्तिक नियुक्ती पत्रात नमूद केल्याप्रमाणे अशा अटी व शर्ती परस्पर ठरविल्या जाऊ शकतात.

2) प्रचलित बाजारपेठेतील अटी आणि लागू कायद्यांचा विचार करून इश्यूची मुदत, व्याज दर इत्यादी बाँडच्या जारी करण्याच्या अटी अंतिम करणे.

3) मुदतीची पत्रे, बाँडची रचना, तसेच संरचित पेमेंट मेकेनिझम / एस्क्रो मॅकेनिझम / Waterfall Mechanism/ बुडीत फंडाची यंत्रणा/ व्याज देय यंत्रणा/ डीएसआरए यंत्रणा किंवा बॉन्ड्सची रचना आणि वेळेवर सर्व्हिसिंगसाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही इतर अटी/ यंत्रणा निश्चित करुन अंतिम करणे.

4) बाँडच्या मुद्द्यासाठी वित्तीय स्टेटमेन्ट/ प्रकटीकरण दस्तऐवज/ माहिती ज्ञापन/ ऑफर कागदपत्र आणि इतर कागदपत्रे काढणे, अंतिम करणे आणि स्वाक्षरी करणे आणि सेबी आणि स्टॉक एक्सचेंजमध्ये ते आवश्यक असल्यास आवश्यक ती कागदपत्रे / करारनामा सादर करणे. यामध्ये करार/ कामे/ सामंजस्य करार/ प्रमाणपत्रे/ प्रतिज्ञापत्रे/ घोषणा पत्रे/ उपक्रम इ. आणि इतर सर्व आवश्यक कागदपत्रे आणि अशी सर्व कृत्ये आणि गोष्टी करणे. तसेच सेबीच्या योग्य पूर्ततेच्या मुदतीत बाँडचे वाटप करणे आणि त्यासंबंधात आवश्यक असलेल्या सर्व औपचारिकतांचे पालन करणे. तसेच स्टॉक एक्सचेंज किंवा अन्य बाँडस जारी करण्यासाठी लागू असणारे कायदे किंवा नियम यांचा अवलंब करेल.

5) राष्ट्रीय नगरपालिका लेखा नियमावलीनुसार किंवा राज्य शासनाने लागू केलेल्या तत्सम महानगरपालिका लेखा नियमावलीनुसार किंवा जाहीर केलेल्या कागदपत्र/ माहिती ज्ञापनपत्रात समाविष्ट असलेल्या लागू असलेल्या आर्थिक मते/ पुर्न-स्वरूपित वित्तीय विवरण पत्रकांना बाँड्स जारी करण्यासाठी मंजुरी देणे.

6) बाँड्सचे वर्गणी म्हणून मिळालेले अर्जाचे पैसे स्वीकारणे, वाटपाच्या आधारे निर्णय घेणे, बाँड्सचे वाटप मंजूर करुन बाँड्सचे वाटप करणे.

7) संबंधित अथॉरिटीज/ नियामक संस्था/ एजन्सी कडून लिस्टिंग ऍप्लिकेशनची अंमलबजावणी तसेच स्टॉक एक्सचेंजसह लिस्टिंग करारासारख्या सर्व आवश्यक मंजूरी मिळविण्यासाठी अर्ज करणे व पाठपुरावा करणे. म्हणजेच बीएसई लिमिटेड ("बीएसई") किंवा बाँडच्या यादीसाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ("एनएसई"), रजिस्ट्रार, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("एनएसडीएल") आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) यांच्याशी करारनामा करणे. बाँड्सचे डिमटेरिअलायझेशनसाठी मर्यादित ("सीडीएसएल") आणि

प्रशासकीय/ महामंडळाच्या/ महापालिकेच्या वतीने कोणत्याही आवश्यक वैध प्राधिकरणाद्वारे आवश्यक असलेल्या बाँडस जारी करण्यासंबंधी इतर आवश्यक कागदपत्रे/ करार अंमलात आणणे/ करणे.

8) रोख्यांच्या वर्गणीच्या संदर्भात अर्जाची रक्कम गोळा करण्यासाठी एक किंवा अधिक बँकर्स यांची नियुक्त करणे.

9) बाँड इश्यू करण्यासाठी बँकांकडे एक किंवा अधिक विना-हक्क एस्क्रो चालू (करंट) खाती उघडणे आणि बाँड्स जारी करताना गुंतवणूकदारांकडून प्राप्त झालेल्या रकमेसाठी तसेच स्ट्रक्चर्ड पेमेंट मेकॅनिझम/ एस्क्रो मॅकेनिझम / Waterfall Mechanism चे कामकाज चालविण्यासाठी/ बुडणाऱ्या निधीची यंत्रणा/ व्याज देय यंत्रणा/ डीएसआरए यंत्रणा किंवा बाँडच्या जबाबदा-या तसेच वेळेवर परतफेड करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही इतर अटी/ यंत्रणा निश्चित करणे.

10) मास्टर क्रिएशन फॉर्म, कॉर्पोरेट ऍक्शन फॉर्म आणि एनएसडीएल आणि सीडीएसएल तसेच बॉन्ड्सच्या डिमटेरिअलायझेशनसाठी रजिस्ट्रारकडे आवश्यक ते कागदपत्रे/ करार तयार करणे, स्वाक्षरी करणे, फाईल करणे आणि अंमलात आणणे.

11) संबंधित नियामक/ वैधानिक मुद्यांच्या पूर्ततेसाठी आणि डीईएमएटी (DEMAT)खात्यात वाटप/ बाँड प्रमाणपत्रांची पतपत्रे जमा न करणे यासारख्या कोणत्याही पूर्व-इश्यू/ इश्युनंतर गुंतवणूकदारांच्या समस्या/ तक्रारींचे निवारण करण्यासाठी अनुपालन अधिकारी नेमणे. उदा. परतावा ऑर्डर, व्याज वॉरंट इ.

12) डीएएमएटी (DEMAT) सुविधा अंतर्गत बाँडचे वाटप करणे आणि एनएसडीएल/ सीडीएसएल, Registrarआणि हस्तांतरण एजंट्स यांच्याशी आवश्यक करार करून डीईएमएटी (DEMAT) सुविधा पुरविणे.

13) बॉण्ड्स डिमटेरियलायझेशन आणि याद्या सूचीबद्ध करण्याच्या प्रस्तावित मुद्यासाठी महामंडळाचा/ महापालिकेचा शिक्का चिकटविणे.

14) लागू कायदे व नियमांनुसार मुद्रांक शुल्क भरणे.

15) जारी कर्त्याच्या बाँडच्या प्रस्तावित मुद्द्यांशी संबंधित इतर कोणत्याही विषयावर निर्णय घेणे.

**ग)** महानगरपालिका आयुक्त/ अतिरिक्त आयुक्त त्यांच्या पुढील बैठकीत जनरल बोर्डाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील अतिरिक्त काम करण्यासाठी संयुक्तपणे अथवा प्रत्येक सदस्य अधिकृत असतील.

1) भागधारकांना बाँड प्रमाणपत्रे देणे.

2) बॉण्ड्सचे डिमटेरियलाइझ करण्यासाठी आवश्यक अशी सर्व कृत्ये, कामे, बाबी आणि गोष्टी करणे.

3) एनएसडीएल आणि सीडीएसएलला आवश्यक असलेले सर्व करार आणि अशा दस्तऐवजांवर स्वाक्षरी करणे.

4) वाटप करण्यात आलेल्या लाभार्थींच्या खात्यावर रोखे जमा करणे.

उपरोक्त नमूद तपशिलाप्रमाणे महापालिकेचे कर्ज/ कर्जरोखे उभारणेकामी उपरोक्त प्रस्तावित सर्व बाबींसह याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ७

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४५ दि.६/८/२०२१
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.६७४ दि.२०/८/२०२१
अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीकडे मा.महापालिका सभेने विविध अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुसार मा.विधी समितीची मान्यतेकामी आवश्यक विषय ब-याचवेळा विधी समितीकडे येणारे विषय सदस्य पारित ठराव करुन मा.स्थायी समिती आणि मा.महापालिका सभेपुढे परस्पर ठेवून मान्यता घेतली जाते, त्यामुळे मा.विधी समितीकडे विषय सादर होत नाहीत. तरी, यापुढे मा.विधी समितीचे अधिकारात असलेले विषय परस्पर मा.स्थायी समिती किंवा मा.महापालिका सभेपुढे सदस्य पारित ठराव सादर करु नयेत आणि जरी सन्मा.सदस्यांच्या प्रस्ताव/उपसुचनेनुसार अशा विषयांना मान्यता देण्यात आली तरी असे विषय रितसर प्रशासना मार्फत मा.विधी समितीपुढे सादर करणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.चंद्रकांत नखाते – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – ६९८ विषय क्रमांक – ७

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.सुजाता पालांडे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४५ दि.६/८/२०२१
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.६७४ दि.२०/८/२०२१
अन्वये.

विषय क्रमांक ७ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.वसंत बोराटे, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५० दि.२०/८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये यापूर्वी सफाई संवर्गात काम करणा-या कर्मचा-यांना लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसा हक्काने नोकरी देण्यात येत होती. त्याचा सफाई संवर्गात काम करणा-या समाजातील सर्व घटकांना लाभ मिळत होता, परंतु क्र.प्रशा/०६/कावि/११९१/२०२१, दि,०२/०७/२०२१ चे पत्रान्वये महानगरपालिकेच्या वतीने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक पणे सफाई संवर्गातील काम करणा-या अनुसूचित जाती (SC) वगळता ST, NT, OBC व खुल्या प्रवर्गातील (OPEN) वारसांना नोकरी देणे बंद करण्यात आले आहे. सदरची बाब अन्यायकारक आहे, परंतु सफाई संवर्गात काम करणा-या समाजातील सर्व जाती-धर्माच्या कर्मचा-यांनी आज शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी दिवस-रात्र पंचवीस ते तीस वर्षापासून साफ-सफाईची कामे केली आहेत व करित आहेत. उन्हात थंडीत व विशेषतः पावसाळयात अतिशय घाणेरडी दुर्गंधी येत असताना देखील स्वतःच्या जीवाची पर्वा न करता व त्यांच्या कुटुंबीयांचा विचार न करता शहराची पर्यायाने देशाची सेवा करीत घाणीचे मैला साफ करण्याचे काम केले आहेत, त्यांच्या वारसांना लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार हक्काची असलेली नोकरी फक्त जातीच्या आधारावर हिसकावली जात आहे. वारसांना त्याठिकाणी कामाला का घेऊ नये? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सद्यस्थितीत त्यांच्या सेवानिवृत्ती, स्वेच्छा निवृत्तीनंतर या घाणीच्या कामामुळे अनेक आजार होतात व जडलेले असतात त्यामुळे त्यांची जबाबदारी आरोग्याची देखभाल करणे हे त्यांच्या वारसा वर अवलंबून असते तसेच सेवानिवृत्ती व स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने त्यांच्या उपजिविकेचे साधन बंद पडलेले आहे व सध्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे म्हणून जे कोणी सफाई कर्मचारी कामगार आहेत त्यांना वारसा हक्क म्हणून त्यांच्या ठिकाणी नोकरी मिळावी व ज्या कोणी सफाई कर्मचा-यांनी स्वेच्छानिवृत्ती, सेवानिवृत्ती घेतली असेल व घेणार असेल त्यांच्या वारसदारांचा योग्य तो विचार व्हावा आणि सर्व समाजातील सफाई कर्मचारी यांचे काम एकाच प्रकारचे असल्याने त्यामध्ये जातीय निकष लावण्यात येऊ नयेत. तरी आरोग्य विभागामधील सर्व कर्मचा-यांच्या वारसास पुर्वलक्षी प्रभावाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत नेमणूक होणेस व सर्व महानगरपालिकेमधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक:सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे, दि. ११ मार्च २०१६ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे- शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ (३) मधील “सफाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छा सेवानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसूचित जातीमधील इतर सफाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा”.

सदर तरतुदीच्या अनुषंगाने शासनाकडून मनपाकडील पत्र क्र. प्रशासन/६/कावि/२४८/२०२१ दि.०९/०२/२०२१ अन्वये मार्गदर्शन मागविले असता, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र. पीएमसी-३०१८/प्र.क्र.३६४/नवि-२२ दिनांक १७ जून २०२१ अन्वये पुढील प्रमाणे मार्गदर्शन प्राप्त झाले आहे- दिनांक ११/०३/२०१६ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ (३) मधील “सफाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छा सेवानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसूचित जातीमधील इतर सफाई कर्मचाऱ्यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. अशी स्पष्ट तरतूद आहे. त्यामुळे अनुसूचित जाती व्यतिरीक्त अन्य प्रवर्गातील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसास वारसा हक्काने नियुक्ती देण्याची तरतूद नाही.”

उपरोक्त शासनाचे मार्गदर्शनानुसार महापालिका स्तरावर परिपत्रक क्र. प्रशा/६/कावि/११९१/२०२१ दि.०२/०७/२०२१ अन्वये सर्व विभागप्रमुख व संबंधित कर्मचा-यांना कार्यवाही करणेबाबत प्रशासनाच्या वतीने कळविलेले आहे. तथापि दि.०२/०७/२०२१ पर्यंतच अनुसूचित जात प्रवर्गा व्यतिरिक्त इतर जात प्रवर्गातील सफाई संवर्गातील कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त अथवा वैद्यकीय कारणास्तव सेवा निवृत्त झालेले आहेत. अशा सेवानिवृत्त झालेल्या सफाई संवर्गातील कर्मचा-यांच्या वारस व नातेवाईकांना लाड-पागे धोरणानुसार वारस हक्क नियुक्ती योजनेचा लाभ देणेस मान्यता यावी.

शासनाकडील या संदर्भातील मागदर्शन येईपर्यंतच्या कालावधीत ज्या कर्मचा-यांनी स्वत:च्या नोकरीतून स्वेच्छा सेवानिवृत्ती घेवून त्यांचे वारसांना नोकरी मिळेल या उददेशाने स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली आहे. अशा कर्मचा-यांनी त्यांचे वारसांना नियुक्ती देणेत यावी याकरीता अर्ज सादर केले होते. सबब एक विशेष बाब म्हणून अशा कर्मचा-यांचे (अनु.जाती व्यतिरिक्त) लाड-पागे धोरणानुसार वारस हक्क नियुक्ती योजनेचा लाभ देणेकरीता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

तसेच लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई संवर्गात कार्यरत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील कर्मचारी वगळता अन्य प्रवर्गातील कर्मचा-याचे वारसांना शासनाने दिनांक १७ जुन २०२१ रोजी केलेल्या मार्गदर्शनाचे तारखेपर्यंत ज्या कर्मचा-यांनी मनपा सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेतलेली आहे अशा कर्मचा-यांचे वारसांना मनपा सेवेत वारस नेमणूक देण्यास व आवश्यकता असलेस शासनाचे मान्यतेने कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी. तसेच महापालिका सभा ठराव क्र. ६१० दि.१८/०३/२०२१ अन्वये पुर्व पी.सी.एम.टी. कडील १२४ कर्मचारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी वर्ग करणेसाठी मान्यता देणेत आलेली आहे. ही मान्यता विचारात घेवून पुर्व पी.सी.एम.टी. कडील

१२४ कर्मचा-यांना त्यांचे सेवानिवृत्ती नंतर मिळणारे सर्व आर्थिक फायदे (उदा.ग्रॅच्युएटी, अर्जित रजा रोखीकरण, भविष्य निर्वाह निधी) महापालिकेमार्फत अदा करणेस मान्यता देणेत यावी.

मा.चंद्रकांत नखाते – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ६९९ विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.वसंत बोराटे, मा.पौर्णिमा सोनवणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५० दि.२०/८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये यापूर्वी सफाई संवर्गात काम करणा-या कर्मचा-यांना लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसा हक्काने नोकरी देण्यात येत होती. त्याचा सफाई संवर्गात काम करणा-या समाजातील सर्व घटकांना लाभ मिळत होता, परंतु क्र.प्रशा/०६/कावि/११९१/२०२१, दि,०२/०७/२०२१ चे पत्रान्वये महानगरपालिकेच्या वतीने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक पणे सफाई संवर्गातील काम करणा-या अनुसूचित जाती (SC) वगळता ST, NT, OBC व खुल्या प्रवर्गातील (OPEN) वारसांना नोकरी देणे बंद करण्यात आले आहे. सदरची बाब अन्यायकारक आहे, परंतु सफाई संवर्गात काम करणा-या समाजातील सर्व जाती-धर्माच्या कर्मचा-यांनी आज शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी दिवस-रात्र पंचवीस ते तीस वर्षापासून साफ-सफाईची कामे केली आहेत व करित आहेत. उन्हात थंडीत व विशेषतः पावसाळयात अतिशय घाणेरडी दुर्गंधी येत असताना देखील स्वतःच्या जीवाची पर्वा न करता व त्यांच्या कुटुंबीयांचा विचार न करता शहराची पर्यायाने देशाची सेवा करीत घाणीचे मैला साफ करण्याचे काम केले आहेत, त्यांच्या वारसांना लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार हक्काची असलेली नोकरी फक्त जातीच्या आधारावर हिसकावली जात आहे. वारसांना त्याठिकाणी कामाला का घेऊ नये? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सद्यस्थितीत त्यांच्या सेवानिवृत्ती, स्वेच्छा निवृत्तीनंतर या घाणीच्या कामामुळे अनेक आजार होतात व जडलेले असतात त्यामुळे त्यांची जबाबदारी आरोग्याची देखभाल करणे हे त्यांच्या वारसा वर अवलंबून असते तसेच सेवानिवृत्ती व स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने त्यांच्या उपजिविकेचे साधन बंद पडलेले आहे व सध्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे म्हणून जे कोणी सफाई कर्मचारी कामगार आहेत त्यांना वारसा हक्क म्हणून त्यांच्या ठिकाणी नोकरी मिळावी व ज्या कोणी सफाई कर्मचा-यांनी स्वेच्छानिवृत्ती, सेवानिवृत्ती घेतली असेल व घेणार असेल त्यांच्या वारसदारांचा योग्य तो विचार व्हावा आणि सर्व समाजातील सफाई कर्मचारी यांचे काम एकाच प्रकारचे असल्याने त्यामध्ये जातीय निकष लावण्यात येऊ नयेत. तरी आरोग्य विभागामधील सर्व कर्मचा-यांच्या वारसास पुर्वलक्षी प्रभावाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत नेमणूक होणेस व सर्व महानगरपालिके मधील प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक:सफाई-

२०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे, दि. ११ मार्च २०१६ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे- शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ (३) मधील “सफाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छा सेवानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसूचित जातीमधील इतर सफाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा”.

सदर तरतुदीच्या अनुषंगाने शासनाकडून मनपाकडील पत्र क्र. प्रशासन/६/कावि/२४८/२०२१ दि.०९/०२/२०२१ अन्वये मार्गदर्शन मागविले असता, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र. पीएमसी-३०१८/प्र.क्र.३६४/नवि-२२ दिनांक १७ जून २०२१ अन्वये पुढील प्रमाणे मार्गदर्शन प्राप्त झाले आहे- दिनांक ११/०३/२०१६ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ (३) मधील “सफाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छा सेवानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसूचित जातीमधील इतर सफाई कर्मचाऱ्यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. अशी स्पष्ट तरतूद आहे. त्यामुळे अनुसूचित जाती व्यतिरीक्त अन्य प्रवर्गातील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसास वारसा हक्काने नियुक्ती देण्याची तरतूद नाही.”

उपरोक्त शासनाचे मार्गदर्शनानुसार महापालिका स्तरावर परिपत्रक क्र. प्रशा/६/कावि/११९१/२०२१ दि.०२/०७/२०२१ अन्वये सर्व विभागप्रमुख व संबंधित कर्मचा-यांना कार्यवाही करणेबाबत प्रशासनाच्या वतीने कळविलेले आहे. तथापि दि.०२/०७/२०२१ पर्यंतच अनुसूचित जात प्रवर्गा व्यतिरिक्त इतर जात प्रवर्गातील सफाई संवर्गातील कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त अथवा वैद्यकीय कारणास्तव सेवा निवृत्त झालेले आहेत. अशा सेवानिवृत्त झालेल्या सफाई संवर्गातील कर्मचा-यांच्या वारस व नातेवाईकांना लाड-पागे धोरणानुसार वारस हक्क नियुक्ती योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेत येत आहे.

शासनाकडील या संदर्भातील मागदर्शन येईपर्यंतच्या कालावधीत ज्या कर्मचा-यांनी स्वत:च्या नोकरीतून स्वेच्छा सेवानिवृत्ती घेवून त्यांचे वारसांना नोकरी मिळेल या उददेशाने स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली आहे. अशा कर्मचा-यांनी त्यांचे वारसांना नियुक्ती देणेत यावी याकरीता अर्ज सादर केले होते. सबब एक विशेष बाब म्हणून अशा कर्मचा-यांचे (अनु.जाती व्यतिरिक्त) लाड-पागे धोरणानुसार वारस हक्क नियुक्ती योजनेचा लाभ देणेकरीता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

तसेच लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई संवर्गात कार्यरत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील कर्मचारी वगळता अन्य प्रवर्गातील कर्मचा-याचे वारसांना शासनाने दिनांक १७ जुन २०२१ रोजी केलेल्या मार्गदर्शनाचे तारखेपर्यंत ज्या कर्मचा-यांनी मनपा सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेतलेली आहे अशा कर्मचा-यांचे वारसांना मनपा सेवेत वारस नेमणूक देण्यास व आवश्यकता असलेस शासनाचे मान्यतेने कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महापालिका सभा ठराव क्र.६१० दि.१८/०३/२०२१ अन्वये पुर्व पी.सी.एम.टी. कडील १२४ कर्मचारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी वर्ग करणेसाठी मान्यता देणेत आलेली आहे. ही मान्यता विचारात घेवून पुर्व

पी.सी.एम.टी. कडील १२४ कर्मचा-यांना त्यांचे सेवानिवृत्ती नंतर मिळणारे सर्व आर्थिक फायदे (उदा.ग्रॅच्युएटी, अर्जित रजा रोखीकरण, भविष्य निर्वाह निधी) महापालिकेमार्फत अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा. अॅड.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ९

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/१०८५/२०२१, दि.२८/०८/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५२ दि.३/९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** अभिनामाची पदे **S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता १ पद रिक्त आहे. **'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो यांच्या अध्यक्षते खाली पदोन्नती समिती सभा दिनांक २१/०८/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'कॉम्प्युटर प्रोग्रॅमर'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **'कॉम्प्युटर प्रोग्रॅमर'** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** पदावर **एस-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.विधी/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | कॉम्प्युटर प्रोग्रॅमर कर्मचा-यांचे नावं | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | श्रीम.गोडसे उज्वला दत्तात्रय | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **'कॉम्प्युटर प्रोग्रॅमर'** यांना **एस-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** मध्ये **'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** पदावर, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासकिय व तांत्रीक सेवा व्यतिरिक्त अन्य सेवांच्या विभागाचे तत्सम वेतनश्रेणी धारण करणाऱ्या व मनपा दीर्घ सेवा झालेल्या " विभाग प्रमुख " कर्मचाऱ्यांना देखील समान पदोन्नतीची संधी देणे आवश्यक आहे.

पिंपरी चिचंवड महानगरपालिकेचे अग्निशमन, सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन हे अत्यावश्यक सेवेचे, नागरीकांची जिवित, वित्तहानी पासुन सुरक्षा व बचाव करणारे मनपा मिळकतीचे संरक्षण, सुरक्षा करणारे महत्त्वाचे विभाग असून, आपत्ती आलेवर सदर विभागाचे कामकाज हे समन्वय ठेवून करणे आवश्यक आहे. अग्निशामक, आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षा या विभागाकरीता संरक्षण दलाप्रमाणे योग्य समन्वय साधणे व प्रभावी कामकाज होणेकामी एकच वरिष्ठ नियंत्रित अधिकारी असलेस, सदर अधिकाऱ्यामार्फत संपुर्ण आपत्कालीन परिस्थितीचा आढावा घेणे, नियंत्रण ठेवणे, योग्य तो समन्वय साधुन कामकाज करणेकामी " सह. आयुक्त (आपत्ती सेवा) " हे स्वतंत्र पद नव्याने निर्माण करणेची आवश्यकता आहे.

तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडील अस्तित्वात असलेले "सह. आयुक्त" या एकमेव पदाव्यतिरिक्त "सह.आयुक्त (आपत्ती सेवा)" असे नविन पद निर्माण करुन, सदर पदाकरीता पुढील प्रमाणे सेवा प्रवेश नियम लागू करणे आवश्यक आहे.

| क्र. | पदनाम | नेमणुक पध्दती | नव्याने मंजूर करावयाची अर्हता |
|---|---|---|---|
| १ | सह आयुक्त,<br>(आपत्ती सेवा)<br>१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन ६९०० | पदोन्नती<br>१०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवीधर<br>२) मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा मुख्य सुरक्षा अधिकारी किंवा मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणारा सेवा जेष्ठ अधिकारी असणे आवश्यक |

तरी, प्रशासकिय व तांत्रीक संवर्गा व्यतिरिक्त उक्त प्रमाणे आपत्ती विषयक कामकाज करणाऱ्या “ विभाग प्रमुख ” अधिका-यांना देखील प्रशासकीय सेवेमध्ये वरिष्ठ स्तरावर कामकाज करणेची समान संधी देणेकामी वरील प्रमाणे नविन पद निर्माण करुन सदर पदाचे आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमास मंजूरी मिळणेकामी वरील उपसुचना स्वीकृत करुन ठराव मंजूरीस मान्यता देणेत यावी तसेच सदर पद निर्मीती बाबत प्रस्ताव शासनाकडे मंजुरी कामी पाठविण्यास मान्यता देणेत यावी. सदर पद निर्माण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अणुविदयुत व दूरसंचार विभागात सह शहर अभियंता (दूरसंचार) या अभिनामाचे पद मंजूर असून सध्या रिक्त आहे. श्री. थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) हे सदर पदावर सेवाजेष्ठ असून ते B-Tech in Electronics & Communication Engineering, Diploma In Electronics & Telecommunication Engineering, महाराष्ट्र शासनाचे अभियांत्रीकी अधिकारी महाविदयालय, नाशिक यांचेकडील विदयुत अभियंता यांची व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण आहेत तसेच ते संगणक अर्हताही धारण करित आहेत. मनपामधे त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाबाबत त्यांचे वरिष्ठांनी गेली १५ वर्षे त्यांचे गोपणीय अहवालात सतत अत्युत्कृष्ट A+ अशी नोंद केली आहे.

श्री. थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) हे सह शहर अभियंता (दूरसंचार) या पदाकरिता महाराष्ट्र शासनाचे मंजूर सेवानियमानुसार विहीत केलेली शैक्षणीक व तांत्रीक अर्हता व अनुभव धारण करित आहेत. तसेच ते एकमेव अर्हताधारक व सेवाजेष्ठ कार्यकारी अभियंता (दूरसंचार) आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये CCTV सर्व्हेलन्स, फायबर ऑप्टीक केबलींग, विवीध प्रकारची वायर्ड व वायरलेस कम्युनिकेशन यंत्रणा, तारांगण, विवीध प्रकारची Electronics & Telecommunication Engineering संबंधीत Audio & Vidio यंत्रणा, वैदयकिय उपकरणे इत्यादी सर्व यंत्रणांचे सूयोग्य नियंत्रण व कामकाजासाठी श्री. थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) यांची सह शहर अभियंता (दूरसंचार) पदावर सेवाजेष्ठतेने पदोन्नतीव्दारे नेमणूक करणेस व त्यानुसार त्यांचेकडे उपरोक्त नमूद कामकाज सोपवणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वरिष्ठ स्वीय सहायक व लघुलेखक, निवडश्रेणी या अभिनामाची पदे नव्याने निर्मिती करणेस मान्यता देणेत यावी. महाराष्ट्र शासनामार्फत दि. १८ फेब्रुवारी २०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मनपा सेवेत प्रवेशाकरिता सुधारित नियमांना मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, पिंपरी चिंचवड शहराचा झपाट्याने विस्तार होत असून महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्येही वाढ होत आहे. त्याअनुषंगाने महापालिकेमध्ये नव्याने अति.आयुक्त व उपआयुक्तांची पदे निर्मित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे प्रशासकीय कामकाजाच्या सोईसाठी महानगरपालिकेमध्ये लघुलेखक संवर्गातील नविन पदांची निर्मिती करणे आवश्यक

आहे. त्याकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वरिष्ठ स्वीय सहायक (गट अ) या अभिनामाचे २ पद व लघुलेखक, निवडश्रेणी (गट ब) या अभिनामाची ३ पदे नव्याने खालील अर्हतेत व पदसंख्येत निर्माण करणेस मान्यता देणेत यावी.

| संवर्ग | पदनाम व पदसंख्या | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती | नेमणुकी करिता अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा<br>गट –अ | वरीष्ठ स्विय सहाय्यक (२ पदे) | पदोन्नतीने १०० टक्के (वेतनश्रेणी ५६१००-१७७५०० वेतनस्तर एस-२०) | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लघुलेखक (निवडश्रेणी) पदावरील कर्मचा-यांमधुन सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीने |
| प्रशासकीय सेवा<br>गट- ब | लघुलेखक निवडश्रेणी<br>(३ पदे) | पदोन्नतीने १०० टक्के (वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० वेतनस्तर एस-१६) | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लघुलेखक (उच्चस्तर) पदावरील कर्मचाऱ्यांमधुन सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीने |

तसेच लघुलेखक (उच्चस्तर) या अभिनामाची ४ अतिरिक्त पदे व लघुलेखक (निम्नस्तर) या अभिनामाची ८ अतिरिक्त पदे मनपा आस्थापनेवर निर्मिती करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच मा.स्थायी समिती ठराव क्रं.१०१७५ दि.१८/८/२०२१ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर एक्सरे-टेक्निशिअन अभिनामाची १० पदे बी. एस. सी. भौतिकशास्त्र व एक्सरे टेक्निशिअन या अर्हतेमध्ये मंजूर आहेत. तथापी या अर्हतेमध्ये उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे बी.एस.सी. भौतिकशास्त्र ही अर्हता शिथील करुन १२ वी शास्त्र व एक्सरे-टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण या अर्हतेमध्ये ८ पैकी ६ कर्मचा-यांना पदावर नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत नसल्याने एस.टी. प्रवर्गातील अनुशेष सन १९९३ पासून शिल्लक आहे. अनुशेष भरण्याबाबत प्रयत्न करूनही एस.टी. प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध होत नाही. त्यामुळे अनुशेष शिल्लक आहे. श्री. यशवंत सोपान डावखर, हे मनपा रूग्णालयात वॉर्डबॉय पदावर ८ वर्षापासून नियमीत वेतनश्रेणीत काम करत आहेत. त्यांची अर्हता ही १२ वी शास्त्र व एक्सरे-टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण असून ते एस.टी. प्रवर्गातील आहेत.

या सर्व बाबींचा विचार करता श्री. यशवंत सोपान डावखर, वॉर्डबॉय हे १२ वी शास्त्र व एक्सरे-टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण ही अर्हता धारण करीत असून एस.टी. प्रवर्गातील मनपा कर्मचारी आहेत. एक्सरे-टेक्निशिअन पदाचा एस.टी. प्रवर्गाचा सन १९९३ सालापासून अनुशेष शिल्लक आहे. यापुर्वी बी. एस. सी भौतिकशास्त्र ही शैक्षणिक अर्हता शिथील करून एक्सरे-टेक्निशिअन पदावर नेमणूका देण्यात आल्या आहेत. त्यानुसार श्री.यशवंत सोपान डावखर,

वॉर्डबॉय यांना बी.एस.सी. भौतिकशास्त्र ही अर्हता शिथील करुन त्यांना एक्सरे-टेक्निशिअन पदावर नियुक्ती देवून एस.टी. प्रवर्गातील अनुशेष भरून काढणेस तसेच आवश्यकतेनुसार शासनाची मान्यता घेण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच मनपाच्या आस्थापनावरील अभियांत्रिकी विभागाच्या आकृतिबंधामध्ये मुख्य अभियंता अभिनामाची पदे मंजुर करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या आकृतिबंधास महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाची मान्यता मिळाली आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे क्षेत्रफळ १८१ चौ.किमी असून सध्याची लोकसंख्या सुमारे २५ ते ३० लाख इतकी आहे. मनपाचा सरासरी वार्षिक अर्थसंकल्प सुमारे ७००० कोटी रुपये इतका असून शहराची वाढ झपाट्याने होत आहे. महापालिकेत नव्याने ७ गावांचा समावेश करण्याचे प्रस्तावित केल्यामुळे भविष्यात मनपाच्या कार्यक्षेत्रात वाढ होणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश नुकताच 'ब' वर्ग महापालिकेत झाला असून महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने पुणे मनपाच्या धर्तीवर आकृतिबंध तयार करणेविषयी मनपास सुचविलेले आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे वाढते कार्यक्षेत्र, वाढती लोकसंख्या, नागरिकरणाचा झपाट्याने होणारा विकास व शासनाच्या विविध योजना व त्या अनुषंगाने वाढणा-या विकास कामाची व्याप्ती लक्षात घेऊन महानगरपिलकेच्या अभियांत्रिकी विभागाच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतिबंध पुणे मनपाच्या महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. पीएमसी-३०१४/प्र.क्र.२/नवि-२२, दिनांक २६ ऑगस्ट २०१४ चे मंजूर आकृतिबंधानुसार पिंपरी चिंचवड मनपाचे आस्थापनेवरही अभियांत्रिकी विभागात खालीलप्रमाणे नव्याने पदनिर्मिती करणेस मान्यता देणेत यावी.

| क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पदाची अर्हता | कामकाज |
|---|---|---|---|---|
| १ | शहर अभियंता (मुख्य अभियंता समकक्ष) | एस-२९ १३११००-२१६६०० | १. स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर किंवा तत्सम अर्हता धारक व सह शहर अभियंता पदावरील किमान २ वर्षाचा अनुभव<br>२. १००% पदोन्नतीने मनपा सेवेतील सह शहर अभियंता पदामधून सेवाज्येष्ठतेने | बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम, विषयक व क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे संपुर्ण कामकाज |

| क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदाची अर्हता | कामकाज |
|---|---|---|---|---|
| २ | मुख्य अभियंता (प्रोजेक्टस) | एस-२९ १३११००-२१६६०० | १. स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवीधर किंवा तत्सम अर्हता धारक / पदव्युत्तर पदवी धारण करणा-या सह शहर अभियंता पदावरील किमान २ वर्षाचा अनुभव<br>२. १००% पदोन्नतीने सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे | मुख्य रस्ते, BRTS, पुल व प्रकल्प, वाहतुक नियोजन, इमारती प्रकल्प, BSUP/SRA/PMAY इत्यादी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | मुख्य अभियंता (पर्यावरण) | एस-२९ १३११००-२१६६०० | १. पर्यावरण अभियांत्रिकी विभागातील पदवी किंवा तत्सम अर्हता धारक किंवा पदव्यत्तर पदवी धारण करणा-या सेवाज्येष्ठ सह शहर अभियंतामधून १००% पदोन्नतीने<br>२. सह शहर अभियंता, (पर्यावरण) या पदावरील किमान २ वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक. | पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, पाणीपुरवठा, जलनि:सारण, उद्यान इ. पर्यावरण विषयक सबंधित विभागाचे कामकाज |

सबब पिंपरी चिंचवड मनपाचे वाढते क्षेत्र, वाढती लोकसंख्या व त्या अनुषंगाने वाढणारा विकास कामावरील वाढणारा ताण व त्या अनुषंगाने शासनाच्या विविध योजना व मनपाचा अर्थसंकल्पात होणारी वाढ लक्षात घेता त्याची अंमलबजावणी परिणामकारक होणेच्या दृष्टीने पुणे मनपाच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अभियांत्रिकी विभागामध्ये उपरोक्तप्रमाणे मुख्य अभियंता, समकक्ष पदांची वरीलप्रमाणे पदनिर्मिती करुन सुधारित आकृतिबंधास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मंजूर आकृतिबंधानुसार “अतिरिक्त आयुक्त” या पदनामाची तीन पदे वेतनश्रेणी एस-२५, ७८८००-२०९२०० ग्रेड पे ७६०० मध्ये मंजुर आहेत. यापैकी दोन पदे ही शासनाच्या सेवेतील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने व एक पद शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१४/प्र.क्र.२१८/नवि-१४, दिनांक ०६/०१/२०१५, दिनांक ०७/०१/२०१५ व दिनांक २५/०६/२०१५ अन्वये नगरविकास विभागाच्या मान्यतेनुसार मनपामधील कार्यरत सेवाज्येष्ठ अधिका-यांमधून पदोन्नतीने भरण्यास मान्यता आहे. महापालिका सेवेतील MMC Act-Sec.45 अंतर्गत पदावरील अधिका-यांना त्यांची सेवा कायम झाल्याच्या दिनांकापासून १० वर्षाचा अनुभव “अतिरिक्त आयुक्त” पदावर नेमणूकीकरिता आवश्यक आहे. MMC Act- Sec. 45 अंतर्गत पदावर निवड झाल्यानंतर सेवानिवृत्तीचे वेळी बहुतांशी अधिका-यांची १० वर्षे सेवा पुर्ण होत असल्याने महापालिका सेवेतील MMC Act-Sec.45 अंतर्गत अधिका-यांची या पदावर नियमीत नियुक्ती होण्यास अडचण आहे. सबब सदर पदाकरिता खालील प्रमाणे अर्हतेमध्ये शासन मान्यतेने सुधारणा करणेस मान्यता देणेत यावी.

१) महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ४५ अंतर्गत उपायुक्त व नगरसचिव या गट “अ” मधील समकक्ष पदावरील सेवा नियमित झाल्याचे तारखेपासून अथवा पदाचे समावेशन झाल्याच्या तारखेपासून किमान ०७ वर्षे सेवा पुर्ण करणा-या सेवाज्येष्ठ अधिका-याची “अतिरिक्त आयुक्त” पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यासाठी सेवानियमात शासन मान्यतेने बदल करण्यास मान्यता देणेत यावी तसेच महापालिका अस्थापनेवरील “सह शहर अभियंता” वेतनश्रेणी र.रु. ७८८००-२,०९,२०० ग्रेड पे ७६०० ही “शहर अभियंता पदाची” समकक्ष वेतनश्रेणी असून, उपायुक्त व नगरसचिव पदाचे वेतनश्रेणीपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी असल्याने “सह शहर अभियंता” पदावरील सेवाज्येष्ठ अधिका-याला “अतिरिक्त आयुक्त” पदावर नेमणुकीची संधी निर्माण व्हावी याकरिता “ब” वर्ग महानगरपालिकेमध्ये MMC Act-Sec.45 अंतर्गत

महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील प्रशासकीय संवर्गातील अधिका-यांकरिता ०१ पद आणि तांत्रिक संवर्गातील अधिका-यांकरिता ०१ पद असणे आवश्यक आहे. सबब “अतिरीक्त आयुक्त” (तांत्रिक) वेतनश्रेणी एस-२९ र.रु.१,३१,१००-२,१६,६०० या वेतनश्रेणीत एक जादा “अतिरिक्त आयुक्त” अभिनामाचे पद निर्माण करण्यास तसेच “सह शहर अभियंता” या पदाचा समावेश “महाराष्ट्र महापालिका अधिनियमांचे कलम ४५ मध्ये करुन नव्याने निर्माण होणा-या “अतिरिक्त आयुक्त” (तांत्रिक) या पदावर समकक्ष वेतनश्रेणी असलेल्या “शहर अभियंता” आणि MMC Act-Sec.45 मध्ये नव्याने समाविष्ट होणा-या “सह शहर अभियंता” या पदावर काम करणा-या सेवाजेष्ठ अधिका-याची नेमणूक करणेकामी मंजूर अकृतीबंध व सेवानियमात दुरुस्ती करण्यास मान्यता देणेकामी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच महापालिका अस्थापनेवरील प्रशासकीय संवर्गातील MMC Act-Sec.45 अंतर्गत नेमणूक केलेल्या अधिका-यांची वेतनश्रेणी ही महापालिका अस्थापनेवरील तांत्रिक संवर्गातील MMC Act-Sec.45 अंतर्गत “शहर अभियंता” व भविष्यकाळात MMC Act-Sec.45 मध्ये समावेश करावयाच्या “सह शहर अभियंता” या पदांच्या वेतनश्रेण्या जास्त असल्याने सध्याचे मंजूर “अतिरिक्त आयुक्त” पदावर प्रशासकीय संवर्गातील उपायुक्त व नगरसचिव, सह.आयुक्त या पदांवर काम करणा-या सेवाज्येष्ठ अधिका-याची नेमणूक करण्यास आणि नव्याने “अतिरिक्त आयुक्त” (तांत्रिक) पद निर्माण झाल्यानंतर MMC Act-Sec.45 अंतर्गत सह शहर अभियंता या पदाचा समावेश करुन या पदावरील सेवाज्येष्ठ अधिका-याची सेवाज्येष्ठतेने नेमणूक करणेकामी सेवा नियमात दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर “सहाय्यक संचालक नगररचना” या संवर्गातील गट-अ मधील दर्जाचे वेतन श्रेणी र.रू.१५६००-३९१०० ग्रेडवेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) एक पद शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२१/प्र.क्र.५२/नवि-२२, दि.२१ जून २०२१ अन्वये शासन मंजूर झालेले आहे.

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सुधारित विकास आराखडा तयार करणेबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच नगररचना योजना (टि.पी.स्किम), केंन्द्र व राज्य शासनाच्या योजना तसेच महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यामधील रस्ते व आरक्षणे यांच्या जागा संपादना विषयी कार्यवाही चालू आहे. तसेच नव्याने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा भाग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये समाविष्ठ झाला आहे.तसेच ११ नवीन गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यामुळे वाढणाऱ्या लोकसंख्येचा व शहरीकरणाचा विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिका “ब” वर्ग महानगरपालिका असल्यामुळे ठाणे शहर या “ब” वर्ग महानगरपालिकेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नगररचना व विकास विभागासाठी “सहाय्यक संचालक नगररचना” या संवर्गातील आणखी एक पद निर्मिती करून त्यास शासन मान्यता घेणेकामी कार्यवाही करणेस व सदर या पदावरील अनुभव, शैक्षणिक आर्हता व पात्रता धारण करणारे पदोन्नतीपुर्व पदावरील कार्यरत असलेले मनपा अधिकारी श्री.संदेश खडतरे, उप अभियंता यांना “सहाय्यक संचालक नगररचना” या गट-अ मधील पदावर शासन मंजूरी पुर्वी उमेद मान्यतेवर पदोन्नती देणेस व शासन मंजूरी नंतर नियमीत पदोन्नती नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.चंद्रकांत नखाते - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.
मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७०० विषय क्रमांक – ९

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/१०८५/२०२१, दि.२८/०८/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५२ दि.३/९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** अभिनामाची पदे **S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता १ पद रिक्त आहे. **'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो यांच्या अध्यक्षते खाली पदोन्नती समिती सभा दिनांक २१/०८/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'कॉम्प्युटर प्रोग्रॅमर'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **'कॉम्प्युटर प्रोग्रॅमर'** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** पदावर **एस-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.विधी/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **कॉम्प्युटर प्रोग्रॅमर कर्मचा-यांचे नावं** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** |
|---|---|---|
| १ | श्रीम.गोडसे उज्वला दत्तात्रय | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **'कॉम्प्युटर प्रोग्रॅमर'** यांना **एस-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** मध्ये **'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** पदावर, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन

राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासकिय व तांत्रीक सेवा व्यतिरिक्त अन्य सेवांच्या विभागाचे तत्सम वेतनश्रेणी धारण करणाऱ्या व मनपा दीर्घ सेवा झालेल्या " विभाग प्रमुख " कर्मचाऱ्यांना देखील समान पदोन्नतीची संधी देणे आवश्यक आहे.

पिंपरी चिचंवड महानगरपालिकेचे अग्निशमन, सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन हे अत्यावश्यक सेवेचे, नागरीकांची जिवित, वित्तहानी पासुन सुरक्षा व बचाव करणारे मनपा मिळकतीचे संरक्षण, सुरक्षा करणारे महत्त्वाचे विभाग असून, आपत्ती आलेवर सदर विभागाचे कामकाज हे समन्वय ठेवून करणे आवश्यक आहे. अग्निशामक, आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षा या विभागाकरीता संरक्षण दलाप्रमाणे योग्य समन्वय साधणे व प्रभावी कामकाज होणेकामी एकच वरिष्ठ नियंत्रित अधिकारी असलेस, सदर अधिकाऱ्यामार्फत संपुर्ण आपत्कालीन परिस्थितीचा आढावा घेणे, नियंत्रण ठेवणे, योग्य तो समन्वय साधुन कामकाज करणेकामी " सह. आयुक्त (आपत्ती सेवा) " हे स्वतंत्र पद नव्याने निर्माण करणेची आवश्यकता आहे.

तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडील अस्तित्वात असलेले "सह. आयुक्त" या एकमेव पदाव्यतिरिक्त "सह.आयुक्त (आपत्ती सेवा)" असे नविन पद निर्माण करुन, सदर पदाकरीता पुढील प्रमाणे सेवा प्रवेश नियम लागू करणे आवश्यक आहे.

| क्र. | पदनाम | नेमणुक पध्दती | नव्याने मंजूर करावयाची अर्हता |
|---|---|---|---|
| १ | सह आयुक्त,<br>(आपत्ती सेवा)<br>१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन ६९०० | पदोन्नती<br>१०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवीधर<br>२) मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा मुख्य सुरक्षा अधिकारी किंवा मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव असणारा सेवा जेष्ठ अधिकारी असणे आवश्यक |

तरी, प्रशासकिय व तांत्रीक संवर्गा व्यतिरिक्त उक्त प्रमाणे आपत्ती विषयक कामकाज करणाऱ्या " विभाग प्रमुख " अधिका-यांना देखील प्रशासकीय सेवेमध्ये वरिष्ठ स्तरावर कामकाज करणेची समान संधी देणेकामी वरील प्रमाणे नविन पद निर्माण करुन सदर पदाचे आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमास मंजूरी मिळणेकामी वरील उपसुचना स्वीकृत करुन ठराव मंजूरीस मान्यता देणेत येत आहे, तसेच सदर पद निर्मीती बाबत प्रस्ताव शासनाकडे मंजुरी कामी पाठविण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर पद निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अणुविदयुत व दूरसंचार विभागात सह शहर अभियंता (दूरसंचार) या अभिनामाचे पद मंजूर असून सध्या रिक्त आहे. श्री. थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) हे सदर पदावर सेवाजेष्ठ असून ते B-Tech in

Electronics & Communication Engineering, Diploma In Electronics & Telecommunication Engineering, महाराष्ट्र शासनाचे अभियांत्रीकी अधिकारी महाविदयालय, नाशिक यांचेकडील विदयुत अभियंता यांची व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण आहेत तसेच ते संगणक अर्हताही धारण करित आहेत. मनपामधे त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाबाबत त्यांचे वरिष्ठांनी गेली १५ वर्षे त्यांचे गोपणीय अहवालात सतत अत्युत्कृष्ट A+ अशी नोंद केली आहे.

श्री. थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) हे सह शहर अभियंता (दूरसंचार) या पदाकरिता महाराष्ट्र शासनाचे मंजूर सेवानियमानुसार विहीत केलेली शैक्षणीक व तांत्रीक अर्हता व अनुभव धारण करित आहेत. तसेच ते एकमेव अर्हताधारक व सेवाजेष्ठ कार्यकारी अभियंता (दूरसंचार) आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये CCTV सर्व्हेलन्स, फायबर ऑप्टीक केबलींग, विवीध प्रकारची वायर्ड व वायरलेस कम्युनिकेशन यंत्रणा, तारांगण, विवीध प्रकारची Electronics & Telecommunication Engineering संबंधीत Audio & Vidio यंत्रणा, वैदयकिय उपकरणे इत्यादी सर्व यंत्रणांचे सूयोग्य नियंत्रण व कामकाजासाठी श्री. थॉमस नरोन्हा, कार्यकारी अभियंता (दूरसंचार) यांची सह शहर अभियंता (दूरसंचार) पदावर सेवाजेष्ठतेने पदोन्नतीव्दारे नेमणूक करणेस व त्यानुसार त्यांचेकडे उपरोक्त नमूद कामकाज सोपवणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वरिष्ठ स्वीय सहायक व लघुलेखक, निवडश्रेणी या अभिनामाची पदे नव्याने निर्मिती करणेस मान्यता देणेत येत आहे. महाराष्ट्र शासनामार्फत दि. १८ फेब्रुवारी २०२० रोजीच्या अधिसूचनेद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२० लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मनपा सेवेत प्रवेशाकरिता सुधारित नियमांना मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, पिंपरी चिंचवड शहराचा झपाट्याने विस्तार होत असून महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्येही वाढ होत आहे. त्याअनुषंगाने महापालिकेमध्ये नव्याने अति.आयुक्त व उपआयुक्तांची पदे निर्मित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे प्रशासकीय कामकाजाच्या सोईसाठी महानगरपालिकेमध्ये लघुलेखक संवर्गातील नविन पदांची निर्मिती करणे आवश्यक आहे. त्याकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वरिष्ठ स्वीय सहायक (गट अ) या अभिनामाचे २ पद व लघुलेखक, निवडश्रेणी (गट ब) या अभिनामाची ३ पदे नव्याने खालील अर्हतेत व पदसंख्येत निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| संवर्ग | पदनाम व पदसंख्या | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३. प्रतिनियुक्ती | नेमणुकी करिता अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा गट –अ | वरीष्ठ स्विय सहाय्यक (२ पदे) | पदोन्नतीने १०० टक्के (वेतनश्रेणी ५६१००-१७७५०० वेतनस्तर एस-२०) | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लघुलेखक (निवडश्रेणी) पदावरील कर्मचा-यांमधुन सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीने |
| प्रशासकीय सेवा गट- ब | लघुलेखक निवडश्रेणी (३ पदे) | पदोन्नतीने १०० टक्के (वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० वेतनस्तर एस-१६) | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लघुलेखक (उच्चस्तर) पदावरील कर्मचाऱ्यांमधुन सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीने |

तसेच लघुलेखक (उच्चस्तर) या अभिनामाची ४ अतिरिक्त पदे व लघुलेखक (निम्नस्तर) या अभिनामाची ८ अतिरिक्त पदे मनपा आस्थापनेवर निर्मिती करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मा.स्थायी समिती ठराव क्रं.१०१७५ दि.१८/८/२०२१ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर एक्सरे-टेक्निशिअन अभिनामाची १० पदे बी. एस. सी. भौतिकशास्त्र व एक्सरे टेक्निशिअन या अर्हतेमध्ये मंजूर आहेत. तथापी या अर्हतेमध्ये उमेदवार उपलब्ध होत नसल्यामुळे बी.एस.सी. भौतिकशास्त्र ही अर्हता शिथील करुन १२ वी शास्त्र व एक्सरे-टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण या अर्हतेमध्ये ८ पैकी ६ कर्मचा-यांना पदावर नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत नसल्याने एस.टी. प्रवर्गातील अनुशेष सन १९९३ पासून शिल्लक आहे. अनुशेष भरण्याबाबत प्रयत्न करूनही एस.टी. प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध होत नाही. त्यामुळे अनुशेष शिल्लक आहे. श्री. यशवंत सोपान डावखर, हे मनपा रूग्णालयात वॉर्डबॉय पदावर ८ वर्षापासून नियमीत वेतनश्रेणीत काम करत आहेत. त्यांची अर्हता ही १२ वी शास्त्र व एक्सरे-टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण असून ते एस.टी. प्रवर्गातील आहेत.

या सर्व बाबींचा विचार करता श्री. यशवंत सोपान डावखर, वॉर्डबॉय हे १२ वी शास्त्र व एक्सरे-टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण ही अर्हता धारण करीत असून एस.टी. प्रवर्गातील मनपा कर्मचारी आहेत. एक्सरे-टेक्निशिअन पदाचा एस.टी. प्रवर्गाचा सन १९९३ सालापासून अनुशेष शिल्लक आहे. यापुर्वी बी. एस. सी भौतिकशास्त्र ही शैक्षणिक अर्हता शिथील करून एक्सरे-टेक्निशिअन पदावर नेमणूका देण्यात आल्या आहेत. त्यानुसार श्री.यशवंत सोपान डावखर, वॉर्डबॉय यांना बी.एस.सी. भौतिकशास्त्र ही अर्हता शिथील करुन त्यांना एक्सरे-टेक्निशिअन पदावर नियुक्ती देवून एस.टी. प्रवर्गातील अनुशेष भरून काढणेस तसेच आवश्यकतेनुसार शासनाची मान्यता घेण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मनपाच्या आस्थापनावरील अभियांत्रिकी विभागाच्या आकृतिबंधामध्ये मुख्य अभियंता अभिनामाची पदे मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध पदांच्या आकृतिबंधास महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाची मान्यता मिळाली आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे क्षेत्रफळ १८१ चौ.किमी असून सध्याची लोकसंख्या सुमारे २५ ते ३० लाख इतकी आहे. मनपाचा सरासरी वार्षिक अर्थसंकल्प सुमारे ७००० कोटी रुपये इतका असून शहराची वाढ झपाट्याने होत आहे. महापालिकेत नव्याने ७ गावांचा समावेश करण्याचे प्रस्तावित केल्यामुळे भविष्यात मनपाच्या कार्यक्षेत्रात वाढ होणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश नुकताच 'ब' वर्ग महापालिकेत झाला असून महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने पुणे मनपाच्या धर्तीवर आकृतिबंध तयार करणेविषयी मनपास सुचविलेले आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे वाढते कार्यक्षेत्र, वाढती लोकसंख्या, नागरिकरणाचा झपाट्याने होणारा विकास व शासनाच्या विविध योजना व त्या अनुषंगाने वाढणा-या विकास कामाची व्याप्ती लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या अभियांत्रिकी विभागाच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतिबंध पुणे मनपाच्या महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. पीएमसी-३०१४/प्र.क्र.२/नवि-२२, दिनांक २६ ऑगस्ट २०१४ चे मंजूर आकृतिबंधानुसार पिंपरी चिंचवड मनपाचे आस्थापनेवरही अभियांत्रिकी विभागात खालीलप्रमाणे नव्याने पदनिर्मिती करणेस मान्यता देणेत येत आहे.

| क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पदाची अर्हता | कामकाज |
|---|---|---|---|---|
| १ | शहर अभियंता (मुख्य अभियंता समकक्ष) | एस-२९ १३११००-२१६६०० | ३. स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर किंवा तत्सम अर्हता धारक व सह शहर अभियंता पदावरील किमान २ वर्षाचा अनुभव<br>४. १००% पदोन्नतीने मनपा सेवेतील सह शहर अभियंता पदामधून सेवाज्येष्ठतेने | बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम, विषयक व क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे संपुर्ण कामकाज |

| क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदाची अर्हता | कामकाज |
|---|---|---|---|---|
| २ | मुख्य अभियंता (प्रोजेक्टस) | एस-२९ १३११००-२१६६०० | ३. स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवीधर किंवा तत्सम अर्हता धारक / पदव्युत्तर पदवी धारण करणा-या सह शहर अभियंता पदावरील किमान २ वर्षाचा अनुभव<br>४. १००% पदोन्नतीने सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे | मुख्य रस्ते, BRTS, पुल व प्रकल्प, वाहतुक नियोजन, इमारती प्रकल्प, BSUP/SRA/PMAY इत्यादी. |
| ३ | मुख्य अभियंता (पर्यावरण) | एस-२९ १३११००-२१६६०० | ३. पर्यावरण अभियांत्रिकी विभागातील पदवी किंवा तत्सम अर्हता धारक किंवा पदव्युत्तर पदवी धारण करणा-या | पर्यावरण अभियांत्रिकी विभाग, पाणीपुरवठा, जलनि:सारण, उद्यान इ. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सेवाज्येष्ठ सह शहर अभियंतामधून १००% पदोन्नतीने<br>४. सह शहर अभियंता, (पर्यावरण) या पदावरील किमान २ वर्ष कामकाजाचा अनुभव आवश्यक. | पर्यावरण विषयक सबंधित विभागाचे कामकाज |

सबब पिंपरी चिंचवड मनपाचे वाढते क्षेत्र, वाढती लोकसंख्या व त्या अनुषंगाने वाढणारा विकास कामावरील वाढणारा ताण व त्या अनुषंगाने शासनाच्या विविध योजना व मनपाचा अर्थसंकल्पात होणारी वाढ लक्षात घेता त्याची अंमलबजावणी परिणामकारक होणेच्या दृष्टीने पुणे मनपाच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अभियांत्रिकी विभागामध्ये उपरोक्तप्रमाणे मुख्य अभियंता, समकक्ष पदांची वरीलप्रमाणे पदनिर्मिती करुन सुधारित आकृतिबंधास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मंजूर आकृतिबंधानुसार “अतिरिक्त आयुक्त” या पदनामाची तीन पदे वेतनश्रेणी एस-२५, ७८८००-२०९२०० ग्रेड पे ७६०० मध्ये मंजुर आहेत. यापैकी दोन पदे ही शासनाच्या सेवेतील अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने व एक पद शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१४/प्र.क्र.२१८/नवि-१४, दिनांक ०६/०१/२०१५, दिनांक ०७/०१/२०१५ व दिनांक २५/०६/२०१५ अन्वये नगरविकास विभागाच्या मान्यतेनुसार मनपामधील कार्यरत सेवाज्येष्ठ अधिका-यांमधून पदोन्नतीने भरण्यास मान्यता आहे. महापालिका सेवेतील MMC Act-Sec.45 अंतर्गत पदावरील अधिका-यांना त्यांची सेवा कायम झाल्याच्या दिनांकापासून १० वर्षाचा अनुभव “अतिरिक्त आयुक्त” पदावर नेमणूकीकरिता आवश्यक आहे. MMC Act- Sec. 45 अंतर्गत पदावर निवड झाल्यानंतर सेवानिवृत्तीचे वेळी बहुतांशी अधिका-यांची १० वर्षे सेवा पुर्ण होत असल्याने महापालिका सेवेतील MMC Act-Sec.45 अंतर्गत अधिका-यांची या पदावर नियमीत नियुक्ती होण्यास अडचण आहे. सबब सदर पदाकरिता खालील प्रमाणे अर्हतेमध्ये शासन मान्यतेने सुधारणा करणेस मान्यता देणेत येत आहे.

२) महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ४५ अंतर्गत उपायुक्त व नगरसचिव या गट “अ” मधील समकक्ष पदावरील सेवा नियमित झाल्याचे तारखेपासून अथवापदाचे समावेशन झाल्याच्या तारखेपासून किमान ०७ वर्षे सेवा पुर्ण करणा-या सेवाज्येष्ठ अधिका-याची “अतिरिक्त आयुक्त” पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यासाठी सेवानियमात शासन मान्यतेने बदल करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच महापालिका अस्थापनेवरील “सह शहर अभियंता” वेतनश्रेणी र.रु. ७८८००-२,०९,२०० ग्रेड पे ७६०० ही “शहर अभियंता पदाची” समकक्ष वेतनश्रेणी असून, उपायुक्त व नगरसचिव पदाचे वेतनश्रेणीपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी असल्याने “सह शहर अभियंता” पदावरील सेवाज्येष्ठ अधिका-याला “अतिरिक्त आयुक्त” पदावर नेमणुकीची संधी निर्माण व्हावी याकरिता “ब” वर्ग महानगरपालिकेमध्ये MMC Act-Sec.45 अंतर्गत महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील प्रशासकीय संवर्गातील अधिका-यांकरिता ०१ पद आणि तांत्रिक संवर्गातील अधिका-यांकरिता ०१ पद असणे आवश्यक आहे. सबब “अतिरीक्त आयुक्त” (तांत्रिक) वेतनश्रेणी एस-२९ र.रु.१,३१,१००-२,१६,६०० या वेतनश्रेणीत एक जादा “अतिरिक्त आयुक्त” अभिनामाचे पद निर्माण करण्यास तसेच “सह शहर अभियंता” या पदाचा

समावेश “महाराष्ट्र महापालिका अधिनियमांचे कलम ४५ मध्ये करुन नव्याने निर्माण होणा-या “अतिरिक्त आयुक्त” (तांत्रिक) या पदावर समकक्ष वेतनश्रेणी असलेल्या “शहर अभियंता” आणि MMC Act-Sec.45 मध्ये नव्याने समाविष्ट होणा-या “सह शहर अभियंता” या पदावर काम करणा-या सेवाजेष्ठ अधिका-याची नेमणूक करणेकामी मंजूर अकृतीबंध व सेवानियमात दुरुस्ती करण्यास मान्यता देणेकामी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच महापालिका अस्थापनेवरील प्रशासकीय संवर्गातील MMC Act-Sec.45 अंतर्गत नेमणूक केलेल्या अधिका-यांची वेतनश्रेणी ही महापालिका अस्थापनेवरील तांत्रिक संवर्गातील MMC Act-Sec.45 अंतर्गत “शहर अभियंता” व भविष्यकाळात MMC Act-Sec.45 मध्ये समावेश करावयाच्या “सह शहर अभियंता” या पदांच्या वेतनश्रेण्या जास्त असल्याने सध्याचे मंजूर “अतिरिक्त आयुक्त” पदावर प्रशासकीय संवर्गातील उपायुक्त व नगरसचिव, सह.आयुक्त या पदांवर काम करणा-या सेवाज्येष्ठ अधिका-याची नेमणूक करण्यास आणि नव्याने “अतिरिक्त आयुक्त” (तांत्रिक) पद निर्माण झाल्यानंतर MMC Act-Sec.45 अंतर्गत सह शहर अभियंता या पदाचा समावेश करुन या पदावरील सेवाज्येष्ठ अधिका-याची सेवाज्येष्ठतेने नेमणूक करणेकामी सेवा नियमात दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर “सहाय्यक संचालक नगररचना” या संवर्गातील गट-अ मधील दर्जाचे वेतन श्रेणी र.रू.१५६००-३९१०० ग्रेडवेतन ६६०० (सहाव्या वेतन आयोगानुसार) एक पद शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२१/प्र.क्र.५२/नवि-२२, दि.२१ जून २०२१ अन्वये शासन मंजूर झालेले आहे.

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सुधारित विकास आराखडा तयार करणेबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच नगररचना योजना (टि.पी.स्किम), केंन्द्र व राज्य शासनाच्या योजना तसेच महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यामधील रस्ते व आरक्षणे यांच्या जागा संपादना विषयी कार्यवाही चालू आहे. तसेच नव्याने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा भाग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये समाविष्ठ झाला आहे. तसेच ११ नवीन गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यामुळे वाढणाऱ्या लोकसंख्येचा व शहरीकरणाचा विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिका “ब” वर्ग महानगरपालिका असल्यामुळे ठाणे शहर या “ब” वर्ग महानगरपालिकेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नगररचना व विकास विभागासाठी “सहाय्यक संचालक नगररचना” या संवर्गातील आणखी एक पद निर्मिती करून त्यास शासन मान्यता घेणेकामी कार्यवाही करणेस व सदर या पदावरील अनुभव, शैक्षणिक आर्हता व पात्रता धारण करणारे पदोन्नतीपुर्व पदावरील कार्यरत असलेले मनपा अधिकारी श्री.संदेश खडतरे, उप अभियंता यांना “सहाय्यक संचालक नगररचना” या गट-अ मधील पदावर शासन मंजूरी पुर्वी उमेद मान्यतेवर पदोन्नती देणेस व शासन मंजूरी नंतर नियमीत पदोन्नती नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमे मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १०

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/१०८६/२०२१, दि.२८/०८/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५३ दि.३/९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'वैद्यकीय अधिक्षक'** अभिनामाचे १ पद **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता रिक्त आहे. **'वैद्यकीय अधिक्षक'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो यांच्या अध्यक्षते खाली पदोन्नती समिती सभा दिनांक २१/०८/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'वैद्यकीय उपअधिक्षक'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **'वैद्यकीय उपअधिक्षक'** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'वैद्यकीय अधिक्षक'** पदावर **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.विधी/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **वैद्यकीय उपअधिक्षक नाव** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** |
|---|---|---|
| १ | डॉ.जाधव शंकर बळवंत | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **'वैद्यकीय उपअधिक्षक'** यांना **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२००** मध्ये **'वैद्यकीय अधिक्षक'** पदावर, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.केशव घोळवे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.चंद्रकांत नखाते – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -७०१ विषय क्रमांक – १०

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/१०८६/२०२१,
दि.२८/०८/२०२१
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५३ दि.३/९/२०२१

विषय क्रमांक १० दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७०२ विषय क्रमांक – ११

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.अति.आयुक्त (१) यांचेकडील
जा.क्र.कक्षेका/विजा/४७८/२०२१ दि.२६/८/२०२१

राज्य शासनाने कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा 1897व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ दि.१३/३/२०२० पासून लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथ रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम (३) 63 नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाय योजना तातडीने करणेकरीता वस्तु अथवा सेवांची आपत्कालीन परीस्थितीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे

मनपाच्या "क क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. २ मधील देहू – आळंदी रस्ता ते वडाचा मळा १८ मीटर नव्याने होणा-या डी. पी. रस्त्यावर दिवाबत्ती व्यवस्था करणे व अनुषंगीक कामे करणे" चे काम निविदा नोटीस क्र. १०/०१-२०१९/२० व कार्यादेश

क्र. वि.मुका/५/कावि/२१२/२०२० दि. ११/०३/२०२० अन्वये मे. सुमी इलेक्ट्रीकल्स सर्व्हीसेस यांचेमार्फत सुरु आहे. (निविदा रक्कम रु. १,३३,८५,७९८/- निविदा दर १७.२० % कमी).

कै. अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे पी.एम.आर.डी.ए. मार्फत डेडीकेटेड कोविड जम्बो रुग्नालय तयार करणेत आलेले आहे. व सध्यस्थितीमधे सदर रुग्नालय परिसरात मनपामार्फत कॅज्युल्टी शेड, वॉचमन रूम, रुग्नांच्या नातेवाईकांसाठी वेटींग रूम, फायरमन रूम तसेच मॉर्चुरी रूम तयार करणेत आलेल्या आहेत. सध्यस्थितीमधे सदर रुग्नालयाकरीता कार्यान्वीत असलेल्या रोहित्रसंचामधे नव्याने तयार करणेत आलेल्या शेड करीता विद्युतपुरवठा करणेकामी विद्युतभार उपलब्ध नसल्याने सदरचा विद्युतभार कै. अण्णासाहेब मगर स्टेडियम येथील जलतरण तलावाचे रोहित्रसंचामधून $3^{1/2}$ X 240 sq.mm. व $3^{1/2}$ X 185 sq.mm. लघुदाब केबल व मिनी फीडर पीलर उभारून तातडीने कार्यान्वीत करून घेणेत आला आहे. तसेच म.रा.वि.वि.कंपनीच्या मीटरींग किऑस्क पासून रोहित्रसंचाच्या RMU (Ring Main Unit) पर्यंतची केबल यापुर्वी ब्रेक झालेली असल्याने पर्यायी व्यवस्थेकामी सदर ठिकाणी नवीन 3 X 300 sq.mm. ची नवीन उच्चदाब केबल टाकणेत आली आहे. सदर कामाकरीता आवश्यक खर्च हा र. रु. २३,२५,४८१/- इतका आहे. सदरचा खर्च हा विषयांकीत कामाचे शिल्लक रकमेतुनच करणेत येणार असलेने कामास व खर्चास सुधारीत तांत्रिक मान्यतेची आवश्यकता नाही.

सबब, सदरचे काम हे तातडीचे असलेने सध्या 'क' क्षेत्रिय कार्यालयाकडील चालू असलेल्या उपरोक्त नमूद केलेल्या अशा प्रकारच्या कामातून मे. सुमी इलेक्ट्रीकल्स सर्व्हीसेस यांचेमार्फत करून घेणेत आलेले आहे. सबब सदर कामाकरीता "चेंज ऑफ साईट" करीता कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.संदीप वाघेरे – मा.महापौर साहेब, मला विषय नंबर ११ वर बोलायच होतं पण तो विषय तुम्ही लगेच मंजूर केला. मा.महापौर साहेब, तुम्ही मा.आयुक्तांना सहा महीन्यापुर्वी आदेश दिले होते स्पर्श हॉस्पिटलच्या अहवालाच्या बाबतीत. तो अहवाल आयुक्तांकडे आलेला आहे त्याचा खुलासा आयुक्तांनी केला का अजून पर्यंत सभागृहात. त्या अहवाला संदर्भात आयुक्तांनी आज खुलासा करणे गरजेच आहे.

मा.महापौर- ठिक आहे हे विषय झाले की तो अहवाल काय आहे त्याची आयुक्तांकडून वरती जावून माहीती घेवू यात.

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७०३ विषय क्रमांक – १२

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र. स्था/बीआरटीएस/१०७९/२०२१
दि. ७/९/२०२१

पिंपरी चिंचवड शहराच्या सौंदर्यात आणखी भर घालणे व त्यायोगे शहराच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेस साजेसे शहर निर्मितीच्या दृष्टीने सुशोभिकरणाचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने मनपातील विकसित करणेत आलेल्या रस्त्याच्या व उद्यानांच्या भिंतीवर काही विशेष संकल्पनावर आधारित ग्राफिटी वॉल व प्रतिकृतींचा वापर करून शहरात सुशोभीकरण करणे त्यासाठी विविध प्रकारच्या केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या योजनांच्या अनुषंगाने विविध संदेशपर भीती चित्रे रंगविणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे.

देशातील विविध राज्यातील शहरात उपरोक्त प्रमाणे संकल्पना आधारित (theme based)भित्ती चित्रे(graffiti walls) रंगविण्यात आली आहेत, तसेच शिल्प(sculptures) उभारण्यात आली आहेत. अश्या प्रकारचे संकल्पना आधारित भित्ती चित्रे(graffiti walls) रंगविणे तसेच शिल्प(sculptures)उभारणी विविध ठिकाणच्या उड्डाणपुलाच्या स्तंभावर व पुला खालील रीक्त जागेमध्ये करणेत आल्याचे आढळून येते. सदर काम करण्यासाठी त्यात्या शहरातील महानगरपालिकेने व इतर ठिकाणच्या या क्षेत्रात काम करणा-या संस्थांची नेमणूक करून सदर कामे केली आहेत.

अश्याप्रकारे काम करण्याच्या दृष्टीने पुढील तज्ञ सल्लागारांनी तयारी दर्शविली आहे.

| अ.क्र. | तज्ञ सल्लागारचे नाव | केलेल्या कामाचा तपशील |
|---|---|---|
| १ | Symbiosis Skill University, Pune | - |
| २. | MIT ADT University, Pune | - |
| ३. | Pune Binale Foundation, Pune | पुणे शहरातील विविध ठिकाणी |
| ४. | Start India, Delhi | Lodhi Estate Delhi |
| ५. | Art Gen(Sunny Sculptures), Surat | ५२ पुतळे , सुरत |
| ६. | Hastankit Foundation, Thane | नागपूर येथील संकल्पधारित भिती चित्रे व शिल्प |

उपरोक्त प्रमाणे काम करणेसाठी सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या नावाचा समावेश करुन पुढील प्रमाणे तरतुद करणे आवश्यक आहे.

| अक्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र | सन २०२१-२२ ची तरतूद | वाढ | घट | सन २०२०-२१ चा सुधारित अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड शहरात विविध ठिकाणी भित्ती चित्रे व शिल्प उभारणी द्वारे शहराचे सुशोभीकरण करणे | ५.०० कोटी | स्थापत्य विशेष योजना | नविन काम | - | ५०.०० लाख | - | ५०.०० लाख |
| २ | पिंपरी चिंचवड शहरातील पुलांची व ग्रेडसेपरेटरची स्थापत्य विषयक कामे करणे. | २०.०० कोटी | स्थापत्य विशेष योजना | ४५/१४९ | ३८.१८ लाख | - | ३०.०० लाख | ८.१८ लाख |
| ३ | स्थापत्य बीआरटीएस विभागाकडील रस्त्यांचे अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार आवश्यक व उर्वरीत कामे करणे. | ३०.०० कोटी | स्थापत्य विशेष योजना | ४३/७६ | ३८.१८ लाख | - | २०.०० लाख | १८.१८ लाख |
| | **एकूण** | | | | ७६.३६ लाख | ५०.०० लाख | ५०.०० लाख | ७६.३६ लाख |

उपरोक्त नमूद संस्था समवेत सदरची सुशोभीकरणाची कामे करणेसाठी विविध संस्था व कलाकार संस्था सोबत MOU/Collabration करणे व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर - वि.क्र. १२ वर कोणाला बोलायचे आहे का.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७०४ विषय क्रमांक – १३

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र. स्था/बीआरटीएस/१०७८/२०२१ दि. ७/९/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने भारत सरकारच्या शहरी विकास मंत्रालयाने (MoHUA) यांनी स्मार्टसिटी मिशन अंतर्गत जाहीर केलेल्या विविध Challenge मध्ये सहभाग नोंदविलेला आहे. केंद्रशासनाच्या स्मार्ट सिटी मिशन योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार शहरातील नागरिकांसाठी पादचारी केंद्रीत रस्ते पुर्नरचना करणेसाठी Cycle4Change Challenge, Streets4People (Main Road its neighbor hood Road) and Transport & All या स्पर्धांमध्ये मनपाने नोंदणी करून भाग घेतला आहे. भारत सरकारच्या “The Streets for People Challenge”या स्पर्धेसाठी तांत्रिक बाबी करीता ITDP(Institute of Transportation Development Policy) या आंतरराष्ट्रीय NGO ने सक्रिय पाठिंबा दिलेला आहे. सदर स्पर्धेत प्रत्येक शहराने पादचारी केंद्रीत रस्ते विकसीत करणेसाठी नागरिक, अर्बन डिझाईन तज्ञ/विद्यार्थी आणि शहरातील वास्तुविशारद यांच्या सुचना/मागण्या यांचा रस्ते नियोजनात व रस्ते बांधणेकामी समावेश करावा असे सुचित केलेले आहे. महापालिकेने वेबसाईट व सारथी ॲपद्वारे नागरिकांच्या सुचना मागविल्या होत्या त्यामध्ये एकूण २०० नागरिकांनी सुचना नोंदविल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शहरातील पदपथ सलगपणे व रूंद आणि चालण्या योग्य अतिक्रमण मुक्त असावेत याचा उल्लेख दिसून येतो. तसेच पिंपरी चिंचवड शहराची Indian Cycles 4 change Challenge अंतर्गत सायक्लोथॉन स्पर्धेत देशभरातील ११० शहरांमधुन ११ शहरामध्ये दि.२८ जुलै २०२१ निवड झालेली असून महापालिकेस रूपये १ कोटीचे बक्षिस केंद्र शासनाने जाहिर केलेले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत आर्किटेक्ट/अर्बन डिझाईन महाविद्यालयीन तज्ञ प्राध्यापक/व्यावसायिक आणि विद्यार्थी यांचा समावेश असणारी “The Streets for People” ही डीझाईन स्पर्धा /प्रतियोगिता आयोजित ५ मार्च २०२१ ते १८ एप्रिल २०२१ आयोजित केली होती.या स्पर्धेसाठी पिंपरी चिंचवड शहरातील प्राधिकरणातील टिळक चौक ते बीग इंडीया चौक, लोकमान्य हॉस्पिटल ते गंगानगर आणि त्याच्याशी संलग्न आंबेडकर रस्ता असे रस्ते निश्चित केलेले आहेत या स्पर्धेमध्ये १३४ जनांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी व्यावसायीक (Urban Road Designer / Architect)४३ आणि विद्यार्थ्यांच्या ९१ जनांचा चा सहभाग होता. या स्पर्धेतील विजेत्यांच्या डिझाईनमधील उत्कृष्ट/गुणात्मक बाबींचा महानगरपालिका आपल्या रस्ते विकसनाच्या (Tactical Urbanism द्वारे) कामामध्ये/डीपी रस्त्यांच्या प्रकल्पामध्ये समावेश करील जेणेकरून केंद्र शासनाचे “The Street for People Challenge” या स्पर्धेचे उद्दीष्ट साकारणे शक्य होईल. या स्पर्धेतील विजेत्यांना मा.महापौरांच्या हस्ते सर्टिफिकेट व बक्षिस वितरण केलेले आहे.

वरीलप्रमाणे नमुद केलेल्या सर्व स्पर्धातून नागरिकांच्या सहभागाने व त्यांना अपेक्षित असलेल्या संकल्पनांचा/सोयीसुविधांचा शहराच्या नियोजनात आंतरभाव करून शहराचा शास्वत विकास व्हावा हे ध्येय निश्चित केलेले आहे. त्याचाच एक भाग म्हणून शहरास पादचारी व सायकलीस्नेही धोरण ठरविणे आवश्यक आहे व ते मंजुर करून केंद्र शासनास पाठविणे गरजेचे आहे. सदर धोरण ठरविताना अर्बन प्लॅनर/डिझाईनर व नागरिकांच्या सुचना विचारात घेवून ITDP (Institute of Transportation Development Policy) या आंतरराष्ट्रीय NGO च्या मदतीने तयार केलेले आहे. सदर “पादचारी व सायकलस्नेही धोरण” मा.महापालिका सभेची मान्यता घेवून ते लवकर केंद्रशासनाकडे सादर करावयाचे आहे.

तरी पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांसाठी “पादचारी व सायकलस्नेही धोरण” तयार केलेले असून त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.राजू मिसाळ - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हया विषयाची थोडीशी आम्हांला स्पष्टता व्हावी. हा विषय नक्की काय आहे कशा पध्दतीने करणार आहे याची थोडीशी माहिती मिळावी.

मा.नामदेव ढाके – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या शहराच्या आता जे काय सायकल फॉर चेंज जो काय कार्यक्रम आपण वेगवेगळया ठिकाणी घेतला आणि मला असं वाटतं की ११० शहरांमधुन ११ शहरं ती निवडली त्यात पिंपरी चिंचवडचे नाव आलेल आहे आणि त्या संदर्भामध्ये मा. महापौर विरोधी पक्ष नेत्यांनी सांगीतले की या संदर्भात विस्तृत माहिती मिळावी. आपण सवणे साहेबांना त्या संदर्भात माहिती देण्यास सांगावे.

मा. महापौर – सवणे साहेब आपण विषय क्र. १३ ची माहिती द्या.

मा. श्रीकांत सवणे – सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त सन्मा. सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरामध्ये नॉन मोटराईज्ड ट्रान्सपोर्ट धोरण अवलंबावे याचे कारण असे आहे की गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचे जे काय चॅलेंजेस आहेत सध्या चालू असलेली त्यामध्ये १ ले आहे सायकल्स फॉर चेंज त्याच्यामध्ये आपण संपूर्ण भारत देशामध्ये जेवढया शहरांनी भाग घेतला होता त्यापैकी ११ शहरांची निवड केली आहे त्यात आपलही शहर निवडलं गेलेलं आहे आणि आपल्याला त्याचं १ कोटीचं बक्षीस देखील मिळालेल आहे. तसंच आपण सध्या स्ट्रीटस फॉर पीपल या योजनेत देखील सहभाग नोंदविला आहे आणि त्यामध्ये पिंपरी चिंचवडची निवड झालेली आहे. आणि ट्रान्सपोर्ट फॉर ऑलचे चॅलेंज सुध्दा सुरु आहे आणि त्याचा सर्व्हे चालू आहे. या सगळया गोष्टींसाठी शहरामध्ये नॉन मोटराईज्ड ट्रान्सपोर्ट पॉलिसी असावी या पॉलिसीचा या ठिकाणी आपण विषय सादर केलेला आहे. ती पॉलिसी अशी आहे की शहरातील जे काही रस्ते आपण विकसित करतोय त्या रस्त्याचा वापर करणारे नागरीक असतील, हॉस्पिटल्स असतील, मोटर कार वापरणारे असतील बस असतील हेव्ही व्हेईकल्स असतील तर

त्यांना प्रत्येकाला रस्त्यावर इक्विटेबल जागा मिळाली पाहिजे आणि सुरक्षित पदपथ आणि सायकल ट्रॅकची निर्मिती शहरात झाली पाहिजे हा हेतु ठेवून आणि अशा पध्दतीने रस्ते विकसित करण्यासाठी महापालिकेचे एक धोरण असले पाहिजे म्हणुन ते धोरण तयार केलेले आहे. या धोरणाला आपण लोकांच्या मधुन सहभाग नोंदवलेला आहे. त्यांचेकडून आलेल्या सजेशन आणि आल्टरेशनचा याच्यामध्ये आपण समावेश करुन हे धोरण तयार केलेले आहे. शहरातील रस्ते विकसित करताना ते कसे करावेत व ते कसे पर्यावरण पुरक सुरक्षित पादचारी आणि सायकल स्वारांसाठी राहतील यांचा या धोरणात आपण विचार केला आहे त्यामुळे इथुन पुढे विकसित होणारे सर्व रस्ते या धोरणानुसार विकसित होतील त्यासाठी हा विषय आणला आहे.

मा. राजू मिसाळ – मा. महापौर साहेब तुम्ही विषय मंजूर करा. आज मी सांगतो माझा प्रभाग असेल किंवा मोरेश्वर भोंडवेंचा प्रभाग असेल. आपण अर्बन डेव्हलपमेंटमध्ये रोड केले आहेत साहेब. कमिशनर साहेबांना मला हे सांगायच की मा. हर्डीकर साहेबांच्या काळामध्ये काही धोरणं झाली होती साहेब तुम्ही सायकल ट्रॅक साठी लाल पट्टे मारलेत. आपण फुटपाथ मोठे केलेत का तर नागरीकांना त्या पाथवेचा उपयोग झाला पाहिजे. फुटपाथवर चालता आले पाहिजे. आणि त्या वेळी हर्डीकर साहेंबांनी सांगितले आहे त्या वेळी मला वाटतं सवणे साहेब असतील तर सवणे साहेबांनाही माझा हा प्रश्न आहे की ज्या वेळी तुम्ही हे रोड डेव्हलपमेंट करताना तुम्ही आम्हांला अशी कल्पना दिली होती की त्या रोडवर अतिक्रमण होईल त्याच्यावर एक तुम्ही स्कॉड नेमणार होते. आज बघा तुम्ही आमच्या रोडला त्या डी.वाय. पाटीलच्या रोडला सगळया सायकल ट्रॅकवर सर्व अतिक्रमण झालेले आहे. सगळया गाडया उभ्या असतात आज त्या पाथवेवर पूर्ण फुटपाथवर पूर्ण हातगाडया आहेत. तर मला हे धोरण हे करत असताना पहिल्यांदा आपण सायकली आणल्या होत्या मला वाटतं त्या सायकल कुठे गेल्या नंतर त्या कुठं गायब झाल्या ते कळाले पण नाही. त्यामुळे महापौर याचे आम्हाला व्यवस्थित प्रेझेंटेशन होऊन प्रॉपर खुलासा व्हावा आणि जे रोड तुम्ही शहरामध्ये ऑलरेडी डेव्हलप केलेत तेच तरी व्यवस्थित होऊद्यात. त्याचेवर तुमच्याकडे स्कॉड नाही. तुम्ही गुरुद्वारा रोडपासुन बघा किंवा आमचा आकुर्डी रेल्वे स्टेशनचा रोड बघा अख्ख्या रोडवर माई पूर्ण अतिक्रमण झालेले आहे. म्हणजे जे पर्पज आपण साध्य करण्यासाठी चाललोय ते पर्पज साध्य होत नाही. आवाज बारीक झाला की आम्ही तुमच्यापर्यंत येतो तसं नको व्हायला. माझं म्हणणं आहे की हा विषय पुढच्या जी.बी. ला घ्यावा.

मा.सचिन चिखले – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रशासनाच्या वतीने अतीशय चांगला विषय आणलेला आहे. प्रशासनाचे मी स्वागत करतो याची अंमलबजावणी व्हावी हीच इच्छा आहे, धन्यवाद.

मा. अजित गव्हाणे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या ठिकाणी आता राजू मिसाळ हयांनी जे मुद्दे मांडले आहेत त्या मुद्दयावर मा. आयुक्त साहेब मी आपल्याकडे आमच्या भोसरीला जे अर्बन स्ट्रीटच्या अंतर्गत काम चालू आहे हे काम सुरु झाल्यानंतर आम्ही जेव्हा तक्रार केली आणि अधिका-यांनी त्यावेळेस तिथल्या व्यापा-यांनी जेव्हा तक्रारी केल्या तेव्हा प्रेझेंटेशन ठेवले आणि प्रेझेंटेशन देत असताना पहिलं तर आश्वासन आयुक्त साहेब आम्हांला सवणे साहेबांनी आणि त्यांच्या टीमनी असं दिलं होतं की हे काम चालू आहे काम चालू झाल्यानंतर कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण आम्ही त्या ठिकाणी होऊ देणार नाही. आयुक्त साहेब मी त्या दिवशी तुम्हांला कल्पना दिली की तुम्ही एखाद्या दिवशी वेळ काढा आणि त्या परिसरात जर तुम्ही आलात तर तुमच्या लक्षात येईल आता पासून त्या ठिकाणी अतिक्रमण सुरु झालेले आहे. मुळात एवढं मोठं काम त्या ठिकाणी काढलेल आहे की माझ्या माहितीप्रमाणे ३१ ते ३८ कोटीचे काम या ठिकाणी आपण  करतोय आणि मुळात मुद्दा हा होता की एवढे पैसे त्या ठिकाणी आपण खर्च करतोय ते मुळात व्यर्थ आहेत का.  एवढया मोठया प्रमाणात आपण तिथं खर्च करतोय आणि ज्या हेतुने आपण ते करतोय तो हेतु आपला  साध्य होतो का. पहिल्यांदा सुरुवातीला आयुक्त साहेब फुटपाथ मोठे पकडले  आणि रस्ते छोटे केले होते नंतर जेव्हा नागरीकांनी विरोध केला त्यामुळे मग रस्त्याची रुंदी वाढवली व फुटपाथ कमी केला. साहेब हयाच्यामध्ये सुरुवातीला ८ मीटर मॅक्झीमम फुटपाथ  यांनी  ठेवला होता आणि  रस्ते होते ७.५ मीटरचे नंतर मग ज्या वेळेस विरोध झाला त्या वेळेस  ८ मीटर वरुन   ४-४.५  मीटर वरती  फुटपाथ आणले. त्यानंतर पार्कींग होणार होतं. त्यांनी पॅरलल पार्कींग ठेवलं होतं. त्याच्यातनं जेव्हा माणसं उतरतील तेव्हा तो डायरेक्ट रस्त्यावरच्या  गाडीला धडकेल अशा प्रकारचे नियोजन झालं होतं. त्याच्यानंतर हयांनी त्याच्यामध्ये पार्कींगची प्रोव्हीजन बदलली आणि नंतर आता रस्ते मोठे केलेत आणि ४.५ मीटरचे काही तरी फुटपाथ करायला घेतलेले आहेत. परंतु ते काम होत असताना आयुक्त साहेब आताही त्या ठिकाणी क्वालिटीचे काम होत नाही. अनेक लोकांनी त्या ठिकाणी आता पासुन अतिक्रमण  सुरु केले आहे आणि ज्या उड्डाणपुलाखाली आयुक्त साहेब यांनी  गार्डन केलय दोन ठिकाणी त्यांनी त्या ठिकाणी  जे काही दृश्य पाहाल त्या ठिकाणी आम्ही त्याचे व्हिडीओ काढतोय सवणे साहेब रोज, त्या ठिकाणी लोकांना वेगळया कामासाठी चुकीच्या उद्योगासाठी ते गार्डन  उपलब्ध करुन दिलं आहे मुळात खरंच हायवेवर गार्डन योग्य आहे का  इतके मोठं प्रदुषण असताना त्या  ठिकाणी गार्डन टिकणार आहे का  आणि तुम्ही काय सांगितलं ज्येष्ठ नागरीकांसाठी कुठले ज्येष्ठ नागरीक तेथे जाणार आहेत गार्डनमध्ये.  शक्य आहे का ते रोड क्रॉस करणं शक्य आहे का. परंतु अत्यंत चुकीच्या पध्दतीने ते काम चालू आहे एका बाजूला वारेमाप पैसे खर्च करायचे महापालिकेचे नागरीकांचे नुकसान करायचे दुस-या बाजूने ज्या हेतूसाठी आपण  काम करतोय तो हेतु पण साध्य होतोय का. आज तुम्ही जे काय आमच्यापुढे कागदांवर छान छान आहे पण प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे ती आयुक्त साहेब तुम्ही हया  सगळया संदर्भातील खोलात जा आणि  त्या अर्बन

स्ट्रीटच्या नावाखाली ह्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये ठिकठिकाणी जी कामं चालू आहेत आणि जी झालेली आहेत त्याची आपण सखोल चौकशी करावी अशी विनंती करतो.

मा. शाम लांडे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माई आयुक्तांचे धोरण आहे, ठराव नव्हे. नावाला फक्त धोरण दिसतय मला. माई याचं सवणे साहेबांनी स्थायी समिती सभागृहात हे दाखवलेल आहे ते त्यांनी सांगितले दापोडी ते निगडी आणि निगडी ते दापोडी याचा सायकल ट्रॅक बनवणार सायकल चालवण्यासाठी. त्याला विरोध आहे सायकलवाल्यांना आमचा. ट्रॅक बनवावा सगळं करावं. माई दापोडी पासुन निघालं पहिलं सुरुवात धरली पुण्यापासुन पहिलं दापोडी आणि त्यानंतर निगडी हा तर दापोडीत कुठला रस्ता किती मीटर ताब्यात घेतला ते सवणे साहेबांना माहिती आहे. त्यानंतर अल्फा लाव्हल कंपनीपाशी आलं ना माई तेथे ६१ मीटर बरोबर झालेलं आहे. अल्फा लाव्हल कंपनी पासून तर पिंपरी पर्यंत माई ६१ मीटरचा ताबा घेतलेला नाही आणि पिंपरी च्या पुढे पासुन ६१ मीटर झालयं आणि निगडी ६१ मीटरचा रोड नाही ४५ मीटरचा माई. याचा अर्थ कासारवाडीमध्ये ६१ मीटरचा ताबा मुंबई पुणे रस्त्यावरुन नगररचनाने घेतला नाही ही चुकी कोणाची तर अधिका-यांची चुकी आहे माई. ६१ मीटरच घेतला नाही. दुसरी गोष्ट माई आपला तो जे.आर.डी. टाटा उड्डाणपूल तुमच्याकडे सांगवीकडे जाणारा रॅंप आहे तोच फुटपाथ मध्ये केला आहे. म्हणजे ६१ मीटर नसताना पहिला कमी रोड तिथे ७ ते ८ मीटर रोड कमीच घेतलेला आहे. पैसे तर सर्व वरनं देऊन बसलेलोय भूसंपादन जागावाल्यांना तो रॅंप तुमचा फुटपाथमध्ये केला. ते आता सायकल ट्रॅक केल्यानंतर तिथली जागा किती राहणार अजिबात नाही राहत माई पिंपरी पर्यंत. म्हणजे १०० कोटीचे टेंडर काढण्यासाठी सायकल धोरण हे ठरवले गेलेल आहे माई. त्याटाईमाला सवणे साहेबांना तेच सांगतोय की आम्हांला सायकल चालवण्याला विरोध नाही. याच्या आधी माई स्मार्ट सिटीमध्ये पण आपण सायकली घेतल्यात कुठं गायब झाल्यात त्या सायकली, त्या कुठल्या सायकली चालवल्यात कुठल्या सोसायटीवाल्याला सगळया सायकली दिल्यात त्या कुठं गेल्या. म्हणजे टेंडर डोळयासमोर ठेवलेलं आहे माई हे १०० कोटीचं आणि परत निगडी ते दापोडी असं १०० कोटीचे काढणार आहेत टेंडर म्हणजे दोन टेंडर १००-१०० कोटीचे काढणार ते सवणे साहेबांच्या डोक्यात आहे. आम्हांला गोल गोल गोल गोल करुन सांगितलं. सवणे साहेबांना त्या दिवशी दाखवलं तर म्हटले तुम्हांला फक्त दाखवतोय त्याच्यात काही सूचनाही दिल्यात सदस्यांनी. चार्जींग कुठं पाहिजे, कुणाला कॉफी हाऊस कुठं पाहिजे, आणि टॉयलेट कुठं पाहिजे, पण टेंडर काढण्यासाठी तो सल्लागार डोळयासमोर ठेवून आलाय त्यांचे टेंडर कोणाला भेटणार हे सगळं डोळयासमोर ठेवून आलेल माई ६१ मीटर ताब्यातच नाही. मग तुम्ही ६१ मीटर ताब्यात नसताना तुम्ही सायकल ट्रॅक कसा करणार. पहिलं तुम्ही निगडी ते दापोडीच करणारे पहिलं सवणे साहेबांनी सांगाव ६१ मीटर ताब्यात घेतला आहे का, त्याचा खुलासा करा पहिला आणि नसेल घेतले तर त्या त्या

अधिका-यांनी त्या त्या काळात केल्या असतील चुका तर त्यांच्यावर कारवाई होणार आहे का. आता ६१ मीटर ची जागा तुम्हांला कोण देणार आहेत ताब्यात सांगाना कुठली दुकाने पाडणार पुन्हा भूसंपादन करणार का. होऊ शकतं का त्या काळातल बंड साहेबांच्या ६१ मीटर आहे ते पुर्णत: झालेला नाही. त्याच्यामुळे सायकल ट्रॅक करता येणार नाही फक्त टेंडर निघेल निवडणूकीच्या आधी. त्याच्यामधुन काय होईल कुणाला चरायचं ना ते चरुन घेणार त्याच्यात माई. माई खुलासा करायला लावा माई याच्यात खुलासा करु द्या. सवणे साहेबांनी सांगाव जागा अल्फा लावल पासुन ते पिंपरीच्या महापालिकेपर्यंत ही भेटली का आणि शिवाय याच्यात बीआरटी येती ती कासारवाडीची बीआरटी माई बघण्यासारखी आहे. कायम बीआरटीचे टेंडर निघतय हायवेला पण त्या बीआरटीचं नागमोडी झाकझुक झालंय ते हयाच्यापर्यंत बघा माई आमंत्रण हॉटेल पर्यंत सगळा सत्यानाश झालायं त्याच्यात मेट्रोचा पोल आपल्या महापालिकेच्या समोर कॉर्पोरेशनचे गेट आहे ना तीथ पोल आलेत त्याचे परत आता सायकल ट्रॅक टाकणार म्हणजे महापालिका कंपाऊंड वॉल तुम्हांला आत घ्यावी लागणार आहे म्हणजे परिस्थिती खुप वाईट आहे फक्त त्या विभागाला टेंडर काढायचे आणि डोळयासमोर ठेवून रिंग करायची हेच डोक्यात दिसतयं तर त्याच्यावर आमचा विरोध असणार माई हया गोष्टीला. पण जर याचं धोरण काही ठरवायचं असेल तर ६१ मीटर ताब्यात घ्या. सगळं करा. खुप वाटतं ना माई १००-१०० कोटीचे दोन काम करायचे आहे. हे जाऊ द्याना पहिलं याच्या आधी बेस्ट सिटी होती ना बेस्ट सिटीचा पुरस्कार भेटलाय आता स्मार्ट सिटी झाली स्मार्ट सिटीतल्या सायकली गेल्या, सायकली चालवायला कोण नाही हे झालय. लय वाटलं ना माई तर रिंग रोड आहे ना आपला त्याच्यावर १००–१००, २०० कोटीचे आहे ना तो रोड आणावा आणि त्याच्यावर सायकल ट्रॅक करावा. दुसरी गोष्ट माई नाशिक फाटा ते दापोडी पर्यंत निघतोय मोशी पर्यंत निघतोय केंद्र काढतय आपलं टेंडर त्याचं त्याच्यात सायकल ट्रॅक टाकून घ्या. म्हणजे सायकलवाल्यांना पण आपण न्याय दिल्यागत होईल आणि हयाचा १००-१००, २०० कोटी रिंग रोड मध्ये खर्च करा. तो रोड ताब्यात घ्या व त्यात सायकल ट्रॅक टाका. १८ मीटरच्या वरती असणारा रस्ता त्यावर चांगला ३० मीटरचा होतो तो त्याच्यावर काम करा. पहिले जे हायवेला तुम्ही सगळं बाधित करुन टाकला आहे आणि त्यातलं कुठलंही अतिक्रमण निघणार नाही, काही नाही निघणार माई. नाशिक फाटयापासुन ते माई त्या जय महाराष्ट्र चौकापर्यंत तुमचा फुटपाथ गायब झालेला आहे. तुमचं तुम्ही पार्कींगचं धोरण आणलय ना ते पार्कींगचं धोरण ६१ मीटरच्या डांबराच्या रोडवर टाकलेलं आहे. म्हणजे तिथं पाहिजे ना त्या दुकानदाराला पार्कींग झोन पाहिजे तसं केलंय. अरे, पैशाचा उत्माद चाललेला आहे. म्हणुन माई हे टेंडर नका करु, हे धोरण नंतर ठरवा. ऑफ टाईम जीबी मध्ये घ्या आणि त्या टायमाला आयुक्त सगळे एकत्र मिळून बसुन गटनेते याचा निर्णय घ्या माई, त्यामुळे हे विषय करु नका ही नम्र विनंती.

मा. राजू मिसाळ – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माई हयाचा खुलासा करायला लावा की एवढं तळमळीनी बोललेत शाम अण्णा माई तर निदान खुलासा मागवा आणि हे पुन्हा होऊ शकतं का

मा. योगेश बहल – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा. महापौर साहेब धन्यवाद. वास्तविक पाहता मा. शाम लांडेंनी जे मत मांडले, शाम लांडेंचा आणि माझा प्रभाग तोच आहे. पण वास्तविक पाहता शाम लांडे तिथनं पहिले पण नगरसेवक म्हणुन निवडून आलेले आहेत. आणि मा. महापौर साहेब आपल्याला विनंती अशी आहे की संबंधित अधिका-यांना मार्शल कंपनीनंतर पुढे शंकरवाडीपर्यंत जर आलो तर परिस्थिती बघावी की का आपण वाईडींग करत नाही दुसरी गोष्ट की मा. आयुक्त साहेब ऑनलाईनवर आहेत त्या ठिकाणी महापौर साहेब पुलाखाली जे काही क्रेन लागतात त्या गाडया लागतात बाहेरचा कोण जो व्यक्तिगत मालक आहे तो त्यांच्याकडून दीड दीड लाख रुपये भाडे घेतात म्हणजे महापालिकेची जागा आणि पैसे कमवणारे कोण आहेत ते पण बघा. दुस-या बाजूला जीव मुठीमध्ये घेऊन लोकांना वाहनं चालवावी लागतात कार डेकोरच्या नावाखाली सगळया कार रोडला लावलेल्या असतात. टुव्हीलरवर पण जाता येत नाही. तरी आपण उड्डाणपूलावरुन खाली उतरलो ना महापौर साहेब तुमच्याइकडून येताना तर आपण चालतो समोर गाडया रोडवर असतात. लोक जीव मुठीत घेऊन वाहनं चालवतात तर काय करतं आपलं प्रशासन काय करतय हे नियोजन, विषय चांगलाय. पुन्हा सांगतो विषयाला विरोध नाही. परंतु विषय करत असताना ज्या काय त्रुटी आहेत ज्या काय चुका आहेत त्या कोण दुरुस्त करणार आपण काय पुढे पुढे गेलं मागे मागे गेलं मध्ये नेट बंद त्याला जबाबदार कोण ते काढणार कोण कधी काढणार कधी मध्ये जर कोणी उद्या सायकल घेऊन आला तर थोडयावेळाने पुण्याकडे निघाला मार्शलपर्यंत आणि डोक्यावर सायकल घ्यायची आणि परत संत तुकाराम नगर पर्यंत चालवायची असं करणार आहे का आपण महापौर साहेब याचं नियोजन व्यवस्थीत व्हायला पाहिजे. वास्तविक पाहता मला तर कळलंच नाही सवणे साहेब आहेत म्हणुन, अजित म्हणाला की सवणे साहेब आहेत म्हणुन अर्थात सवणे साहेब पण अनुभवी आहेत जुने आहेत हया महापालिकेमध्ये जाणकार आहेत. त्यांना पण कळलं पाहिजे की जे शाम सांगतोय पोटतिडीकेने जे मी मांडायचा प्रयत्न करतोय तिथे लोक गैरफायदा घेतात ज्या काय चुका झाल्या आहेत जे राजू मिसाळनी सांगितले विरोधी पक्षनेत्यांनी सांगितलं ते पण आपण पाहिलं पाहिजे यातल्या त्रुटया ज्या काही आहेत त्या दूर झाल्या पाहिजेत महापौर साहेब. विषय चांगला आहे. विषयाला आमचा विरोध नाही. त्रुटया दूर करुन जर हे करणार असतील तर आपण विषय करावा. अन्यथा यांना पहिले आदेश द्या. आयुक्तांना आपण सांगा काय परिस्थिती आहे कोण तिथं भाडं खातय महापालिकेची जागा आपण ताब्यात का घेत नाही आपण तिथले भूसंपादन का करत नाही भूसंपादनाला जबाबदार कोण आहे आपले अधिकारी का गप्प बसलेले आहेत का त्यांना हप्ता येतो का त्यांना महिन्यातुन भाडं मिळतंय काय कारण आहे तिथला नगरसेवक तिथला आम्ही नगरसेवक असताना वास्तविक पाहता नगरसेवकांचे हितसंबंध असतात

नगरसेवक सांगत असतात आयुक्त साहेब हे करु नका, आयुक्त साहेब अतिक्रमण काढू नका. तो माझा पाहुणा आहे तो अमुक आहे, तो तमुक आहे. इथे परिस्थिती उलटी आहे. सन्माननीय सदस्य सांगतात की तुम्ही अतिक्रमण काढा रस्ता मोठा करा आपण का करत नाही हयाच्यामागे काय दडलय ते तर सांगावं. आता महापौर साहेब आपल्या पक्षावर बोलत नाही मी, प्रशासनावर बोलतोय. आता तर तुम्ही त्यांना ठणकावुन सांगावं. आज जे काय शामरावांनी मांडलं मी मांडतोय काय चुकीचं आहे कोण भाडं खातय कोण चुकीचं काम करतय कोण गाडया रोडवर लावतय, काय चाललेल आहे, लोकं जीव मुठीत घेऊन चालले आहेत. विषय चांगला आहे. विषय करा पण त्रुटया आपण पहिल्या दूर कराव्या अशी आपल्याला विनंती आहे. मा. महापौर साहेब आणि सवणे साहेबांनी सांगितल्यापेक्षा मला वाटतं त्यांच्यापेक्षा जास्त चांगली माहिती मला पक्षनेत्यांनी दिली. पक्षनेत्यांनी प्रेझेंटेशन द्यावे, पक्षनेत्यांनी माहिती द्यावी आणि मग विषय मंजुर करावा पक्षनेते खुप चांगली माहिती देतात.

मा.नामदेव ढाके – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. बरोबर आहे त्यांचे म्हणणे. महापौर साहेब मला माहिती आहे ते का बोलले, ते मला माहिती आहे.

मा. महापौर – सवणे साहेब व मा. आयुक्त यांना सांगू इच्छिते की ज्या सभासदांनी सायकल ट्रॅक संदर्भात त्रुटी सांगितल्या आहेत त्यांची दखल घ्यावी हा आदेश देत आहे व विषय क्र. १३ मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा. मा.ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७०५ विषय क्रमांक – १४
दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

अ) कार्यपत्रिका क्र.१७ दि. ६/८/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) कार्यपत्रिका क्र.१८ दि. १८/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७०६ विषय क्रमांक – १५

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महीला व बालकल्याण समिती**

अ) कार्यपत्रिका क्र.१३ दि.२२/७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७०७ विषय क्रमांक – १६

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) कार्यपत्रिका क्र.१५ दि.२०/७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) कार्यपत्रिका क्र.१६ दि. ३/८/२०२१, दि.१७/८/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७०८ विषय क्रमांक – १७

दिनांक – २०/९/२०२१ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्र.११ दि.५/८/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.महापौर- सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे मी जाहीर करते.

-----

**(**उषा उर्फ माई मनोहर ढोरे**)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/९१२ /२०२१
दिनांक - २१/१०/२०२१

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील
योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.